माधवी कंकण

ही ऐतिहासिक कादंबरी,

बाबू आर. सी. दत्त

यांच्या मूळ बंगाली कादंबरीवरून

आत्माराम आपाजी पांडे

यांनी मराठीत लिहिली,

ती

अमृत सखाराम वणीकर

यांनी

वडोदें

वीरक्षेत्रमुद्रालयांत छा० प्रसिद्ध केली.

सन १९००.

किंमत रु. १-८-०

प्रस्तावना.

बाबू आर. सी दत्त यांनी हिंदुस्थानच्या ऐतिहासिक भागावर ार पाच बंगाली कादंबऱ्या लिहिल्या आहेत, त्यांपैकी प्रकृत ा **कंकण** ही एक आहे. शहाजहान बादशहाला त्याच्या कैद केल्यावर सार्वभौम पदाकरितां त्यांच्यांत उपस्थित झालेले ारंगजेबाने त्या तंट्यांचा लावलेला आपस्वार्थी शेवट व बंगालची ान स्थिति, इत्यादि गोष्टींचें चित्र ह्या कादंबरीत वाचकाच्या दृष्टीस पडेल. शिवाय, जगांत प्रेम हें काय आहे, व त्यामुळे ष्य काय काय करूं शकतो, ह्याचाही विचारशील वाचकांना अनु- आल्यावांचून रहाणार नाही.

पुस्तककर्ता

कथानक

भागीरथीच्या किनाऱ्यावर असलेल्या वीर-नगरांत वीरेंद्र नामक एका जमीनदारानें आपली जमीनदारी स्थापन करून नवकुमार-मित्र नामक एका जन्मदरिद्री-पण बरोबरीनें शिकलेल्या गृहस्थास आपल्या दिवाणाचे जागेवर नेमलें. कांहीं दिवसांनीं वीरेंद्र मृत्यु पावला व त्याचा मुलगा नरेंद्र हा लहान असल्यामुळें सर्व कारभार नवकुमार-मित्र पाहूं लागला. ह्या नवकुमाराला हेमलता नांवाची एक मुलगी होती. तिचें आणि नरेंद्राचें अति प्रेम असल्यामुळें तीं दोघेंही एकमेकांवर प्राणप्रीति करण्यास शिकलीं होतीं. प्रथम नवकुमाराच्याही मनांत ह्या दोघांचें लग्न करून द्यावयाचें होतें. पण पुढें त्याच्या मनांत द्रव्यलोभ वाढल्यामुळें, त्यानें त्या वेळच्या बंगालच्या सुभेदाराच्या दरबारांतील कामगारास लांच देऊन जमीनदारी आपल्या नांवें करून घेतली व हेमलतेबरोबर दुसऱ्याच एका मुलाचा (श्रीशचंद्राचा) विवाह करून देण्याकरितां त्याला आपल्या घरीं आणून नरेंद्रास घराबाहेर घालवून दिलें. घरांतून निघून जातांना नरेंद्राची हेमलतेशीं भेट झाली

व त्यानें तिचा निरोप घेतांना माधवीलतेचें एक कंकण क[illegible] तलें आणि आपण चालता झाला. तो आपल्या नदारीच्या हक्काबद्दल दाद मागण्याकरितां बंगालच्या सुभेदाराकडे गेला. पण तेथें जमीनदारीच्या हक्काबद्दल नरेंद्राची दाद लागली नाहीं. तरी, नरेंद्रनाथ चांगला बळकट असल्यामुळें त्याला युद्धोपयोगी शिक्षण देऊन सैन्यांत ठेवण्याची सुभेदारानें आज्ञा केली. ह्यावेळीं बंगालच्या सुभेदारीचा कारभार शहाजहान बादशहाचा मुलगा सुजा पहात होता.

कांहीं दिवसांनीं शहाजहान बादशहा आजारी पडून त्याचा वडील मुलगा दारा हा राज्यकारभार करूं लागला. ह्यामुळें त्याच्या इतर मुलांस राग येऊन ते दाराशीं लढण्याकरितां त्यावर चालून आले. (ह्मणजे दक्षिणेंतून औरंगजेब, गुजराथेंतून मुराद व बंगाल्यांतून सुजा) मागें सांगितल्याप्रमाणें सुजाच्या सैन्याबरोबर नरेंद्र होता. काशीच्या युद्धांत सुजा हरला व नरेंद्र जखमी होऊन समरांगणांत पडला. दैवयोगानें, [illegible] तर्फे लढावयास आलेला यशवंत सिंग[illegible] नामक सरदारानें त्याच्या [illegible] स्थितींत त्याला साह्य करून आपल्या तळावर [illegible] तेथें तो जखमानी बेमार व बेशुद्ध असतां

त्याला जलेखा नांवाच्या एका यवनीनें त्याच्या रूपास मोहित होऊन—दिल्लीस नेलें. ही जलेखा दिल्लीच्या बादशाही जनानखान्यांतली एक दासी होती. तिनें जनानखान्यांत कोणी पुरुष आणिला आहे, हें ऐकून जनानखान्याच्या खोजास राग आला व त्यानें बेगम साहेबांकडून ह्या दोघांनाही शिक्षा करविण्याचा निश्चय केला. व त्याप्रमाणें शिक्षा सुनाविल्या गेल्या. पण त्या धूर्त जलेखेनें त्याच रात्रीस नरेंद्रासह तेथून मोठ्या चपलतेनें पोबारा केला! नरेंद्रास ही गोष्ट कशी घडून आली हें समजलें सुद्धां नाहीं. पुढें, अनायासें त्याच्या पूर्वपरिचित गजपति सिंहाची त्यास भेट होऊन, त्याच्या साह्यानें तो यशवंतसिंहाच्या लष्करांत शिरला. जलखाही फकिरी वेषानें त्याच्या बरोबरच होती.

औरंगजेबाशीं लढत असतां दाराचा साह्यकारी जो यशवंतसिंह त्याचा पराभव होऊन तो स्वदेशीं परत आला व तेथें नरेंद्राला वश करण्याकरितां जलेखेनें एक लिंगेश्वराच्या देवालयांतील एका गोसाव्याच्या साह्यानें यत्न केला. लाडीगोडी दाखवून, शेवटीं—प्राणभयही दाखवून—गोसाव्यानें नरेंद्राला हेमलतेचें नांव सोडून जुलेखेचें ग्रहण करण्यास सांगितलें, पण नरेंद्र त्या गोष्टीस कबूल झाला नाहीं. अर्थात् जलेखेची निराशा झाली.

रणांत यशवंतसिंहाचा पराभव झाला होता, त्याच्या मनांत सलत होता. ह्मणून तो पुन्हां जय तयारी करून आग्र्यास आला. नरेंद्र त्याचे बरोब होता. ह्यावेळीं औरंगजेबाच्या महालांत मीनाबाजा (Fancy Bazar) भरला होता. जलखेच्या साह्यानें नरें स्त्रीवेषानें तो बाजार पहावयास गेला व तेथील अपूर्व शोभा व राजकुलीन स्त्रियांचें सौंदर्य पाहून आनंदित हो असतां अकस्मात् हेमलता त्याच्या दृष्टीस पडल पण ती रजपुतणीच्या वेषानें असल्यामुळें, ती ती कीं आणखी कोणी? असा त्याला भ्रम पडला. हे लता तेथें येण्याचें कारण असें होतें कीं, ज्यावेळीं मलतेच्या बापानें नरेंद्राला वीरनगरांतून काढून लावि व हेमलतेचा विवाह तिच्या मनाविरुद्ध श्रीश्चंद्राब रोबर करून दिला, त्या वेळेपासून हेमलता फार दुः होती. तिला रात्रंदिवस नरेंद्राची चिंता होती. हेमल तेचा बाप नवकुमार मरून सर्व जमानदारी हेमलतेच्य नवऱ्यास मिळाली होती ह्यामुळें त्यास सर्व सुखें अनु कूल होतीं, पण पत्नीची अशी दुःखद स्थिति पाहू तिला तीर्थयात्रेस घेऊन गेल्यानें, कदाचित् आल तर गुण येईल, ह्मणून तो यात्रेस निघाला. मथुरा वृंदा- वनास जावयासाठीं तो आग्र्यास आला असतां तेथें एका रजपूत राजाच्या परिचयानें, त्याच्या कुटुंबाबरो

हेमलतेलाही त्यानें मीनाबाजार पहावयास पाठ-
लें. आणि तेथें नरेंद्रानें तिला पाहिलें, हें वर सां-
गितलेंच आहे. पुढें हेमलता मथुरेस गेल्यावर, तेथें
गंगा किनाऱ्यास नरेंद्राची व हेमलतेची गांठ पडली.
उभयतांनींही आपापली स्थिति एकमेकांस कळविल्या-
वर, नरेंद्राच्या प्रेमाचें बंधन, जें माधवीकंकण, तें सो-
न घेण्यास तिनें त्याला सांगितलें. त्यानेंही तें सोडून
गीरथींत फेंकून दिलें. व ह्याउपर परस्परास माऊ-
हिणीप्रमाणें मानावयाचें ठरविलें. प्रणयप्रेमाचें रूपां-
र बंधुप्रेमांत झालें! हेमलता आपल्या पतीबरोबर
ानंदानें राहूं लागली व नरेंद्रानें संन्यास घेऊन
ापल्या आयुष्याचे राहिलेले दिवस 'नारायण'
मोच्चारांत घालविले.

बिचाऱ्या जलेखेनें मात्र निराश होऊन आत्मघात
ला.

माधवी कंकण.

प्रकरण १ लें.

लहानपणाचा खेळ.

All the world's stage,
And all the men and women merely players:
They have their exists and their entrances
" Shakespeare. "

ग्रीष्म ऋतूंत एके दिवशीं संध्याकाळीं वीरनगरांत भागीरथीच्या पश्चिम तिरावर दोन मुलगे व एक मुलगी अशी तीन मुलें खेळत होतीं. ह्यावेळीं काळोख आपला अंमल हळुहळु भूमंडलावर बसवीत होता. तरी पण भागीरथीच्या त्या विशाल आणि आरशाप्रमाणें भासणाऱ्या पृष्ठभागावर पुष्कळशा नौका फिरत होत्या. गांवांतील दिव्यांचीं प्रतिबिंबें भागीरथीच्या चंचल वक्षस्थलावर क्रीडा करीत होतीं. नदीच्या कांठावरील सघन आंबराईत अंधाराचें एक छत्री साम्राज्य

झाल्यामुळें तेथें अगदीं शांतता मासत असून बाजूच्या झोंपड्यांतून गरीब शेतकऱ्यांच्या बायकांची गाणीं ऐकूं येत होतीं. शेतकरीलोक सारा दिवस कष्ट करून थकल्यामुळें हळुहळु गुरें हांकीत घरांकडे येत होते. पानवठ्यावरील एकूणएक तरुणी आपापल्या घागरी पाण्यानें भरून लगबगीनें घरांकडे निघाल्या होत्या. अशा ह्या निस्तब्ध अंधःकारांत विशाळ व शांततेनें वाहणारी भागीरथी निस्सीम प्रेमानें समुद्रास भेटावयास चालली होती.

वाळवंटांत खेळत असलेल्या मुलीचें नांव हेमलता. ती अत्यंत सुस्वरूप होती. तिचा तो उज्वल मुखचंद्रमा, सस्मित जेवणी व स्कंधप्रदेशावर रुळणारा केशकलाप पाहून ही अष्टवर्षा चंचलबाला कोणी देवलोकची अप्सराच ह्या गंगातटाकीं क्रीडा करीत आहे असें वाटे. दोहो मुलांतून एकाचें वय दहा वर्षांचें होतें. हा दिसण्यांत फार सुंदर तसाच चपळ असून पुरुषोचित तेजोमय नेत्र–युगुलांनीं मोठा पाणीदार मुलगा दिसत असे. ह्याचें नांव नरेंद्र. हा एवढ्याच वयांत कधींकधीं रागानें लाल होऊन जाई. पहाणारांला नरेंद्र हा एक तेजस्वी पण परतंत्र मुलगा हेमलतचा भाऊच वाटे. तिसरा श्रीश्चंद्र. ह्याचें वय बारा वर्षांचें. पण दिसण्यांत मोठा गंभीर आणि बुद्धिमान होता.

नरेंद्र व श्रीश्चंद्र हे दोघेही वाळचें घर

करण्यांत गुंतून गेले होते व त्यापैकीं कोणाचें घर चांगलें होतें, हें हेमलता पहात होती. नरेंद्र वाळूचें घर करण्यांत मोठा चतूर पण फार गडबड्या होता. जेव्हां हेमलता ह्याच्या जवळ उभी राही, तेव्हां त्याचें घर चांगलें होई, पण जेव्हां ती श्रीश्चंद्राकडे जाई, तेव्हां नरेंद्राचें मन व्यग्र होऊन त्याचा हात कांपूं लागे आणि यामुळें त्याचें घर मोडून जाई. हेमलते-कडे नुसती तपासणी होती. म्हणून ती कधीं नरेंद्राक-डे जाई आणि कधीं श्रीश्चंद्राकडे जाई. त्यामुळेंच बिचाऱ्या नरेंद्राचें घर दोन चारदां मोडून गेलें.

" नरेंद्र, एकदां पुन्हां घर करच. क-चित् सांगतें. मी श्रीश्चंद्राकडे ह्या खेपेस नाहींच जा-यची " असें हेमलता ह्मणाली. तें ऐकून नरेंद्रानें आश्रू उत्सुकतेनें पुसले व घर करण्यास प्रारंभ केला. " घर बहुतेक संपतेंच आहे, तेव्हां नरेंद्रच ह्यावेळीं जिंकेल. पण बिचारा श्रीश् एकटा आहे, त्याच्याकडे जर मी गेल्यें नाहीं, तर तो आपल्या मनांत काय ह्म-णेल असें ह्मणून आपले केस सांवरीत हेमलता श्रीश्चं-द्राकडे गेली. श्रीश्चंद्र मोठा चलाख किंवा वालुका-गृह निर्माण करण्यांत अति कुशल होता, असें नाहीं. तरी पण तो दृढनिश्चयी असल्यामुळें ह्यावेळीं त्यानें चांगलें घर केलें होतें.

नरेंद्र अजूनही आपलें घर करीतच होता. एकदां त्यानें आपल्या घराकडे पहावें व एकदा हेमलतेकडे पहावें. हेमलता श्रीश्चंद्राकडे गेलीसें पाहून त्याला फार राग आला व त्यामुळें त्याचा हात कांपूं लागून त्याचें घर मोडलें! श्रीश्चंद्राचा विजय झाला आणि आपण हरलों, हें पाहून नरेंद्राला फार वाईट वाटलें. व त्यानें रागानें दोन्ही मुठींत वाळू घेऊन ती हेमलता व श्रीश्चंद्र ह्यांजकडे जोरानें फेंकली व आपण मोठ्यानें रडूं लागला.

नरेंद्रनाथ! सावध हो. ह्या जगांत केवळ गुणावरच मनुष्याला जय मिळत नाहीं. तर त्याला दूरदर्शकत्वही लागतें. आज केवळ वाळूचें घर करण्यांत तूं हरलास. पुढें संसार सुखाचें तरी असें न होवो! पहा, कुठें ह्या जगांतल्या जीवन खेळांतच श्रीश्चंद्र तुला हरवून तुझें सारें ऐश्वर्य व हेमलता न जिंको!

नरेंद्राचें रडें ऐकून भागीरथीच्या घांटा वरून एक सतरा वर्षांची विधवा वर आली. ही श्रीश्चंद्राची वडील बहीण असून हिचें नाव शैवालिनी. ही येतांच हिनें आपल्या भावाला दरडाविलें. पण तो म्हणाला, "छे छे ताई, मीं कांहीं त्याला मारिलें नाहीं. त्याच्यानें वाळूचें घर होईना, म्हणून तो रडतो. पाहिजे तर हेमलतेला विचार."

"तर मग मी करून देईन, अँ!" असें म्हणून शैवालिनी दोघाचेंही समाधान करीत निघून गेली. श्रीश्चंद्रही आपल्या बहिणीच्या मागोमागच निघून गेला. व त्यायोगानें हेमलता व नरेंद्र ह्यांचा झगडाही पण आयताच मिटला. नरेंद्राचें रडें पाहून हेमलतेला फार वाईट वाटलें व ती डोळ्यात आंसवें आणून म्हणाली, " नरेंद्र! हें काय बरं ? मी सारावेळ तुजजवळच तर बसल्ये होत्ये. एकदाच काय तें श्रीश्चंद्राकडे गेल्ये. त्याच्याकरितां असं काय म्हणन रडावं ?

नरेंद्राचा राग गेला व पुन्हां तीं दोघेंही खेळूं लागलीं. अहाहा! बाल्पणची प्रीति किती तरी पण पवित्र आणि निष्कपट! नाहीं तर विद्वतेचा आणि शहाणपणाचा टेंभा मिरविणारे व मावाशीं वंचना करून आपल्याच सुखाची चेष्टा करणारे आम्ही! निष्कपट प्रेम किंवा बंधप्रीति ह्मणजे काय हें आह्माला माहित सुद्धां नाही !! आपल्या बहिणीस रडतांना पाहून आपणही रडणारीं बालकें काणीकडे ? आणि बहिण कष्टतर स्थितीत दिवस चालवीत असतां सुखानें महालांत लोळणारे आपण कोणीकडे ? असो. ह्यानंतर ह्या प्रेमळ फुलांमध्यें आकाशांत नक्षत्रें कशीं उगवतात, तीं फुलें आहेत कीं माणसें आहेत. नरेंद्र, त्यांतून एखादें मजकरितां आणशील का ? हा पहा, चांदमामा उगवत

आहे, त्याला प्रकाश कोठून मिळतो, गंगेच्या पली-
कडे गेल्यास त्यास धरतां येईल? इत्यादि अनेक गोष्टी
झाल्या. पण वाचकहो, ह्या गोष्टींवरून आपणाला
एका गोष्टीचा परिचय द्यावयाचा आहे, तो हाच की
ह्या जगांत आपण सर्वजण वरील बालक बालिकेच्या
गंगातटावरील वालुकागृहाबद्दल झालेल्या कलहाप्रमाण
क्षुद्र गोष्टींवरूनही कशी मांडामांडी करतों व चंद्राला
धरण्यासारख्या मिथ्या कल्पना करून कोठें जाऊन
पडतों! वाचकहो, विचार करा. परमेश्वराच्या ह्या जग-
न्नाट्यशाळेंत पात्रांची काय पण गर्दी आहे! तरी,
प्रत्येकजण आपापल्या नेमलेल्या सोंगाची बतावणी
किती बिनचूक करीत आहे! ह्या त्याच्या अलौकिक
रचनेचा कोणाला तरी पार कळला आहे!

प्रकरण २ रें.

धूर्त जमीदार.

Through tattered clothes
small vices do appear,
Robes and furred gowns hide
all. Plate sin with gold,
And the strong lance of
justice hurtless breaker;
Arm it in rags, a pigmy's
straw doth pierce it.
" Shakespeare. "

नरेंद्रनाथाचा बाप वीरेंद्रनाथ हा मोठा धनाढ्य आणि प्रतापशाली जमीदार होता. ह्यानेंच प्रथम ह्या गांवीं आपला भव्य वाडा आणि प्रचंड जमीन जुमला उभारून ह्या गांवास आपल्या नामानुसार वीरनगर हें नांव दिलें होतें. ह्याच्या प्रेमळ स्वभावामुळें सर्वांना हा प्रीय वाटे. तरी पण त्याच्या पराक्रमामुळें त्याचा सर्वांवर मोठा दाब असे. त्या वेळचे बंगाल्यांतील पठाण जहागीरदार व स्वतः बंगालचे सुभेदार देखील त्याचा मोठा मान ठेवीत.

लहानपणीं वीरेंद्रनाथाबरोबर नवकुमार मित्र नामक एक गरीब मुलगा शिकत असे. त्याची सुशीलता आणि हुशारी पाहून वीरेंद्रनाथ त्याच्यावर फार प्रीति करी. तरूणपणीं जेव्हां वीरेंद्राची जमीनदारी स्थापन झाली, तेव्हां त्यानें आपल्या मित्राला आपला दिवाण केला. नवकुमारमित्रही फार हुशारीनें व दक्षतापूर्वक आपलें काम पाहूं लागला.

नवकुमार स्वार्थपरायण तर होताच, पण अति नीच प्रकृतीचा नव्हता ! आणि म्हणूनच त्यानें वीरेंद्राचे चार पांचच गांव आपल्या नांवानें करून घेतले ! भयानें म्हणा किंवा कृतज्ञताबुद्धीनें म्हणा, वीरेंद्राची जास्त हानी त्यानें केली नाहीं. वीरेंद्राच्या मरण समयीं त्याचा मुलगा नरेंद्र फार लहान असल्यामुळें वीरेंद्रानें आपल्या जमिनदारीचा व पुत्राच्या पालनपोषणाचा भार आपल्या दिवाणावरच सोंपविला होता.

दिवाण नवकुमार मित्र जन्मदरिद्री असून वीरेंद्रनाथाच्या कृपेनेंच त्याला बरे दिवस आले होते. तरी ती सारी कृतज्ञता विसरून त्यानें हळहळू सारीच जमिनदारी घशांत उतरण्याचा बेत केला. वीरेंद्राचा मुलगा नरेंद्र हा अति लहान असतांनाच त्याची आई त्याला सोडून परलोकीं गेली होती, पुढें बापही विष्ण-

त्याला नवकुमाराच्या स्वाधीन करून तिच्याच भेटीस गेला. जवळचे नातेवाईक कोणीच नव्हते; म्हटलें तरी चालेल. एक दोघे होते, ते नवकुमाराच्या विचारानें चालणारे होते. नवकुमाराचा हा आपस्वार्थी व अति नीच विचार कोणासच समजला नाहीं. हा सारी जमिनदारीच दडपून बसेल असें कोणासच वाटलें नव्हतें आणि प्रथम त्याचाही विचार असा नव्हताच. वीरेंद्राच्या हयातींतच त्यानें चार पांच गांव आपल्या नांवानें करून घेतले होते पण आतां तो परलोकवासी झाल्यामुळें नवकुमाराचा लोभ वाढला व हळुहळु तो मायाचक्राच्या फेऱ्यात सांपडला ! ! त्यानें विचार केला कीं अज्ञान मुलाच्या नांवें जमिनदारी असल्यानें कदाचित् कांहीं गडबड होईल, म्हणून आपल्या नांवानेंच ती करून घेतल्यावर कोणत्याही प्रकारची भीति धरायला नको. कांहीं दिवसांनीं आपली कन्या हेमलता हिचें नरेंद्राशीं लग्न करून दिल्यावर अनायासें सर्व जमिनदारी पुन्हां नरेंद्राला मिळेल. अशा विचारानें सर्व जमिनदारी आपल्या नांवानें करून तो खाल्ल्या घरचे वासे मोजणारा नराधम सर्व कारभार स्वतः करूं लागला.

ह्या वेळीं बंगालच्या सुभेदाराच्या दरबारांत त्याच्या ताब्यांतील सर्व जमिनदार व जहागिरदार ह्यांच्या

तर्फेचे वकील रहात असत व ते समयपरत्वें सुभेदाराला आपापल्या धन्यातर्फे पुष्कळ नजराणा देऊन त्यांचें हित साधीत. ज्यांच्याकडून वकील नसला, त्यांचें फारसें धरें होण्याचा संभव नव्हता. वीरनगरच्या मृत वीरेंद्रनाथाचा वकील सध्या नवकुमाराचा पैसा खात होता, म्हणून त्याच्या लाभाचा यत्न तो करूं लागला. त्यानें हळूच दरबारच्या मुख्य मुलकी कामगाराला सांगितलें कीं 'वीरेंद्राच्या मृत्युपश्चात् त्याच्या जमिनदारीचा वसूल ठीक वेळेवर होत नाहीं, यामुळें नवकुमार नांवाचा एक सभ्य गृहस्थ आपल्याजवळून सारे पैसे दरबारच्या खजिन्यांत भरीत आहे. सध्यां हा गृहस्थच वीरेंद्राचा जवळचा नातलग व त्याच्या कुटुंबाचा पालनकर्ता आहे.' वकिलाचा हा निरोप कोरडा नव्हता. ह्या निरोपाबरोबर पांच हजार रुपये मुलकी कामगाराच्या हातावर पडले व बिचाऱ्या पोरक्या नरेंद्राशीं वंचना करणाऱ्या त्या नवकुमाराचें नांव त्यानें वीरेंद्राच्या जागीं घातलें. त्यांच्या ह्या दुष्ट बेताआड येणारें कोणीं नसल्यामुळें तो अगदीं निर्विघ्न-पणें पार पडला.

आतां नवकुमारमित्र वीरनगरचे जमिनदार झाल्यामुळें त्यांच्या डोक्यांत नवीन नवीन कल्पना येत होत्या. ज्या नरेंद्राच्या बापाला हा पूज्य मानीत

होता, ज्या नरेंद्राचें हा पूर्वी अत्यंत प्रेमानें पालन करीत होता, तोच नरेंद्र आतां ह्या वनकाच्या डोळ्यात सलूं लागला. नवकुमाराच्या समोर जरी नव्हे, पण त्याच्या परोक्ष तरी लोक " नरेंद्राच्या बापाची जमिन-दारी आहे " म्हणून म्हणत व नवकुमाराला कोणी जमिनदार म्हणत नसत. इत्यादि कारणांमुळें नवकुमार अगदीं तापून जाऊन म्हणत असे कीं " जमिनदारी जी मीं आपल्या नांवें करून घेतली ती ह्याकरिता कीं काय ? ह्याला मुलगी देऊन जमिदारीचा मालक जरी केला तरी लोक माझें नांव न घेता ह्यानें आपल्या बापाची जमिनदारी मिळविली म्हणून म्हणतील ! काय पण आश्चर्य ? एवढ्या खटाटोपानें मिळविलेल्या माझ्या मालमत्तेचा मालक हा भिकार पोरगा होऊन हा नवकुमार त्याचा दिवाण होणार, अं ?" असा विचार करून त्यानें आपलें नांव चिरस्मरणीय करण्याची एक शक्कल शोधून काढली. ती अशी कीं " आपण एखाद्या गरिबाच्या मुलाबरोबर आपली मुलगी हेमलता हिचा विवाह करून द्यावा. म्हणजे लोक आपोआपच म्हणतील कीं हेमलतेच्या बापाची मालमत्ता जांवयास मिळाली आहे. ह्या युक्तीनें वीरेंद्र व नरेंद्र ह्या दोघांचीही नावें लोकांच्या स्मरणांतून नाहींशीं होतील." धूर्तशिरोमणि नवकुमार असा

विचार करूनच राहिला नाहीं, तर त्या उद्योगासही लागला. जवळच्याच एका गांवांत गोकुळचंद्र नामक एक सभ्य गृहस्थ नुकताच स्वर्गवासी झाला होता व मागें त्याची एक विधवा कन्या, एक मुलगा आणि थोडकीशी पुंजी होती. मुलाचें नांव श्रीश्चंद्र व मुलीचें शैवलिनी. हीं दोन्हीं मुलें अनाथ जाणून व विशेषतः मुलगा चांगला पाहून त्याला आपली हेमलता देण्याच्या हेतूनें नवकुमार त्यास आपल्या घरीं घेऊन आला. शैवलिनी कधीं कधीं भावाला भेटण्यास वीरनगरास येत असे व एक दोन दिवस राहून परत जात असे. बिचारीला ह्या जगांत भावावांचून दुसरें कोणीं नव्हतें !

प्रकरण तिसरें.

बालविधवा.

Came pensive nundenant and pure,
Sober, steadfast and demure.

“ Milton.”

शैवलिनी संध्याकाळीं श्रीगंगेच्या घाटावरून परत आली हें आम्ही पहिल्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. ही धर्मभीरु सुशील विधवा सायंकाळीं आपली पूजा वगैरे आटोपून मुलांना जवळ घेऊन सुबोधपर गोष्टी नेहमीं सांगत असे. बोधपर व मनोरंजक गोष्टी सांगण्यांत हिची अगदीं ख्यातीच झाली होती. बिचारीला मुलबाळ कांहीं नव्हत. पण सर्व मुलांना ही अतीच जीव प्राण करी. आणि मुलेंही पण तिला फार चाहत. शैवलिनी गोष्टी सांगायला बसली कीं सर्व मुलें तिजभोंवतीं येऊन बसत. व ती सर्वांना प्रेमानें आपल्याजवळ घेऊन भारतांतील अत्यंत रुचिर कथा सांगत असे.

शैवलिनीचा बाप साधारणतः बऱ्या स्थितींतील गृहस्थ होता. ही व हिचा लहान भाऊ श्रीचंद्र ह्या दोघांनाही त्यांच्या पित्यापासून चांगलें शिक्षण मि-

झालें असून हीं दोन्हीं मुलें नखशिखांत आपल्या आईची प्रतिमूर्ति होती. शैवलिनी बालपणातच विधवा झाली असल्यामुळें पतिसौख्यानें वारें देखील तिला ठाऊक नव्हतें. जणुकाय ती तें विसरूनच गेली होती. संसार दुःखरूप आहे की सौख्यसागर आहे ह्याची तिला कल्पनाही नव्हती. केवळ कौमार्यव्रत किंवा चिरकाल वैधव्य दीक्षा धारण करून आईबापाची सेवा व आपल्या लहानग्या बंधूचें लालनपालन करणें हाच तिचा नित्य उद्योग होता.

शैवलिनीच्या बापाच्या मृत्यूनंतर ह्या गरीब कुटुंबास उतरती कळा लागली. भाग्यरवीचा अस्त होऊन दारीद्र्यान्धकार पडला व दोन प्रहरची भ्रांति कशास म्हणतात, ह्याचा अनुभव बिचाऱ्या शैवलिनीस व तिच्या आईस येऊं लागला पण ती शान्त व नम्र शैवलिनी धैर्यहीन झाली नाहीं. तिनें सकाळीस उठून स्नान व देवपूजा आटोपून मोलमजुरी करावी व त्यायोगानें आपली वृद्ध आई व लहान बंधु ह्यांचें पोषण करावें. तिचें तें कृष्णकेशमंडित अमळ श्यामवर्ण असें मुखकमल व बालसूर्याच्या शांत व रमणीय किरणासारखे नेत्रद्वय हीं पाहून तिच्या हृदयांतील भ्रातृस्नेह स्पष्ट दिसत होता. जणुंकाय सौख्यरवीचा अस्त झाल्यामुळें बिचारी शैवलिनी सध्याकालीन शां-

तिरूपीं आवरणानें मुख झांकून अधोवदन झाली होती !

ह्या बिकट संसारांत शैवलिनीला कशाचीही इच्छा नव्हती. तिच्या लहानशा घराच्या आसपास असलेले आम्रवृक्ष हेच तिचे सहचर व सभोवतीं असलेल्या लता ह्याच तिच्या स्नेहाभिलाषिणी सख्या. ह्या शिवाय तिला इतर सख्या किंवा सहचर नको होते. आम्रवृक्ष व लता हीं जशीं प्रकृतीचीं लेंकरें, त्याचप्रमाणें शैवलिनीही प्रकृतीचें लेंकरू. जगदाभिराम आत्माराम जसें त्यांचें पोषण करी, तसेंच हिचेंही करी. शैवलिनी बालविधवा होती, तरी पण प्रेमाकांक्षिणी नव्हती पण होय; अमूकच वस्तूवर तिचें प्रेम होतें असें नाहीं. हें सारें जगच तिचें प्रेमपात्र होतें. तव्हां शैवलिनी प्रेमाकांक्षिणी नव्हती, असें कसे म्हणतां येईल ? वृद्ध मातेची सेवा करून तिचे आशीर्वाद घेण्यांतच तिला संतोष वाटे. लहान बंधु श्रीश्चंद्र ह्याला आपल्या पुढ्यांत घेऊन उडिवाळपणानें त्याचे लाड करीत असतां तो आनंदानें तिला " आक्का आक्का " म्हणून चुंबीत असे व ह्यामुळें बिचाऱ्या त्या शैवलिनीचें हृदय प्रेमानें उचंबळून आनंदाश्रूंनीं तिचा पदर भिजून जात असे. संध्याकाळचे वेळीं नदीच्या प्रशस्त व शांत अशा वक्षस्थलावर नक्षत्रमाला व रजनीनाथ चंद्र ह्यांच्या प्रकाशानें सुशोभित झालेल्या आकाश

मंडलाचें प्रतिबिंब पाहून, त्या जगच्चालकाच्या कर्तृत्वाची तिला आठवण येई व ज्यानें हीं नक्षत्रें, आकाशमंडळ, चंद्र आणि कलकलनादिनी नदी उत्पन्न केली, त्यानेंच पक्षांला पिली व मला श्रीश् (श्रीश्चंद्र) दिला आहे, असे तिला वाटे. शैवलिनीला जरी पति किंवा पुत्र नव्हता, अथवा तिच्या प्रेमाचा साथीही कोणी नव्हता; तरी पण वर्षाकाळांतील नदीच्या अखंड प्रवाहाप्रमाणें तिचा प्रेमप्रवाह चोहोंदिशेकडून सारखा चालला होता. एवढेंच नव्हे, तर पशु पक्षीही तिचें प्रेमभागी होते. वाचकहो ! ह्यापेक्षां जास्त ती प्रेमाकांक्षा काय असते ? जगत जसें विस्तृत, समुद्र जसा गंभीर व आकाश जसें अनंत, त्याचप्रमाणें शैवलिनीचें प्रेमही विस्तारमय, गंभीर व अनंत होतें.

ह्याप्रमाणें कांहीं दिवस चालले असतां शैवलिनीची आई स्वर्गस्थ झाली. श्रीश्चंद्राचा नम्र स्वभाव, सुंदर रूप व उत्तम कुळ पाहून नवकुमारानें आपल्या कन्येस हाच वर योग्य आहे असा विचार करून त्याला आपल्या घरीं नेलें. श्वशुरगृह सोडून शैवलिनी ज्याच्याकरितां इतके दिवस येथें रहात होती तो श्रीश्चंद्र वीरनगरास गेल्यामुळें तीही आपल्या श्वशुरगृहीं जाऊन कालक्रमणा करूं लागली.

× × × ×

प्रथम प्रकरणांत सांगितलेली घटना घडल्यावर दुसरे दिवशींच ती आपल्या सासरास निघून गेली.

प्रकरण चौथें.

हेमलता कोणाची ?

If love be folly the severe devine
Has left that folly though he censures mine.
" Dryden"

पूर्वींच्या घटनेस पांच वर्षें होऊन गेलीं. आणि एवढ्या काळांत बराच फेरफार झाला. श्रीश्चंद्र आतां सतरा वर्षांचा झाला आहे, तरी त्याचा पूर्वींचा गंभीर स्वभाव अजून तसाच आहे. नरेंद्रालाही पंधरावें वर्ष लागलें असून ह्याचा चेहरा श्रीश्चंद्रापेक्षां अंमळ रागीट पण रंग गोरा आणि मोहक आहे. त्याचप्रमाणें शरीरकाठीही उन्नत आणि तेजस्वी. नवकुमार कधीं कधीं त्यांला लावून बोलत असे, पण तें ह्याला आतां सहन होईना. आजंपर्यंत जें त्यानें सहन केलें, तें केवळ एका हेमलतेच्या आशेनें. नाहींपेक्षां हें सहनशी-

लतेचें जाळें त्यानें केव्हांच तोडून फेंकलें असतें. मार-वाडांतील निर्जल प्रदेशांत जसा एखादा झरा प्रीय वाटावा, तशी हेमलतेची अनुपम्य अमृतवाणी आणि चंद्रमुख नरेंद्राच्या हृदयास शांत करीत असे. हेमलते-च्या प्रेमासाठींच नवकुमाराचीं बोलणीं सहन करून तो आपला राग आवरीत असे.

हेमलतेला नुकतेंच तेरावें वर्ष लागलें होतें. सूर्योदयापूर्वीं अरूण आपला अंमल जमा बसवितो, तद्वत तिचें यौवन हळुहळु वाढत होतें. अत्यंत दाट व लांब अशा काळ्या भोर केसांचा समुदाय तिच्या वक्ष-स्थळावर व स्कंधप्रदेशावर मोठ्यानें रुळत असून त्या-मुळें तिच्या त्या गोऱ्या आणि टवटवीत मुखमंडळास अत्यंत शोभा आली होती. तिचे ते हरीण बालकांच्या डोळ्यांसही लाजविणारे डोळे व इतर अवयव यांनीं बालपणाची आपली स्वाभाविक चंचलता टाकून शांत आणि गंभीर भाव धारण केला होता. असो; अत्यंत सुंदर पुष्पांसही एकीकडे सारणाऱ्या हेमलतेच्या को-मल हृदयांत आतां जे नवीन तरंग उठत होते त्यांचें वर्णन करावयास आमची लेखणी असमर्थ आहे. नरेंद्राशीं गोष्टी करण्यांत हेमलतेला मोठा आनंद वाटे, तथापि नरेंद्राच्या जु-वळ येतांच तिचें भान नाहींसें होऊन हृदय विदिर्ण होई व लज्जेमुळें खालीं पहात हळुहळु त्याशीं ती कांहीं बोलून

त्याच्याकडे चोरदृष्टीनें पाही. अहाहा! ते विशाळ नेत्रद्वय नरेंद्राच्या मुखदर्शनाकरितां किती तरी भुकेले होते! हेमलता अज्ञन पार होती. तिला प्रीति ह्मणजे काय, हें माहित नव्हते. परंतु सायंकाळीं जेव्हां नरेंद्र नौकेवर बसून गंगेच्या प्रशस्त पात्रावरून इतस्ततः क्रीडा करी, तेव्हां ही प्रेमळ बालिका आपल्या माडीच्या खिडकींतून त्याजकडे कां बरें टक लावून पहात असे? स्वच्छंदानें नौका क्रीडा करीत दृष्टीच्या आटोक्यापलिकडे नरेंद्र गेला असताही हेमलता कां बरें त्याच्या मागोमाग पहात उभी राही? नरेंद्र येऊन तिला "हेम" ह्मणून हांक मारतांच तिला का बरें आनंदानें भरतें येत असे? एकदोन दिवस नरेंद्र कोठें बाहेर गांवीं गेल्यास हेमलतेस चुकल्यासारखें का बरें होई? हेमलतेच्या मनांत काय होते, हें कोणासच ठाऊक नव्हतें. कपोत पक्षाची मादी आपल्या पिलांना जशी मोठ्या काळजीनें लपवून ठेविते, त्याचप्रमाणेंच ह्या नूतन उत्पन्न झालेल्या मनांतील भावाला बिचारी बालिका आपल्या हृदयांत लपवून ठेवी. पण वस्त्रानें झाकलेला अग्नि जसा सर्व वस्त्र अग्निमय करून सोडतो, तद्वत नरेंद्राच्या चिंतनानें हेमलतेचें मन नरेंद्रमय करून दिलें तरी पण तिनें आपल्या मनांतील भाव कधींही उघड होऊं दिला नाहीं.

नवकुमार अझून हेमलतेला बालिकाच समजत होता. उदार, आणि निष्कपट आचारें हेमलतेचें मुख

पाहिल्यावर सर्वांनाच ती अजाण अशी बालिका वाटे. आणि ह्मणूनच तिच्या विवाहास तिचा बाप विलंब लावीत होता. बुद्धिमान श्रीश्चंद्र सुद्धा तिच्या मनांतील गोष्ट समजूं शकला नाहीं. समजणार कसा ? हेमलता त्याच्याशीं अगदीं निष्कपट व सरळ भावानें बोलत असे आणि नरेंद्राशीं संकोच वृत्तीनें. व तेंही कधीं कधीं.

श्रीश्चंद्राजवळ हेमलता दररोज कांहीं वाचायाला शिकत असे. ती निर्भिडतनें त्याला पाठ केलेले धडे ह्मणून दाखवी व त्याजजवळून नवीन पाठही घेई. पण जर कां एखादे वेळीं तिला शिकवायाला नरेंद्र आला तर तिचें मन अगदींच गोंधळून जाई. नरेंद्रासमोर एक अक्षर देखील ती वाचूं शकत नसे. ह्यावरून श्रीश्चंद्राला काय वाटावें बरें ? तो आपल्याच मनांत मांडे खात होता ! पण वाचक हो , हेमलतेचें प्रेम कोणावर ! श्रीश्चंद्रावर कीं नरेंद्रावर ?

प्रकरण पांचवें.

प्रयाण.

Death, only Death can break the lasting chain.

'Pope.'

एक दिवशीं संध्याकाळीं श्रीश्चंद्र व नरेंद्र एका नौकेंत बसून गंगेवर मजेनें हवा खात इकडे तिकडे फिरत होते नरेंद्र स्वतः वल्हें हातीं घेऊन नाव वल्हवीत होता व श्रीश्चंद्र स्वस्थ बसून सायंकाळची शोभा पहात होता. ह्या दोघांत निष्कपट असें प्रेम मुळींच नव्हतें. वर लिहिल्याप्रमाणें नौकाक्रीडा चालली असतां अकस्मात् नरेंद्राच्या हातांतून वल्हें सुटून तो नौकेंतून पडतां पडतां वाचला. तें पाहून श्रीश्चंद्र त्याकडे पाहून हंसला. "हेमलता माडीवरून आमच्या नौकेकडे पहात आहे, हें ह्याला ठाऊक असूनही हा आपली चेष्टा करितो" यामुळें नरेंद्राला फार वाईट वाटलें व त्यानें श्रीश्चंद्राला कांहीं म्हटलें. क्षुल्लक कारणामुळेंही कधीं कधीं भयंकर परिणाम घडतात, तसेंच आज झालें! म्हणजे ह्या दोघांत वाग्युद्धास आरंभ झाला! श्रीश्चंद्र स्वभावानें गरीब असल्यामुळें नरेंद्राच्या उपरास प्रत्युत्तर तो अगदीं शांततेनेंच देत होता. नरें-

द्राच्या उतावळ्या स्वभावाला तें रुचेना. तो लगेच त्याच्याशीं हमरीतुमरीवर आला. श्रीश्चंद्राला त्यामुळें फार राग आला व तो " तुजसारख्या नीच स्वभावाच्या मनुष्याशीं बोलण्यांत देखील अपमान आहे " असें म्हणत दुसरीकडे पाहूं लागला. नरेंद्राला हें त्याचें बोलणें फार झोंबलें त्याचें तोंड रागानें लाल झालें व डोकें संतापानें अगदीं भणाणून गेलें. त्या संतापांत तो श्रीश्चंद्राच्या अंगावर धांवला पण चांदणीमुळें त्याचा पाय निसरून तो पडला. अंग बरेंच ठेंचलें. ह्यामुळें तर तो अगदींच खजिल झाला ! ह्या अपमानापेक्षां मरण बरें, म्हणून त्यानें भागिरथींत उडी घतली ! पण ह्यावेळीं देखील नौकेच्या कांठानें त्याचें मस्तक ठेंचलें व तो निचेष्ट होऊन पाण्यांत पडला ! उदारचित्त श्रीश्चंद्र नरेंद्राची ही दशा पाहून स्वस्थ बसला नाहीं. त्यानें दुसऱ्या वल्हविणाऱ्या खिवरांची वाट न पहातां आपण स्वतः नदींत उडी टाकून नरेंद्राला वर काढिलें व नौकेंत आणून त्याला सावध केलें. नरेंद्र सावध झाला, तेव्हां श्रीश्चंद्र हळूच पण शांततेनें त्याला म्हणाला— " गड्या, आपणा दोघांत कलह होऊन आपलें वैमनस्य यावें असें माझ्या मनांत बिलकुल नसतांही तूं विनाकारण माझ्याशीं भांडतोस, याला काय म्हणावें बरें ! " या स्नेहोचित बोलण्यानें देखील नरेंद्राचें समाधान न होतां उलटें ज्याचा आपण मनःपूर्वक

कंटाळा करतो त्याच्या हातानेंच आपला प्राण वांचला हें पाहून तर त्याला अतिच आत्मघृणा झाली व तो कांहींच बोलला नाहीं.

विचार न करितां श्रीशचंद्राबरोबर केलेल्या क्षुल्लकशा कलहाचें फळ बिचाऱ्या नरेंद्राला त्याच दिवशीं मिळालें ! सायंकाळीं नवकुमारानें नरेंद्राला बोलावून तिरस्कारयुक्त मुद्रेनें म्हटलें.—

"श्रीशचंद्राबरोबर भांडतांना तुला लाज वाटत नाहीं. कांहीं तरी आपला व त्याचा विचार कर. मुर्खा, तूं त्याची बरोबरी करायला पहातोस !"

ह्या वेळपर्यंत केवळ हेमलतेच्या आशेवर नरेंद्रानें सारें सहन केलें होतें, पण आज नवकुमाराची ही गर्वोक्ति त्याला सहन झाली नाहीं. तो संतापानें दांत ओठ खात म्हणाला—" खरोखरच मी श्रीशच्या बरोबरीचा नाहीं. मी वीरेंद्रकुमार जमिनदाराचा मुलगा आणि तो परान्नानें पुष्ट झालेला यःकश्चित कंगाल ! त्याची आणि माझी बरोबरी !"

नवकुमारानें नरेंद्राच्या तोंडावाटे इतके कडक उत्तर ह्या वेळपर्यंत कधींच ऐकिलें नव्हतें तो ह्या उत्तरानें विस्मित होऊन रागानें म्हणाला—" कारट्या, कोणाशीं बोलत आहेस, हें ठाऊक आहे का ?

निंदित स्वरानें नरेंद्र म्हणाला, हो हो बा जमीनदार साहेब, तें मला पूर्णपणीं ठाऊक आहे. ज्या भिकारड्यानें

माझ्या बापाच्या अन्नावर आपला पिंड वाढवून कालसर्पा-प्रमाणें त्यालाच दंश केला, आणि आतां त्याचें सर्वस्व दाबण्याच्या विचारांत जो आहे, त्याच्याशींच मी बोलत आहें, बरें का ? " असें बोलत असतां त्या पंधरा वर्षांच्या तरूणाच्या दृष्टींतून क्रोधाग्नीच्या ठिणग्याच पडतील कीं काय असें दिसत होतें.

नवकुमार स्तब्ध झाला. त्याची कांहीं चमत्कारी-कच स्थिति झाली, पण ती सांवरुन तो कर्कश स्वरानें त्याला म्हणाला—" कृतघ्ना, तुझ्या बापानें आपल्याच मूर्खपणानें आपली जमिनदारी हारविली. अनाथ जाणून तुझें आज-पर्यंत संगोपन केलें; तो उपकार विसरून हरामखोरा, आज तूं मला हा जबाब दिलास काय ? निघ, चालता हो आमच्या घरून. "

" हो हो, हा मी चाललों पहा. पण लक्षांत ठेव, ह्या जन्मीं जरी नाहीं, तरी पुढील जन्मीं ह्या नीचतेचें फळ तुला मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. " असें ह्मणून नरेंद्र रागानें तेथून गंगातिराकडे जावयास निघाला.

तो वेळ संध्याकाळचा होता. हेमलता गंगातिरावर एकटीच फिरत होती व वर झालेलें वर्तमान तिला सम-जलें होतें. तिला पाहून नरेंद्र दचकून एकदम उभा राहिला. त्याच्या अंगात कापरें भरलें व आरक्त झालेल्या नेत्रांतून अश्रूही बाहेर येऊं लागले, तरी तें सर्व सांवरून तिच्या-जवळ जाऊन प्रेमानें तिचे दोन्ही हात धरून [illegible]

स्वरानें तो तिला म्हणाला-हेमलते, मी जातो. तुझी माझी आतां हीच भेट. नरेंद्राच्या मुखावाटे इतके शब्द निघतात न निघतात तोंच वज्रबाणानें वृक्ष जसा उन्मळून पडावा तशी हेमलता मूर्च्छित होऊन जमिनीवर पडली. नरेंद्रानें हळूहळू तिला सावध करून नीट बसवून म्हटलें, "हेमलते, हें रडें सध्यां आटोपून माझी गोष्ट ऐक. रडायला पुढें पुष्कळ वेळ आहे. हें पहा, तुझी माझी आतां पुन्हां भेट होणें नाहीं. मी कोठें जाईन, काय करीन, हें माझें मलाच माहित नाहीं. आणि त्याची मला चिंताही नाहीं. ईश्वर मेलेल्यास जागा देतो, मग मी तर जिवंत आहें मलाही कुठें तरी जागा मिळेलच. पण हेमलते, आजपासून मी एकटा झालों. मी जेथें जाईन तेथें नाना जातीचे लोक, नाना समाज आपापल्या इष्टमित्रांसह कालक्षेप करतांना मला दिसतील, पण हेमलते! माझी काळजी घेणारा त्यांत कोणीही रहाणार नाही. हाय! ह्या नरेंद्राच्या मरणकाळीं दुःखानें अश्रू गाळणारें सुद्धां कोणी राहिलें नाहीं ना!

हा वेळपर्यंत पदरानें डोळे पुशीत हेमलता उभी होती, ती नरेंद्राचें वरील भाषण ऐकून स्फुंदस्फुंदून रडूं लागली.

नरेंद्र तिला शांततेनें म्हणाला—हेमलते, शांत हो. आज मला जें दुःख होत आहे, तें माझें मलाच ठाऊक. जगांत मजवर प्रीति करणारें तुझ्यावांचून दुसरें कोणी

नाहीं. ह्या कष्टमय अंधःकारानें व्याप्त झालेल्या जीवनं-रूपीं आकाशांत तूं मात्र मला एक नक्षत्र दिसत होतीस. आणि म्हणूनच मी तुजकडे मात्र आशेनें पहात होतों. पण हेमलते, तो भास होता! तें खरोखर स्वप्न होतें! असें आज माझ्या लक्षांत आलें. सर्व जग मला अंधार-मय झालें! आणि त्या निबिड अंधारांतच मी आतां यावज्जिव परिभ्रमण करणार. असें बोलून त्यानें एक दीर्घ श्वास टाकिला आणि अधोवदनानें पुन्हां हळुहळु तो बोलूं लागला. "माझी दीनवाणी स्थिति होऊन मी देशो-धडीस लागेन व तुझा बाप तुझें लग्न श्रीश्चंद्राबरोबर करून देईल हें मी पूर्वींच जाणत होतों."

कांहींवेळ गेल्यावर तो पुन्हां कंपित स्वरानें म्हणाला. हेमलते, मला आणखी एक गोष्ट बोलावयाची आहे. आपण लहान होतों, तेव्हांपासून ह्या माधवी-लतेस (मोगरीच्या झाडास) पाणी टाकून प्रीतीनें वाढविलें आहे. आपलें प्रेम जसजसें वाढत गेलें, तशीतशी ही लताही वाढली. आपल्या प्रेमाचा आज शेवट आहे, तेव्हां ह्या बिचारीचें तरी ह्या जगांत काय काम आहे? आपल्या प्रीतीचा व हिचा शेवट एकदांच करूं. असें म्हणून त्यानें ती माधवीलता उपटून तिचें एक कंकण केलें व तें हेमलतेच्या हातांत घालून तो तिला पुन्हां म्हणाला,—फुलें लवकर वाळून जातात,

पण ह्या लतांचें तसें नसतें, ह्या कांहीं दिवस तरी जशा-च्या तशा रहातात. ह्मणून हेमलते, तूं कांहीं दिवस मज-वर पूर्वीसारखीच प्रीति ठेव. निदान माझें स्मरण तरी ति-तके दिवस असूं दे. आणि जोंपर्यंत तुझ्या हृदयांत माझी प्रीति राहील तोंपर्यंत हें कंकण तूं आपल्या हातांत ठेव. ज्या दिवशीं तुझ्या हृदयमंदिरांतून हा अभागी नरेंद्र नि-घून जाईल त्या दिवशी ह्या शुष्क कंकणाला पवित्र भागी-रथी जलांत फेंकून दे.

शोकानें व्याकुळ झाली असून जिच्या हृदयाचे शतशः तुकडे झाले आहेत, अशी हेमलता नरेंद्राकडे आश्चर्यचकित् होऊन पाहूं लागली, तों नरेंद्र स्थिर व शांत असा तिला दिसला. पण तितक्यांतच तो तिचे हात सोडून तेथून निघाला व हेमलता स्फुंदस्फुंदून रडूं लागली.

नरेंद्रा ! अरे देशोधडीस लागलेल्या नरेंद्रा ! बाबा, तूं कोठें रे जाशील ? ही पहा समोर प्रशस्त वक्ष विस्ता-रून जन्हुतनया भागीरथी तुला बोलावीत आहे.

नरेंद्र हेमलतेजवळून निघाला, तो गंगातिरावर येऊन त्यानें तेथून एकदा हेमलतेचें रडणें ऐकिलें, पण तो माघारीं फिरला नाहीं. त्यानें एकदां आकाशाकडे पाहिलें व "छे, आतां नाहीं सहन होत " असें ह्मणून गंगेच्या विशाळ उदरांत उडी घेतली.

प्रकरण सहावें.

अनाथ-बिचारी हेमलता !

I hear thee view thee, gaze o'er all thy charms
And round thy phantom glue my clasping arm
'Pope'.

सायंकाळ होऊन अंधकारानें दशादिशा व्यापिल्या आहेत, अशावेळीं गंगेच्या कांठावर एक तेरा वर्षांची मुलगी पाण्याकडे पहात बसली होती. गंगेच्या प्रवाहांत कांहीं असेल ह्मणावें, तर तिच्या विशाळ तरंगाशिवाय अंधारांत कांहीं देखील दृष्टीस पडत नव्हतें. पण ही मुलगी पहातां पहातां अशी निराश झाल्यासारखी होऊन रडते कां ? अंधार जास्त होत चालला, आकाशांत तारे चमकूं लागले, तेव्हां ही मुलगी एकदांची तेथून उठून घराकडे जावयास निघाली. वाचक हो, ही मुलगी कोण ? हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. ही आपली हेमलता.

रात्रीस नवकुमार जमीनदाराच्या घरचीं सारी मंडळी निद्रिस्त झाली. सर्वत्र सामसूम होऊन सृष्टीनें गंभीर स्वरूप धारण केलें. पण हेमलतेच्या जिवाला कांहीं

कुठें ? बिचारी हळूंच शय्येवरून उठून खिडकी उघडून पाहुं लागली, पण तिला नक्षत्रांनीं सुशोभित असलेल्या नीलवर्ण आकाशाखालीं गंगेच्या विशाळ तरंगाशिवाय कांहीच दिसलें नाहीं. ह्या गंगाप्रवाहाकडे पाहून तिला लहानपणच्या खेळाची, लहानपणच्या कल्पनांची आणि नरेंद्राच्या प्रीतीची आठवण झाली व तिचें हृदय विव्हळ होऊं लागलें. एकेका गोष्टीची आठवण होऊन बिचारीच्या डोळ्यांतील अश्रू खळेनात. सारा पदर आणि वक्षस्थल ओलें झालें. तिनें एकदां शांत झाल्यावर गंगेकडे पहावें व फिरून कांहीं आठवण येऊन तिचें हृदय भडभडून यावें. एक प्रहर, दोन प्रहर आणि तीन प्रहर रात्र झाली, तरी ती खिडकीजवळ बसून रडतच होती.

शोकांचा प्रथम वेग कमी झाला, पण त्याबद्दल शोक व चिंता ही परंपरा हेमलतेच्या मागें लागली ! गालावर हात देऊन ती विचार करीत असतां हळूंच एक अश्रु डोळ्यांतून खालीं पडला. ह्या प्रमाणें दुसरा, तिसरा, चवथा, असे एकसारखे अश्रु पडत होते व त्याबरोबर चिंताही वाढत चालली होती. अशा स्थितींतच रात्र बहुतेक संपून पूर्व दिशा लाल दिसूं लागली. पण बिचारी हेमलता अजूनपर्यंत गालावर हात देऊन चिंतातुर बसली होती. सूर्योदय झाला ! हें पाहून ती तशीच उठली. आणि गृहकार्यास हातभार लावण्यासाठीं आंत

गेली. पण तिचें तें शून्य झालेलें मन तिला कांहींच सुचूं देईना. ह्याप्रमाणें ती त्या खिडकीजवळ बसून गंगेच्या ज्या घाटावरून नरेंद्रानें तिच्या विशाळ उदरांत उडी घेतली होती, तिकडे रोज पहात असे. नरेंद्रानें बाळपणीं तिच्याशीं केलेल्या गोष्टी, बालपणाचे खेळ वगैरे अनेक प्रकार जलतरंगांप्रमाणें एका मागून एक तिच्या मनांत येत व त्यायोगानें ती दुःखीत होऊन तिचे डोळे आंसूंनीं भरून जात. पण कोणी पाहील या भीतीनें तिनें ते लागलेच पुसून टाकावेत. नवकुमारासारख्या सर्वसंपन्न जमीनदाराच्या घरीं तिजसारखा दुःखी प्राणी कोणी नव्हता. बिचारीला पोटांतलें दुःख सांगावयालाही कोणी नव्हतें. आणि तिला आपलें दुःख दुसऱ्याजवळ सांगावयाची इच्छाही पण नव्हती. अलिकडे तिला एकांतवास फार आवडत असे. असो; वसंत सरून ग्रीष्म लागला व नैसर्गिक मंत्रप्रभावानें सर्वत्र जगत् फलपुष्पमय झालें. नवपल्लवानें सुशोभित वृक्षराजीमधून कोकिलांचा मंजूळ ध्वनि ऐकूं येऊं लागला. व सारी सृष्टि आनंदी दिसूं लागली पण हेमलतेचें दुःख कमी झालें नाहीं.

प्रकरण सातवें.

अनाथ बिचारा नरेंद्र !

And leaves the world to darkness and to me
'Gray.'

नरेंद्राला चांगलें पोहतां येत होतें. लहानपणीं तर त्याला हा एक छंदच होता. मागील भागांत सांगितल्याप्रमाणें गंगेत उडी टाकून नरेंद्र तिच्या दुसऱ्या तिरास पोंचला. तिकडे फार दूरपर्यंत रेतीशिवाय कांहीं दिसत नव्हतें. नरेंद्र कपडे वाळविण्यासाठीं अंधारांत त्या रेतीवरून इकडून तिकडे फिरत मधून मधून तशा अंधाऱ्या रात्रीसही वीरनगरांतील आपल्या भव्य वाड्याकडे पहात होता. ह्या वेळीं त्याच्या मनांत काय काय कल्पना येत होत्या हें सांगणें मोठें कठीण आहे.

सर्वत्र गाढ अंधकार पसरला असल्यामुळें गंगेच्या प्रवाहाच्या कलकल शब्दाखेरीज, चातकाच्या भीषण स्वराखेरीज व मधून मधून कोल्ह्याच्या कोल्हेकुईखेरीज कांहीं ऐकूं येत नव्हतें. पण नरेंद्राचें त्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. तो अंधारांत वाट फुटेल तिकडे चालला होता. थोडें दूर गेल्यावर त्यानें वीरनगराकडे पुन्हां एकदां पाहिलें पण

अंधारांत वीरनगर त्याला कसें दिसणार ? वीरनगर दिसलें नाहीं, म्हणून त्याला वाईट वाटून तो पुन्हां चालूं लागला. थोडें दूर गेल्यावर त्याला एक पाऊलवाट दिसली तिजवरून तो चालूं लागला. आपण कोठें जात आहों हें त्याला मुळींच ठाऊक नव्हतें. खालीं अफाट जमीन व वर अनंत आकाश ! जिकडे वाट फुटेल तिकडे नरेंद्र जात होता. रस्त्यावर असलेल्या वटवृक्षावरील पक्षी नरेंद्राची चाहूल ऐकून उडत. त्याचप्रमाणें रात्रीं फिरावयास निघणारीं रानटी जनावरेंही नरेंद्राला पाहून ओरडत, पण नरेंद्र तिकडे कशाला बघतो ? तो आपला सारखा चालला होता. बरेंच दूर गेल्यावर त्याला एक लहानसें खेडें लागलें. पण ह्या मध्यान्ह रात्रीच्या वेळीं तेथें कोण जागें असणार ? लहान लहान झोपड्यामधून सर्वत्र शांतता आणि काळाकुट्ट अंधार पसरला होता. मध्येंच एखाद्या झाडावरून खद्योताच्या प्रकाशाचा भास होई. नरेंद्र गांवांत शिरला तेव्हां त्याला पाहून गांवांतील कुत्र्यांनीं एकच हलकल्लोळ उडवून दिला. आणि यामुळें रस्त्यावरील झोपड्यांमधून ' काय आहे ' म्हणून दार उघडून कित्येकांनीं पाहिलें. पण नरेंद्र तिकडे लक्ष न देतां सरळ आपल्या मार्गानेंच चालला होता. रस्ता ठाऊक नसल्यामुळें आडरानांतून जात असतां नरेंद्राच्या अंगाला कांटेरी झाडें फार लागून बरीच दुखापत झाली होती. परंतु त्याला त्याची कांहींच शुद्धि किंवा चिंता नव्हती.

ह्याप्रमाणें त्या रात्रीस कित्येक गांवें ओलांडून तो जात असतां त्यानें दूर अंतरावर थोडासा प्रकाश पाहिला व आपल्या जाण्याचा रोखही तिकडेच धरिला. सरासरी एक कोशभर चालल्यावर तो त्या प्रकाशाजवळ आला आणि पहातो तों कांहीं मंडळी प्रेतदहन करीत असलेली त्याच्या दृष्टीस पडली. नरेंद्र अगदीं थकून गेला होता. त्यानें चितेपासून कांहीं अंतरावर एका झाडाखालीं आपलें अंगवस्त्र टाकिलें व त्यावर पडून तो झोंपीं गेला. प्रेत दहन करण्यासाठीं आलेल्या मंडळीनें चितेच्या मंद प्रकाशांत नरेंद्राचें म्लान झालेलें मुख पाहून हा फार थकून आलेला आहे, असे समजून त्याला आपले जवळ बोलाविलें, पण नरेंद्रानें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. त्या मंडळीनें नरेंद्राचें नांव गांवही विचारिलें, पण त्याचें देखील उत्तर नरेंद्रानें दिलें नाहीं. शेवटीं ती प्रेतदहनास आलेली मंडळी त्याच्या ह्या विपन्न स्थितीबद्दल खेद करीत आपापल्या घरास निघून गेली व नरेंद्र रस्त्याच्या अतिश्रमामुळें तेथेंच झोंपीं गेला.

दुसऱ्या दिवशीं पहाटेस कांहीं बायका पानवठ्यावर जात असतां त्यांनीं रस्त्यांत एक गौरवर्ण सुंदर तरुण पुरुष निजलेला पाहिला. तो दुसरा तिसरा कोणी नव्हता, आपला नरेंद्र होता. दिवस बराच वर आला तरी तो उठत नाहीं; हें पाहून त्यांच्यापैकीं कित्येक गांवांत

जाऊन त्यांनीं पुरूषमंडळीस बोलावून आणिलें व हा स्त्रीपुरुषांचा घोळकाचा घोळका त्याच्या सभोंवति जमून त्यांनीं त्याला उठविलें आणि नांव गांव वगैरे विचारिलें. नरेंद्रानें हळुहळु उत्तर दिलें, " मला नांव नाहीं, माझें रहावयाचें ठिकाण नाहीं आणि ह्या जगांतही माझें कोणी नाहीं ! " बिचारा नरेंद्र आज असा देहमान विसरलेला उन्मत्त ! हाय हाय !

प्रकरण आठवें.

राजमहाल.

Seldom alas ! the power of logic reigns
With much sufficiency in royal brains.

' Cowper.

त्याच दिवशीं नरेंद्राला भयंकर ताप आला. उघड्या जागेवर निराश्रित स्थितींत पडलेल्या नरेंद्रास पाहून एका सद्‌गृहस्थास त्याची दया आली व त्यानें त्याला आपल्या घरीं नेऊन त्याची चांगली बरदास्त ठेविली. परंतु बरेच दिवसपर्यंत त्याच्या जगण्याची आशा नव्हती. कांहीं

दिवसांनीं नरेंद्राची प्रकृति सुधारली व त्याला हिंडण्या फिरण्याची शक्ति येतांच त्यानें त्या सज्जन पुरुषांचा निरोप घेतला. तो ह्या वेळीं पूर्वीचा सर्व शोक व निराशा हीं सारीं विसरला व हेमलता कशी प्राप्त होईल ह्याचा विचार करूं लागला. विचारांतीं असें ठरलें की आपण बंगालच्या सुभेदाराकडे स्वत: जाऊन आपली जमीनदारी मिळण्याबद्दल विनंति करावी. ती सफळ झाली म्हणजे स्वार्थान्धनवकुमार हेमलता आपल्याला अगत्यपूर्वक देईल. असा विचार करून नरेंद्र बंगालच्या सुभेदाराच्या राजधानीत आला. ह्या वेळीं बंगालचा सुभेदार सुजा होता. हा दिल्लीचा शहाजहान बादशहाचा मुलगा. ह्यानें बंगाल च्या राज्यव्यवस्थेचा भार आपल्या शिरावर घेतल्यावर बंगा लची जुनी राजधानी ढाका सोडून नवीन 'राजमहाल' नांवाची राजधानी वसविली. ह्यानें बंगाल्यांत एकुणवीस वर्षे राज्यकारभार करून सर्व लोकांस सुखी केलें, ह्याबद्दल इतिहासांत त्याची बरीच कीर्ति दिसून येते. तो रणप्रसंगीं मोठा शूर व साहसी असून न्यायप्रिय व दयाळु होता. व त्यामुळें बंगाल्यांतील आबाल वृद्धांना व लहान मोठ्या जमीनदारांना त्याच्याविषयीं मोठा अभिमान वाटे. पण, आकाशाला शोभविणाऱ्या चंद्रासही कलंक आहे. आपल्या रूपगुणानें सर्वांस मोहित करणाऱ्या गुलाबालाही कांटे आहेत. सुंदर सुंदर सुवासिक पुष्पांनीं सुशोभित अशा

वाटिकांतील सडकांवरून खडे आहेत, त्याप्रमाणेच सुजाचा स्वभावही एकदोन दोषांनी कलंकित होता. तो जसा रणचतुर तसाच अत्यंत विलासी होता. सर्वदां तरुण व सुंदर अशा स्त्रीजनांनीं वेष्टित असण्यांतच त्याला आनंद वाटे. त्याची पट्टराणी "प्यारीबानू" हिच्या रूपगुणाची कीर्ति सर्व बंगालभर पसरली असून ती आपल्या मधुर वाणीनें सर्वदा सुजाचें मन प्रेमरसांत तरंगवीत असे. पण सुजाचें मन केवळ प्यारीबानूवरच नव्हतें त्याच्या राजमंदिरात अशा शेंकडो बेगमा एखाद्या वाटिकेंतील पुष्पसमूहाप्रमाणें शोभत होत्या. त्यांच्या रुपावर मोहित होऊन तो कधीं कधीं सबंध आठवडेचे आठवडे आपले राजकार्य सोडून त्यांच्याशीं क्रिडा करण्यांत व मधुपान प्रसंगांत घालवीत असे ! वाचकहो, अशा सुभेदाराच्या दरबारांत नरेंद्र दाद मागावयाला चालला आहे ! ह्या दरबारांत त्याची दाद कितीशी लागेल तें दिसतेंच आहे ! !

गंगातिरावर राजमहाल नगराची रचना असूनही मोठी मजेदार दिसते. ज्या वेळीं हें शहर बंगालची राजधानी होती, त्यावेळीं ह्याची शोभा मोठी वर्णनीय होती. सुभेदार साहेबांचा भव्य महाल, कचेऱ्या व अमीर उमरावांच्या मोठमोठ्या हवेल्या ह्यांनीं ही राजमहालनगरी खरोखर राजमहालासारखीच दिसत होती.

पण नरेंद्र कांहीं ही शोभा पहावयास राजमहालांत आला नाहीं ! किंवा त्याला ह्या नगरीच्या सौंदर्यविलोकनानें आनंदही झाला नाहीं ! आपली दाद सुभेदाराजवळ कशी लागेल हीच त्याला चिंता होती. तेथल्या मोठमोठ्या सावकाराशीं नरेंद्राच्या बापाचा परिचय होता व ते त्याला फार मान देत. पण ते दिवस गेले ! वाचकहो. नरेंद्र आतां धनहीन झाला आहे. तेव्हां त्याच्यासाठीं कोण खटपट करून दरबारांत त्याची दाद लावणार? तो ज्याच्याकडे जाई, त्यांनीं म्हणावें, " खरेंच, आपले तीर्थरूप फार सभ्य होते. फार दिवसांत तुम्हांला पाहिलें,आल्यासारखे कांहीं दिवस रहा, पुढें तुमच्या कामाबद्दल पाहिलें जाईल. " ह्याप्रमाणें नरेंद्र निराश होऊन आपल्या कामाकरितां तळमळ करूं लागला.

बरेच दिवसांनीं दैवयोगानें एफिनखां नामक एका जहागिरदाराशीं नरेंद्राचा थोडासा परिचय झाला. नरेंद्राच्या बापाला एफिनखां ओळखत होता व त्यामुळेंच त्यानें नरेंद्राला सन्मानपूर्वक वागवून सुभेदाराच्या दरबारांत नेलें. तथापि बिचाऱ्या दरिद्री नरेंद्राची दाद सुभेदारापर्यंत कशी जाणार ? पण एफिनखांच्या अति खटपटीमुळें व वजनामुळें एकदांचें त्याचें प्रकरण तेथील मंत्र्याच्या साह्यानें सुभेदारसाहेबांसमोर मांडावयाचा विचार झाला.

एके दिवशीं सुभेदार सुजा हा दरबारांत सुवर्ण-

खचित सिंहासनावर बसला होता. चोहोंकडे प्रधान मंडळ व मोठेमोठे अफगाण व मोंगल सरदार नम्रतेनें त्याची आज्ञा शिरसा वंद्य करण्यास तयार होते. सिंहासनाच्या मागें दोहोंबाजूस सेवकजन हातांत चवऱ्या घेऊन सुभ्याचे मस्तकावर वारीत होते. ही शोभा पहावयास दरबारच्या अंगणांत लोकांच्या दाटीमुळें मुंगीलाही फिरावयास सवड नव्हती. फार दिवसांनीं सुभेदार दरबारांत आले होते, म्हणून त्यांच्या दर्शनाकरितां लोकांची दाटी झाली होती. ह्याप्रमाणें दरबार भरल्यावर वृद्ध एफिनखां उठून त्यानें बोलण्यास आरंभ केला. तो म्हणाला.—

"जहांपनाह ! यह खाकसार[1] सालहासालसे[2] आपकी ताबेदारी करता आता है. सूभेदारीहीके[3] कामके अंजामदीहीमें खादिमके[4] स्याहे[5] बाल सुफेद हुए. चेहरेपे झुर्रीं[6] परी. आज गुलामका कुछ अर्ज है."

सुभेदार म्हणाले—"एफिन, तुम हमारे बहादूर सिपहसालारोंके[7] सिरगरोह[8] और अजहदरफिकें[9] हो, तुम्हे ऐसी कौनसी हाजत[10] है, जिसे देनेमें हमको दरेग[11] हो सकता है ?"

१ आधीन (सेवक). २ वर्षानुवर्ष. ३ नौकरींत. ४ सेवकाचे. ५ काळे. ६ सुरकुत्या.

७ सेनापती. ८ मुकुटमणि. ९ परममित्र. १० आवश्यकता. ११ पश्चाताप.

एफिनखानानें नम्रतेनें भूमीपर्यंत लवून सलामें क-रून म्हटलें—" जहांपनाह, बंगाली बहुत डरपोक और कमजोर होते हैं, उनमेंसे वक्तनेफौखूतन्[1] जंगमें हम लोगोंको मदद करे, वह मबेदारका जरफ[2] मुरव्वत है इसमें कुछ शक नहीं. जमींदार वीरेंद्रनाथ उसी तरहके बहादूर थे. "

सुभेदार म्हणाले—" हां हमने उस हिंदूका नाम सुन रक्खा है. उसने हम लोगोंको पठानोंसे लडते वक्त बहुतकुछ मदद दी थी. "

एफिनखां फिरून प्रणाम करून म्हणाला—" ज-हांपनाह, बजा फर्माया. खाकसारने उडीसाकी लडाईमें अपनी आंखों वीरेंद्रकी तेजी और जवामर्दी देखी थी. इस दरबारमें बहुतसे जोरावर और कवी[3] पठान और मुगल बहादुर हैं, मगर वीरेंद्रसे ज्यादह जवांमर्द और कवी जवान गुलामकी नजरोंसें आजतक न गुजरा. "

एफिनखांचे हे शब्द ऐकतांच दरबारांतील सर्व वीर आपापल्या तरवारी सरसावून उभे राहिले व सर्वत्र मुसल-मानांचीं मुखकमलें रागानें लाल झालीं. तें पाहून सुभेदार सुजा हंसत हंसत म्हणाला—"एफिन, तुमने काफिरकी बहुत तारीफ की, मगर कुछ नामुनासिब[4] नहीं है. वह हिन्दु

१ कधी कधीं. २ मान देण्यास योग्य (respectable.)
३ बलवान. ४ गैरवाजवी.

इसी लायक था मैने सुना है. इस वक्त उसके लिये क्या कहना है कहो. मैं तुम्हारे कहनेके मुवाफिक उसे कुछ इनाम देनेके लिये तैयार हूं."

एकिनखां गंभीर स्वरानें म्हणाला—" जो सूबेदारोंके सूबेदार और शाहोंके शाह हैं वही इस वक्त वीरेंद्रको इनाम दे सक्ते हैं. मैं उसके यतीम[1] लडकेके लिये शिफारिश करता हूं. वह इस वक्त घरघर टुकडा मांगता है. कानूनगो[2] साहबकी मददसे एक हरामखोरने उसकी जमींदारी ले ली है."

हें ऐकून सुभेदारानें मुलकी कामगाराकडे भृसंकेत करून 'हें काय प्रकरण आहे' तें जाणण्याची इच्छा दर्शविली. ह्या वेळीं सरकारी खजिना व जमीदारी हक्क प्रकरण हीं मुलकीकामगाराच्या स्वाधीन होतीं. ह्या प्रकरणीं कोणतेही कागद दिल्लीस बादशाहाकडे पाठवावयाचे असले तर त्यावर त्याची सही असल्यावांचून चालत नसे. असल्या ह्या बंगालच्या सत्ताधीश अधिकाऱ्यानें नवकुमाराचे बरेच पैसे खाल्ले असल्यामुळें तो सुभेदाराचा भ्रूसंकेत पाहून एकदम म्हणाला—सुभेदारसाहेब आपण विचारतां, तें रास्त पण वीरेंद्र मरण पावल्यापासून त्याच्या जमीनदारीचा कर कांहीं वर्षे योग्य वेळीं

१ अनाथ. २ मुलकी कामगार.

न पावल्यामुळें आपण त्याची जमीनदारी नवकुमाराला देण्याची आज्ञा केली होती.

सुभेदार सुजा ह्याला पाहिजे तसें समजाविलें तरी तो समजत असे. मुलकी कामगाराची वरील गोष्ट त्याला मानवली व एफिनखांची गोष्ट अमळ कमी पडली. ह्यामुळें एफिनखां रागावून जमिनीकडे पहात उभा राहिला होता. त्याच्या डाव्या बाजूस उभा राहून नरेंद्रही ह्या लुच्चा कामगाराकडे रागानें पहात होता. अखेरीस सुभेदार सुजा एफिनखानाला म्हणाला–" एफिनखां ! " आफताब जो जहानको रोषनी बख्शता है, उसे फिर वापिस नहीं लेता. खुद जमीनदारी देकर फेर लेना शाहोंके शान से बईद[१] है. लेकिन वीरेंद्रके लडकेको बहादुर देखता हूं. इसकी वीरेंद्रकी तरह तालीम होवे, जरूर यह उमदा इनाम और दूसरी जमीनदारी पानेके लायक होगा.

सुभेदाराचें असें भाषण ऐकून सर्व मुसलमान सरदार " आफरी[२] आफरी " म्हणून सुभेदाराची प्रशंसा करूं लागले. एफिनखानालाही समाधान वाटलें. व सुभेदाराच्या आज्ञेप्रमाणें नरेंद्राला आपल्याजवळ ठेवून युद्धोपयोगी शिक्षण देऊं लागला.

---

१ दूर.
२ शाबास.

प्रकरण नववें.

काशीचें युद्ध.

The diadem with mighty projects lined,
To catch renown by ruining mankind.
Is worth with all its gold and glittering store
Just what the toy will suffer and no more.

'Cowper.'

मागील भागांत सांगितलेल्या गोष्टीला तीन वर्षे होऊन गेलीं. इस्वी सन १६५७ तील आश्विन महिन्याच्या आरंभास एके दिवशीं हिंदुस्थानची प्राचीन राजधानी दिल्ली व नूतन राजधानी आगरा ह्या दोनही शहरांत मोठी गडबड उडून गेली होती. आगऱ्यातील राजद्वारासमोर लोकांची दाटी ह्मणजे अगदीं मी म्हणत होती ! सगळे अगदीं भयभीत झालेले ! ! बाजारांत जिकडे तिकडे दुकानें बंद. मोठमोठे सरदार, मानकरी, मोगल, पठाण सर्वच अस्थीर आणि चिंताग्रस्त ! कारण काय ह्मणाल, तर शहाजहान बादशहा जो कित्येक दिवस बिमार होता, त्याच्या मरणाची गप्प तें दिवशीं शहरांत उठली होती. गप्पच ती ! हं हं ह्मणतां थोडक्याच काळांत ती

सर्व हिंदुस्थानभर पसरली ! आणि, मग काय ! बंगाल्यांतून सुजा, दक्षिणेंतून औरंगजेब व गुजराथेंतून मुराद शस्त्रास्त्राच्या तयारीनें मी मी म्हणत निघाले ! बापाची मृत्युवार्ता ऐकून राज्यलोभानें सर्वांचाच तृष्णाग्नि प्रदीप्त झाला ! काहीं कालानें त्याना शहाजहान जिवंत आहे, असें समजलें, पण हे तिघेही परत फिरले नाहीत ! परत न फिरावयाचें कारण हें होतें की आज बरेच महिन्यापासून बादशाहा (शहाजहान) आजारी असल्यामुळें त्याच्यानें राज्यकारभार होत नव्हता. ही संधि साधून त्याचा वडील मुलगा दारा ह्यानें अशा वेळीं त्याची सुश्रुषा करावयाची, तें सोडून उलट त्याला एखाद्या कैद्याप्रमाणें बंदींत ठेविलें होतें; व आपण खुशाल राज्यकारभार करीत होता. कित्येकाला वाटलें की दारा बहुतकरून बापाला विष देऊन आपल्याला राज्याभिषेक करून घेईल ! आणि त्यानें तसें केलें देखील असतें ! पण सुजा, औरंगजेब व मुराद हे लढावयास येऊन उभे राहिले. हे तिघेही बापाच्या राज्यव्यवस्थेला संमत, परंतु वडील बंधूच्या ह्या रिकाम्या पण स्वार्थी ढवळाढवळीला असंमत होते आणि ह्याच कारणामुळें ह्यावर्षीं सर्व हिंदुस्थानभर युद्धाग्नि प्रज्वलित झाला होता.

इ. स. १६५७ च्या अखेरीस काशीचें युद्ध सं-

पलें. हे दिवस शीत कालाचे असून सायंकाळचा मंद प्रकाश पडला होता. पण ह्यावेळीं समरभूमि कोण भयंकर दिसत होती ! जिकडे तिकडे हत्ती, घोडे, उंट व मनुष्यें ह्यांच्या प्रेतांचे नुसते ढीग लागले होते ! कित्येक घायाळ झाल्यामुळें मूर्च्छितावस्थेंतून थोडथोडे सावध होत " पाणी पाणी " करीत होते. कित्येक आपल्या आप्तांला शोधीत होते व कित्येक धनाशेनें प्रेतांचे खिसे चांचपीत होते. जिकडे तिकडे रात्रीचा भयंकर शब्द व कोल्हेकुई ऐकूं येत होती. मधून मधून एक दोन ठिकाणीं दिवट्यांचा उजेडही दिसत होता व जवळूनच पवित्र गंगानदी आपलें विशाळ व उज्ज्वल वक्षस्थल पसरून आनंदानें कलकल शब्द करीत आपल्या पतीस आलिंगन देण्यास धांवत चालली होती.

अनुक्रमें मध्यरात्र झाली. स्वच्छ पिठासारखें चांदणें पडलें. कलंकित चंद्राचीं निष्कलंक किरणें मनुष्य जातीच्या लाजिरवाण्या कलंककथा प्रकाश करूं लागलीं. अशा वेळीं दोन रजपूत त्या रणभूमीवर कोणत्याशा त्यांच्या परिचित मनुष्याचा शोध करीत फिरत होते. इतक्यांत जवळच्या एका प्रेतांच्या राशींतून त्यांनीं कांहींसा वेदनासूचक स्वर ऐकूं आला. ह्मणून त्यांनीं ती प्रेतांची रास विखरून त्यांत शोध केला, तों त्यांला एक

तरूण पुरुष अतिशय घायाळ झाल्यामुळें मूर्छित असलेला दिसला. बिचाऱ्याला मर्मस्थानीं घाय लागल्यामुळें असा अचेतन स्थितींत पडला होता. ह्या तरुणाला अशा विपन्नावस्थेंत पडलेला पाहून ते दोघेही युद्धव्यवसायी रजपूत फार विस्मित् झाले. घायाळ झालेल्या तरुणाचें वय केवळ अठरा वर्षांचें, रूप अत्यंत सुंदर, भाळप्रदेश अत्यंत विस्तीर्ण, अजूनपर्यंत श्रम व पोटाच्या काळजीचा उद्गम करणारी मिसूर देखील फुटली नव्हती ! सारांश, पहाणारांला हा योद्धा असावा याची कल्पना देखील होत नव्हती. यामुळें युद्धव्यवसायानें ज्यांचा स्वाभाविक दयाळु स्वभाव बदलून गेला होता, असे ते दोघे रजपूत त्या घायाळ तरुणाकडे पहात एकमेकाला म्हणूं लागलेः—

पहिला रजपूत—कायहो, हा मुलगा येवढ्याशा वयांत युद्ध करायला आला, अं?

दुसरा रजपूत—मला वाटतें हा बंगालच्या सुभेदाराकडील आहे. येवढ्याशा वयांत हें साहस? धन्य आहे याची. हा कोणत्या देशचा असावा बरें?

पहि०रज०—कोण जाणे कोणत्या देशचा आहे तो.

दुस०रज०—अहो, बंगालचे लोक, मोंगल व पठाण ह्यांच्या शरिराची ठेवण अगदीं निरनिराळी असते. ह्याच्या बांध्यावरून हा बंगालचा असावा असें वाटतें.

आमचे बाबा एकदां मानसिंहाबरोबर बंगाल्याकडे गेले होते. ते सांगत असत कीं तेथले लोक सुखप्रिय व विलासी असतात. शौर्य आणि धैर्य हें त्यांच्या गांवीं देखील नसतें. वेळ आली तर तेथल्या स्त्रिया पुढें होतात आणि त्यांचे नवरे त्यांच्यामागें लपतात! खरें खोटें देव जाणें!!

पहि०रज०-(हंसून) बंगालचा सुभेदार सुजा ह्याला कांहीं तरी अक्कल आहे? जयसिंह व सुलेमान ह्यांच्याशीं लढायाला त्यानें अशीं पोरें सोरें आणिलीं आहेत! वारे शहाणपण!! पुन्हां कदाचित ह्याच्याशीं सामना झालाच, तर आपणही आपली पोरेंच ह्यांच्याबरोबर लढावया करितां पाठवूं! पण असो आपल्याला आपल्या मित्राचा शोध लावला पाहिजे.

दुस०रज०-अहा पण हा बिचारा अजूनपर्यंत जिवंत आहे! ह्याला जर थोडी मदत केली तर ह्याचे प्राण वांचतील, थांबा अमळ.

पहि०रज०-जाऊं द्या कीं राव! शत्रूच्या लोकांना साह्य करायला इथें कोणाला वेळ आहे? एका घायानें असला नसला पार उडवून देतो, ह्मणजे त्यालाही नको कटकट आणि आपल्याला ही नको पिडा! असें ह्मणून त्यानें आपल्या तरवारीस हात घातला. पण दुसऱ्यानें त्याचा निषेध करून ह्मटलें- " छे छे, घायाळ झालेल्यांचा

प्राण न घेण्याविषयीं आमच्या यशवंतसिंह महाराजाची आह्माला आज्ञा आहे. तुह्मी पाहिजे तर जा मीच. त्याला साह्य करीन.

पहिला रजपूत कांहीं न बोलतां हंसत हंसत तेथून निघून गेला. दुसऱ्यानें बिचाऱ्या घायाळ तरुणाच्या तोंडावर पाणी वगैरे शिंपून त्याला सावध केलें. सावध झाल्यावर त्यानें डोळे उघडून पाहिलें, तों चंद्रोदय झालेला असून युद्ध बंद ! सर्व सृष्टि उदास ! तेव्हां तो जवळ असलेल्या रजपूतवीरास ह्मणतो; महाराज, आपण माझा जीव वांचविला आहे, तेव्हां आपलें नांव गांव कळावें अशी ह्या दासाची फार इच्छा आहे. त्याचप्रमाणें लढाईंत जय कोणाला मिळाला व सुभेदार शहा सुजा कोठें आहेत, हेंही कळविल्यास मोठे आभार होतील.

रजपूत स्वार ह्मणाला—मुला, माझें नांव गजपतिसिंह. मी यशवंतसिंह महाराजाकडील एक सरदार आहें. दाराचा मुलगा सुलतान सुलेमान व त्याच्या पक्षास असलेल्या जयसिंहाचा जय होऊन तुझा तो धनी सुभेदार सुजा बंगाल्याकडे पळून गेला. आमच्या यशवंतसिंह महाराजांनीं कांहीं गुप्त कामाकरितां मला जयसिंहाकडे पाठविलें असल्यामुळें हल्लीं मी त्या कामगिरीवर राजा जयसिंहाकडेस उतरलों आहें. बरें, मुला, तुझें नांव काय आणि तूं कोठें रहातोस, हें मला सांगशील काय ?

तो तरूण अति खिन्न होऊन खालीं पाहूं लागला व कांहीं काळ गेल्यावर ह्मणाला यद्यपि तुम्ही शत्रुपक्षाकडील आहांत, तरी माझे प्राणदाते असल्यामुळें मला बापाप्रमाणें पूज्य आहांत. कृपा करून मला थोडें पाणी पाजा."

गजपतिसिंहानें त्याला पाणी पाजून सावध केल्यावर तो ह्मणाला-"महाराज, माझें नांव नरेंद्र. मी बंगाल्चा रहाणारा आहें. येथें माझें कोणी नाहीं. आपण ह्या वेळपर्यंत जशी कृपा केली, तशीच आतांही करून मला आणखी थोडें पाणी आणि एक दिवस रहाण्यासाठीं जागा द्याल तर मजवर फार उपकार होतील. नरेंद्राची बालकाकृति पाहून व त्याची दीन वाणी ऐकून गजपतिसिंह जरी शत्रुपक्षांकडील होता तरी त्याला गहिंवर आला व त्यानें नरेंद्राला आपल्या तंबूंत नेऊन त्याची नीट बरदास्त ठेविली.

प्रकरण दहावें.

जयसिंहाचा तळ.

Bits.

Where judgement clear sighted and surveys
The chain of reason with unerring gaze.

"Thompson"

एका प्रचंड तंबूंत हांतरलेल्या बिछायतीवर दोन गृहस्थ कांहीं गोष्टी करीत बसले होते. त्यांतील एक रजपूत, राजा जयसिंह होता व दुसरा मुसलमान सरदार देवेरखां होता. जयसिंह जरी अगदीं तरूण नव्हता, तरीपण त्याची शरीरकाठी चांगली सुदृढ आणि मुखकांति तेजःपुंज होती. पूर्वीं मोंगल बादशाहाच्या पदरीं बहुतेक मुख्य सेनापति रजपूतच असत. आणि त्यांच्याच बाहुबळाच्या भरंवशावर ते सिंधुपासून ब्रह्मपुत्रापर्यंत निष्कंटक राज्य करीत होते. जेथें जेथें कांहीं खटपटी उत्पन्न होत, तेथें तेथें रजपूत सेनापतीचीच योजना होई व तेही विजयी होऊन येत. आह्मी ज्या वेळची गोष्ट सांगत आहोंत, त्यावेळीं राजपुतान्यामधील सर्व राजांमध्यें जयसिंह व यशवंतसिंह

हे दोघेच प्रबळ होते. ह्या दोघांवर दिल्लीश्वर शहाजहान बादशहा याचा विश्वास असून कोठें कांहीं भानगड उत्पन्न झाली तर यांनांच त्या कामगिरीवर जावें लागे.

दारानें आपल्या बापाची चाल लक्षांत ठेवून सुजाचा पराभव करावयाची कामगिरी जयसिंहासच सांगितली आणि त्यानेंही ती कामगिरी नीट बजावून सुजाला रणांतून पळावयास लाविलें. असो.

वर सांगितलेल्या प्रचंड तंबूंत दिव्याचा चांगला प्रकाश पडला असून त्याच्या सभोंवतीं असंख्य सेना पसरली होती. तरीपण ह्या वेळीं त्या प्रचंड तंबूंत वर सांगित लेल्या दोन गृहस्थांखेरीज कोणी नसून त्यांचा संवाद चालला होता, तो असाः—

देवेरखां—सचमुच आपने जयसिंह नाम बामायनी पाया है. जहाँ आप वहीं फतह

जयसिंह—पण जेथें लढाई असेल तेथें! येथें तर ह्या भित्र्या बंगाली लोकांशीं गांठ! ह्यांच्याशीं लढण्याला लढाई म्हणणें देखील शोभत नाहीं. अहो, हे जसे वाचाळ आहेत, त्याप्रमाणें ह्यांच्यांत शौर्य नाहीं! ह्यांच्या सहवासानें सुजा देखील आपला मूळ स्वभाव विसरून ह्यांच्यासारखाच झाला आहे! मग अशा लोकांशीं लढाई करण्यांत काय अर्थ!

देवेरखां—क्यों, लढाईके वक्त सुल्तान शुजा बहुत दिलेरी और जवांमर्दी जाहिर करते हैं यहसब जानते हैं.

जयसिंह—तुह्मी ह्मणतां तें खरें आहे. लढाईंत तो मोठेंच अवसान दाखवितो. पण नुसत्या अवसानानें काय होणार ? अंगांत कांहीं रणकौशल्यही पाहिजे.

देवेरखां—अच्छा, आप औरंगजेबको कैसा समझते हैं.

जयसिंह—त्याच्यासारखा रणधीर व धूर्त आपल्या पहाण्यात तर नाही बुवा ! पण कायहो, औरंगजेबाला नर्मदा तिरावर अडविण्यासाठीं यशवंतसिंह जात आहे ह्मणतात, तें खरेंका ! हें खरें असलें तर मयंकरच प्रसंग. कारण यशवंतसिंह जरी शूर आहे तरी त्याच्या अंगांत धूर्तता नाहीं. आणि ह्मणूनच मला वाटतें कीं ह्या लढाईंत औरंगजेब विजयी होईल.

देवेरखां—तो क्या आप दाराको छोड देंगे !

जयसिंह—सोडणार जरी नाहीं, तरी पण औरंगजेब विजयी झाल्यावर त्याला बादशहा ह्मणून मानावें लागेल, कारण आह्मी विवक्षित व्यक्तीच्या स्वाधीन नसून दिल्लीच्या तक्ताचे मांडलिक आहोंत. तेव्हां तें तक्त ज्याच्या स्वाधीन झालें, त्याच्या स्वाधीन आम्ही असलोंच पाहिजे.

देवेरखां—अच्छा, आप जो चाहते तो बहुत सहल तौरसे शुजा को कैद कर सकते थे. शुजा जब भागे थे

उसवक्त पीछा करनेसे वह जरूर हाथ आ जाते. और उनके पकडे जाने पर शहाजादे दाराभी बहुत खुष होते, आपने ऐसा क्यों नहीं किया ?

जयसिंह—मीं जाणून बुजून त्याला पळूं दिलें, हें तुह्माला ठाऊक असेलच. हें पहा, जरकरितां सुजाला धरून दाराकडे नेलें असतें, तर खचित् सांगतों कीं दारा त्याचा प्राण घेतल्याविना रहाता ना ! त्यानेंफारच दया दाखविली असती तरी त्याला जन्मपर्यंत कैद भोगावी लागली असती. याशिवाय, मी मोहिमेवर येतेवेळीं शहाजहान बादशाहानें मला भेटून सांगितलें, होतें कीं " जयसिंह, अशी कांहीं युक्ति लढीव कीं जिच्या योगानें लढाईच होऊं नये आणि सुजालाही सांग कीं तूं लढूं नकोस. त्याला ह्मणावें, माझ्या मागें तुह्मी पाहिजे तें करा. "

ह्याप्रमाणें त्या दोघांच्या गोष्टी होत आहेत, इतक्यांत एक शिपाई येऊन ह्मणाला—" महाराज, सरदार गजपतिसिंह कांहीं जरूरीच्या कामासाठीं आपली भेट घेऊ इच्छितात. " जयसिंहानें " येऊं दे " ह्मटल्यावर गजपतिसिंह आंत येऊन ह्मणतो, " महाराज, लढाईत घायाळ होऊन पडलेल्या एका बंगाली शिपायास कैद करून आणलें आहे. फारच घायाळ झाला आहे. "

जयसिंह—गजपतिसिंह, त्याला सोडून द्या. अशा त्याकाशीं लढायला आपण आलों नाहीं.

गजपतिसिंह—महाराज, त्याचा देश फारच दूर आहे आणि त्याच्यानें तर एक पाऊलही टाकणें होत नाहीं बरें, येथें तरी कोणी इष्टमित्र असावा, तर तेही नाहीं.

जयसिंहानें कांहीं विचार करून म्हटलें, " बरें तर त्याला आमच्याच एखाद्या तंबूंत ठेवून द्या. आणि जेव्हां तो बरा होईल तेव्हां द्या सोडून, म्हणजे झालें.

गजपतिसिंह जाऊन त्यानें नरेंद्राला एका तंबूंत आणून टाकिलें. त्या वेळीं नरेंद्र अगदींच शुद्धीवर नव्हता. नंतर जयसिंह गजपतिसिंहास म्हणाला, गजपतिसिंह आजच्या युद्धांत तुम्ही फार मदत केलीत. ह्याबद्दल तुमचे व तुम्हास पाठविणाऱ्या यशवंतसिंहाचे अनंत उपकार आहेत. बरें पण गजपतिसिंह, ह्या खेपेला कोणत्या गुप्त कार्यासाठीं यशवंतसिंहानें तुम्हाला मजकडे पाठविलें आहे ? गजपतिसिंहानें " सांगतों ऐका " म्हट ल्यावर परस्पर गुप्त गोष्टी ऐकण्यास व सांगण्यास प्रवृत्त- झाले.

प्रकरण अकरावें.

दुर्दैवी जलेखा.

My heart is sair I dear me tell my heart is sair for somebody.

I could range the world around
For the sake o' some-body.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें नरेंद्राला तेथें आणून ठेविल्यानंतर तो पुष्कळ दिवसपर्यंत भयंकर ज्वरानें पीडित असून त्याला आपल्या देहाचेंही भान नव्हतें. एखादेवेळीं तो शुद्धीवर आला म्हणजे त्याला आपण नावेंत बसून गंगेच्या प्रवाहांतून झपाट्यानें चाललों आहों, असें वाटे. आपण कोठें जात आहों ? बंगालकडे तर जात नाहीं ! आणि ही जवळ बसलेली अल्पवयस्क रमणी माझी सुश्रुषा करीत आहे, ही कोण बरें ? प्राणप्रिया हेमलता तर नव्हे ? इत्यादि विचार मनांत येऊन त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागल्यामुळें शिरा कंपायमान होऊन जखमेंतून रक्त वाहूं लागलें.

ह्याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर नरेंद्राला अं-मळ बरें वाटूं लागून रोगाची पिच्छेहाट होऊं लागली. तो पूर्णपणें शुद्धीवर आला, तेव्हां, आपण एका अपूर्व राजवाड्यांत एका सुरेखशा बिछान्यावर पडलों आहों, असें त्याला दिसलें ! काय ? हा वीरनगरांतील नरेंद्राचा वाडा तर नव्हे ? नाहीं नाहीं. हा असला संगमरवरी पाषाणानें सुरम्य बांधलेला व मधून मधून रत्नखचित कुसर काम केलेला महाल नरेंद्राच्या दृष्टीस आज पहिल्यानेंच पडला आहे ! असो. ह्या महालांत सुवर्णाच्या समईत दिवा जळत असून चोहोकडे सुगंधित परिमळ सुटला होता. व महालाच्या मध्यभागीं हस्तीदंती पलंगावर लाल साटिनचा बिछाना पडला असून त्यावर नरेंद्र निजलेला होता. जवळच एका रुप्याच्या चडवंचीवर एक सुवर्णाचें भांडें स्वच्छ पाण्यानें भरून ठेविलें होतें. पलंगापासून थोड्या अंतरावर, फरशीवर एक गालिचा पसरला होता व त्यावर एक मुसलमान तरुणी (यवनकन्या) आणि एक खोजा बसून परस्पर कांहीं गोष्टी करीत होतीं.

यवनकन्या तरुण व रूपसंपन्न असून तिचें मुख-मंडल व इतर अवयव सौंदर्यानें तेजःपुंज दिसत होते. त्याचप्रमाणें तिच्या त्या स्कंधप्रदेशावर स्वैर गतीनें लों-बत असलेल्या केशकलापातून साक्षात् शोभा फाकत आहे कीं काय असें वाटत होतें. नरेंद्राच्या हृदयमं-दिरांत हेमलतेच्या सौंदर्याचा ठसा उमटलेला होता, या-

मुळें कदाचित त्याला निराळें कांहीं वाटत असेल. पण वाचकहो, खरेंच सांगतों, असा गौरवर्ण, असे कोमल अवयव आणि असें सौंदर्य अझूनपर्यंत त्यानें पाहिलें नव्हतें.

यवनकन्या एकदां बिचाऱ्या नरेंद्राकडे पाही, एकदां खिन्न मनानें पृथ्वीकडे पाही आणि पुन्हा मधुर मधुर स्वरानें त्या यमराजमहोदराम रख्या खोज्याशीं गोष्टी करी. खोजा रंगानें काजळास एकिकडे सारणारा असून बळानें तर भीमसेनाचेंही दांत मोजण्यासारखा होता! ह्या खोज्याबरोबर यवनकन्येच्या ज्या गोष्टी झाल्या त्या येणें प्रमाणें:—

यवनकन्या—मसरूर, क्यौं इस बेगुनाह और मुझपर आफत लाते हो. बेकसूर तनहाको मारनेसे क्या तुमको खुषी होगी?

मसरूर खोजा—तब तू इस काफिरको यहां क्यौं लाई! जलेखा, क्या तू इसका यह कसूर नहीं समझती?

जलेखा—हां तो यह हमारा कुसुर है. इनका क्या! यह तो बेगुनाह है न?

मसरूर—क्यों इतनी मेहर्बानी किसलिये? यह तुह्मारा कोई है कि इसके लिये इतनी उल्फत!

जलेखा (यवनकन्या) ही एक वीरकन्या होती. मसरूर खोजाचें हें अमर्याद भाषण तिला सहन झालें नाहीं. ती रागानें संतप्त होऊन त्याला म्हणाली:—

" मसरूर, अगर तू औरत होता तो उल्फत का हाल जानता. और मर्द होने परभी हरदिल अजिजी कुछ जरूर तुझमें रह जाती. लेकिन मर्दानगी के साथ-

ही तेरे दिलसे मेहिरबानी बिलकुल चली गई ! इस वक्त इस पत्थरसेभी तुम्हारा दिल सख्त है ! ”

इतक्यांत नरेंद्र जागा झाल्यासारखें वाटून मसरूर खोजा ‘ तब देखो काफिर उठा ” म्हणून हंसत हंसत चालता झाला.

जलेखा आपला राग आवरून उठून उभी राहिली व नरेंद्राच्या पलंगाकडेस येणार इतक्यांत नरेंद्र भीतीनें कांपत असलेला तिच्या दृष्टीस पडला. ती लगबगीनें तशीच धांवली व तिनें त्याचे घाय वगैरे नीट तपासून पाहिलें. पण नरेंद्राचें घाय भरून अंगांतील ज्वरही कमी झाला होता. केवळ अशक्तता मात्र राहिली होती. यवनकन्या काळजीपूर्वक आपले घाय पहात आहे हें पाहून नरेंद्र अत्यंत विस्मयानें तिच्या मुखाकडे पाहूं लागला; पण नरेंद्राच्या स्पर्शानें यवनकन्येच्या मुखकमलावर दंवाप्रमाणें घर्मबिंदु दिसूं लागून तिच्या समस्त शरीरांतून रक्तावेग चालू झाला व डोळे ताठल्यासारखे होऊन तिचा उरोज धडधड उडूं लागला.

सर्वच अनोळखी पाहून घोटाळ्यांत पडलेला नरेंद्र अगोदरच यवनकन्येच्या व खोजाच्या भाषणामुळें भ्याला होता, तो तिची (जलेखेची) वरील स्थिति पाहून आश्चर्य व भीति यांनीं थक होत्साता तिला म्हणाला—सुंदरी, कृपा करून आपलें नांव गांव सांगून मी कुठें आहे तें सांगशील तर मजवर मोठे उपकार होतील. ”

सर्वत्र शांत असलेल्या मध्य रात्रींत मेघाच्या गडगडाटानें लोक ज्याप्रमाणें दचकून उठावेत, त्याप्रमाणें नरेंद्राच्या ह्या प्रश्नानें यवनकुमारी जलेखा एकदम दचकली व कांहीं उत्तर न देतां तिनें आरक्त ओंठावर आपली सुकोमल करांगुलि मात्र ठेविली ! नरेंद्र हें पाहून पुन्हां म्हणाला–" मज गरिब निराश्रितावर दया करून मी विचारलेल्या प्रश्नाचीं उत्तरें दिल्यास फार उपकार होतील." यवनकन्येनें कांहीं न बोलतां पुन्हा आपल्या ओंठावर करांगुलि मात्र ठेविली ! नरेंद्र मोठ्या संशयात आणि विवंचनेंत पडून तिला विचारूं लागला, " सुंदरी मला वाटतें, मी कोणत्या तरी संकटांत पडलों आहें. जन्मतांच मी अभागी असल्यामुळे तसें होणें साहाजिक आहे. तरी पण दोन शब्द बोलून माझ्या संशयाची निवृत्ति कर. सांग सांग, सुंदरी खराच का मी भयंकर स्थितींत आहें ?"

यवनकन्येनें पुन्हा आपल्या ओंठावर अंगुली ठेवून तोंड फिरवून घेतलें. तरी पण नरेंद्राला तिच्या नेत्रांतून चाललेला अश्रुप्रवाह दिसल्यावांचून राहिला नाहीं. अशा स्थितींत तिला जास्त विचारणें व्यर्थ समजून त्यानें खालीं मान घालून एक दीर्घ निश्वास टाकून ह्मटलें, " हाय ! नरेंद्रा, तुजसारखाही अभागी कोणी नसेल ! "

इतक्यात ' जलेखा अभागिणी ' असे अस्पष्ट शब्द त्याला ऐकूं आले. म्हणून तो वर पहातो, तों जलेखा तेथून जातांना त्याला दिसली.

प्रकरण बारावें.

स्वप्न कीं इंद्रजाल ?

Ye high exaulted, virtuous dame,
They up in godly laces
Before ye give poor frailty names.
Suppose a change o'cases.

'Burns.'

बरेच दिवसांनंतर नरेंद्राची प्रकृति अगदीं निकोप झाली. पण केवळ शरीराच्या स्वास्थ्यानें काय होणार ? त्याच्या अंतःकरणाला कुठें स्वस्थता होती ? तो ज्या महालांत रहात होता तेथें मसरूर खोजा व जलेखा ह्यांच्याशिवाय तिसरें कोणीही येत नव्हतें. व आलेंच तर, एक शब्द देखील बोलत नव्हतें ! त्यानें मसरूरला कांहीं विचारावें तर तो कांही न बोलतां बाहेर निघून जाई व जलेखा ओंठावर अंगुली ठेवून स्तब्ध राही ! ह्या तिच्या आचरणावरून स्पष्ट दिसून येत असें कीं बिचारी यवनकन्या नरेंद्राच्या दुःखानें दुःखी आहे.

नरेंद्रानें पुष्कळ विचार केला, पण आपण कोठें आहों, याचा त्याला शोध लागेना. तेव्हां तो मनाशीं ह्मणूं लागला—" मी बंगाल्यांत असून सुलतान सुजा साहेबच का माझी व्यवस्था ठेवीत आहेत? होय, हें संभवतें. कारण, त्यांच्या अकृत्रिम प्रेमावांचून अशी व्यवस्था लागावयाची नाहीं." इतक्यांत त्याला कांहीं आठवल्यासारखें होऊन तो पुन्हां मनाशीं ह्मणूं लागला—" पण सुलतान सुजा साहेबाचा तर काशी येथील युद्धांत पराभव झाल्याचें आणि मी रणभूमीवर घायाळ होऊन पडल्याचें अजून मला आठवतें! तर, काय मी शत्रूच्या हातीं सांपडून त्यांनीं माझी बलीदानासाठीं ही सुश्रुषा चालविली आहे? असेलही! पण मजसारख्या एका निराश्रित हिंदु मुलाला बळी दिल्यानें ह्यांना काय बरें मिळेल?" ह्याप्रमाणें तो विचारांत निमग्न असतां मध्य रात्रीचा गजर झाला, ह्मणून त्यानें सहजगत्या मान वर करून पाहिलें, तो त्याला यवनकन्या जलेखा उभी असलेली दिसली. ह्यावेळीं तिचें मुखमंडल निस्तेज, ओठ पांडुरवर्ण, केशकलाप अस्ताव्यस्त व डोळे अश्रूंनें भरलेले असे दिसले. हें पाहून फार आश्चर्य वाटून त्यानें तिला आतुरतेनें विचारिलें—" सुंदरी, तुं कोण आहेस आणि तुझा अभिप्राय काय आहे, हें समजावें म्हणून मी फार उत्कंठित आहें. तुझी ही स्थिति पाहून मला फार फार वाईट वाटतें."

मलेखेनें कांहीं उत्तर दिलें नाहीं, पण तिच्या डोळयांतून अश्रूंचा एक थेंब मात्र पडला, हें पाहून नरेंद्र तिला म्हणाला—" सुंदरी, तुझ्या हृदयरुपी उद्यानांत कांहीं तरी दु:खकंटक आहे. जर मजकडून कांहीं होण्यासारखें असेल तर तें करण्यास मी तयार आहें."

यवनकन्या अजूनही स्तब्धच. तरी नरेंद्राच्या ह्या प्रेमसूचक वाणीनें तिच्या डोळयावाटे पुन्हां अश्रुप्रवाह चालूं झाला ! पण तो हळूच पदरानें पुसून तिनें आपल्या करांगुलींतील आंगठी काढून नरेंद्राच्या करांगुलींत घातली व आपण गजगतीनें बाहेर निघून गेली.

मध्य रात्रीच्या प्रसंगीं झालेल्या यवनकन्येच्या ह्या भेटीनें नरेंद्र मोठ्या विस्मयांत पडला. त्याला ह्या भेटीचा कांहींच अर्थ समजेना. तिच्यावर काय संकट आलें असावें, ह्याचा विचार करीत तो तिनें प्रेमानें घातलेल्या अंगठीकडेस पहात बसला. इतक्यांत तेथला दिवा विझून सर्वत्र अंधार झाला व त्या अंधारांतच एक खोजा येऊन त्यानें त्याला आपल्या बरोबर चालण्यास खूण केली ! निरूपाय जाणून नरेंद्र भीत भीत त्याजबरोबर चालूं लागला. हे दोघे चालत असतां ह्यांनीं किती आंगणें व चौक ओलांडले असतील, हें त्यांचें त्यांनाच ठाऊक ! नरेंद्रानें बंगालची राजधानी राजमहाल पाहिली होती आणि तेथलें वैभवही त्याच्या स्मरणांतून गेलें नव्हतें;

पण ही शोभा व हें वैभव त्या सर्वांवर वरचढ होतें. कोठें स्फटिकाच्या महालांत सुंदर व सुगंधित दीप जळत आहेत, कोठें विस्तीर्ण अंगणांतील कारंज्याचे तुषारांची चंद्रप्रकाशांत विचित्र शोभा दिसत आहे, कोठें मध्यंच एखादी सुंदरशी बाग असून ती फलपुष्पांनीं बहरली आहे व तीतील फुलांचा सुगंध मंद वायूच्या योगानें चोहोंकडे पसरत आहे. कोठें एक दोघी तरूण सुंदर स्त्रिया पांढरा स्वच्छ पोषाक करून चंद्रप्रकाशांत इकडे तिकडे फिरत आहेत, कोणी निद्रा देवीच्या आराधनेची तयारी करीत आहेत, कोठें दरवाजावर चोगेलोक स्थिरतेनें पहारा देत आहेत. मधून मधून आंगणाच्या पलीकडल्या बाजूस असलेल्या महालांमधून किंवा त्याच आंगणांतून मधुर वीणाध्वनि ऐकूं येत आहे. त्याचप्रमाणें दूर वहात असलेल्या एका नदीचा कलकल शब्दही कानाला आनंदीत आहे. ह्याप्रमाणें राजवाड्याची ती अपूर्व शोभा, ते सुंदर बागबगीचे व त्या फिरत असलेल्या सुंदर तरूण स्त्रिया पाहून नरेंद्र आनंदाश्चर्यांत बुडून गेला. तो कोठें होता, हें त्याला कांहींच कळेना.

ह्याप्रमाणें कांहीं वेळ गेल्यावर तो एका सुवर्णखचित दाराजवळ पोंचला व लगेच तें दार आंतून कोणीं उघडलें. नरेंद्र आश्चर्यानें चोहोंकडे पाहूं लागला पण अंधारांतून एकदम उजडांत आल्यामुळें त्याला कांहींच दि-

सेना. अति व अकस्मित् प्रकाशानें त्याचे डोळे दिपून गे-ल्यामुळें त्याच्यानें सहसा पहावेना, ह्मणून त्यानें आपल्या हाताच्या तळव्यांनीं आपले डोळे झांकून घेतले. इतक्यांत, पुष्कळशा बायकांच्या हास्यमय संभाषणांनीं तो प्रचंड महाल प्रतिध्वनित होऊं लागला ! हा प्रकार पाहून नरेंद्राला फारच आश्चर्य वाटलें. 'आपण कोठें आहोंत' आणखी 'दिसत असलेला प्रकार खरा आहे कीं स्वप्न आहे' ह्याचा त्याच्यानें कांहींच निर्णय होईना. कांहींवेळ झाल्यावर नरेंद्रानें हळूंच डोळे उघडले. पण काय ? पूर्वींप्रमाणेंच त्याची दशा होऊन स्त्रियांच्या हास्यध्वनीनें त्याला ह्या वेळींही घोंटाळ्यात पाडिलें ! कांहीं वेळ गेल्यावर एकदांचे डोळे दिपणें बंद झालें व नंतर त्यानें जें कांहीं पाहिलें, त्या योगानें तर त्याचें मन दशगुणित घोंटाळ्यांत व विस्मयांत पडलें ! नरेंद्रानें लक्षपूर्वक पाहिलें, तेव्हां त्याला समजलें कीं आपण एका संगमरवरी दगडाच्या महालांत आलों असून सध्यां त्यांतील दिवाणखान्यांत आपण उभे आहोंत. बहुमूल्य मणिमय स्तंभावर अटकविलेल्या गुच्छांच्या व तेथें दोन्ही रांगांनीं उभ्या असलेल्या स्त्रियांच्या गळ्यांतील पुष्पमालांच्या सुवासानें सर्व दिवाणखाना दरवळून गेला आहे. हंड्या, झुंबरें इत्यादिकांतील दीपप्रकाशानें डोळे दिपत आहेत. दोन्ही बाजूस शेंकडों स्त्रिया रांगेनें उभ्या असून मध्य मार्गी

रत्नखचित सिंहासनावर एक सुंदरी बसली आहे. हें सर्व पाहून नरेंद्राला फारच आश्चर्य वाटलें. तो मनांत म्हणाला, ही सुंदरी मानवी जातीची आहे कीं कोणी देवांगना अप्सरा आहे ? आणखी, मी पहातों हें स्वप्न आहे कीं इंद्रजाल ! नरेंद्रानें " अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी " वाचल्या होत्या, तेव्हां हा प्रकार पाहून; आपण त्या ग्रंथांतील " झोपी गेलेला जागा झाला " या गोष्टींतील नायकच झालों आहों, असें त्याला वाटलें. किंबहुना त्याची स्थिति त्या गोष्टींतील नायकापेक्षांही विशेषच आश्चर्यजनक झाली ! त्याला वाटे मी नंदनवनांत अप्सरांनीं वेष्टिलेलाच बसलों आहें ! !

ह्याप्रमाणें नरेंद्र आश्चर्यचकित होऊन समोर पहात असतां त्याला आढळलें कीं दोन्ही बाजूस उभ्या असलेल्या स्त्रिया आपापल्या छातीवर हात ठेवून निस्तब्ध भावानें जीवनशून्य (निर्जिव) पुतळ्याप्रमाणें खालीं पहात उच्च सिंहासनावर बसलेल्या आपल्या राणीच्या आज्ञेची वाट पहात उभ्या आहेत. राणी ह्मणण्यासारखी तरूण नव्हती. तरी पण तिचें सौंदर्य व तारुण्यांतील धुंदी अजून पर्यंत कांहीं कमी झाली नव्हती. जणू काय तिचें वय जसजसें वाढत होतें, तसतसी तिची धुंदी व रंगेलपणा जास्तच वाढत होता ! तिचें शरीर बळकट व कपाळप्रशस्त असून ओंठ आरक्त व शरीराचा रंग

गुलाबाप्रमाणें होता. केस काळेभोर असून त्यांत खोंवलेलें हिऱ्याचें फूल प्रकाशांत धगधग करीत होतें. ह्यावेळीं ही मलमलीचें पातळ नेसली होती. हिला पाहून नरेंद्राला वाटलें कीं, ही कोणी मानवी स्त्री असो कीं अप्सरा असो, पण स्वर्ग व मृत्युलोकीं शासन करण्यासाठीं असाधारण स्त्रीरूपानें अवतीर्ण झाली आहे, हें खास.

इतक्यांत स्वर्गीय यंत्रध्वनीप्रमाणें एक मधुर स्वर ऐकूं आला व त्याबरोबरच त्या उभ्या असलेल्या स्त्रियाही गाऊं लागल्या. नरेंद्रानें असें मधुर गायन ह्यापूर्वीं कधीं ऐकिलें नव्हतें. हें गाणें ह्या प्रचंड राजमहालास भेदून आकाशमंडलांत पसरूं लागलें. जणु काय, रात्रीं गुप्तपणें संचार करणाऱ्या जिवांनीं त्या गाण्यांत आपला सूर मिळवून तें शतपट वाढविलेंच होतें ! क्रमाक्रमानें तें गाणें बंद होऊन समस्त राजवाडा शांत झाला. ह्याप्रमाणें क्रमानें दोन तीन वेळां गाणें होऊन अखेरीस तें बंद झालें गाणें संपत आहे तोंच बेगमेनें रागानें भूमीवर पाय आपटला व त्याबरोबर दिवानखान्याच्या एके बाजूस एक रक्तवर्ण पडदा पडला. नरेंद्र भीतीनें चळचळां कांपत तिकडे पहात असतां, पडद्यापलिकडे चार कृष्णवर्ण भयंकर खोजे हातांत नग्न तलवारी घेऊन उभे असलेले त्याला दिसले. ह्यावेळीं त्यांनीं रक्तवस्त्र परिधान केलें होतें, ह्यामुळें तर ते अधिकच भयकर दिसत होते. इतक्यांत

बेगमेनें जमिनीवर पुन्हा पाय आपटला ! त्यासरसे त्या खोजांमधून एकजण सिंहासनाजवळ येऊन उभा राहिला. नरेंद्रानें हळूंच मान वर करून त्याकडे पाहिलें, तों तो मशरूर खोजा होता असें त्याला दिसलें. त्याला पाहून नरेंद्राचें तर रक्तच गोठून गेलें !

मशरूर बेगमसाहेबाबरोबर बोलत होता, पण तो काय बोलत होता, हें त्याला समजलें नाहीं. परंतु मधूनमधून त्याचें त्याकडे अंगुलीनिर्देश करून दांत खाणें, डोळे लाल करून टवकारून पहाणें, वगैरे प्रकार पाहून नरेंद्राच्या मनांत भयाचा संचार होऊं लागला. बेगमेनें मशरूर खोज्याचें बोलणें ऐकून घेतल्यावर रागानें पुन्हां एकवार जमिनीवर पदाघात केला व त्याबरोबर एके बाजूस एक हिरवा पडदा पडला ! जवळच चार दासी हिरवा पोशाक केलेल्या उभ्या होत्या. बेगमेनें पुन्हां जमिनीवर पाय आपटला, तोंच त्यां दासींपैकीं एक दासी तिच्याजवळ आली. नरेंद्र हा प्रकार पाहून भयचकित व विस्मययुक्त होत्साता तिच्याकडे पहातो, तों ती त्याची पूर्वपरिचिता जलेखा !

जलेखा काय बोलली हें नरेंद्राला ऐकूं आलें नाहीं. परंतु तिच्या त्या मुद्रेवरून व अंगविक्षेपावरून वाटत होतें कीं ती कोणत्या तरी अनाथ मनुष्याच्या रक्षणार्थ रदबदली करीत आहे. तेथें असलेल्या प्रत्येकाला वाटलें

कीं जलेखेच्या त्या रदबदलीमुळें बेगमसाहेबाचा क्रोध शांत झाला व तिच्या त्या खवळलेल्या अंतःकरणांत दया आली. खरोखरच ह्यावेळीं राणी साहेबाच्या डोळ्यांवरून व सस्मित ओंठावरून वरील चिन्हें स्पष्ट दिसत होतीं.

जलेखा नरेंद्राकडे वारंवार अंगुलीनिर्देश करूं लागली आणि बेगमही वारंवार त्याजकडे पाहूं लागली. त्या सौंदर्यदेवतेच्या पाहाण्यानें—स्त्री असो कीं पुरुष असो—सर्वांचें मोहित होणें संभवनीय होतें. नरेंद्राचा रंग स्वभावतःगौर. पण नुकतांच तो दुखण्यांतून उठल्यामुळें त्याचा चेहरा पांडुरवर्ण झाला होता. त्याचे नेत्र पाणीदार, ललाटभाग विशाळ व चेहरा अमळ उग्र पण तेजस्वी. आयुष्यघटिका संपत आली हें जाणून नरेंद्र निर्भयपणें आरक्त ओंठावर दांत दाबून खालीं एकाग्र दृष्टीनें पहात लांब श्वास टाकीत उभा होता. वाचक, ह्या असल्या सुंदर व साहसी अल्पवयस्क कुमाराच्या मुख सौंदर्यानें कोणत्या स्त्रियेचें मन कळवळणार नाहीं बरें ?

असो; अखेरीस बेगमसाहेबांनीं जलेखेला आज्ञा दिल्यावरून ती नरेंद्राजवळ येऊन " हम लोगोंका जीना हमारेही-तुह्मारे हात है. सिंहासनके करीब जाकर आरजू करो तबही जान बच सकती है. " असें म्हणून तिनें त्याचा हात धरिला व त्याला सिंहासनाजवळ घेऊन गेली. नरेंद्र मोठ्या विचारांत पडला. हें काय आहे, हें त्याला

कांहींच कळेना ! बरें, प्रार्थना करावी, तर ती करावी तरी काय ! ह्या विचारांत तो बराच वेळ गढून गेला होता. त्याची ती स्थिति पाहून बेगम साहेबांना वाटलें, हा गर्वानेंच असा उभा आहे ! ह्मणून तिनें रागानें लाल होऊन त्याची शिफारस करणाऱ्या जलेखेला एक लाथ मारिली व लगेंच आज्ञेनुसार मशरूर खोजा व त्याच्या हाताखालील आणखी तीन खोजे नागव्या तरवारींनिशी येऊन त्यांनीं नरेंद्राला घेरलें. बेगम पुन्हां नरेंद्राच्या डावीकडेस क्षणेक पाहून तेथून निघून गेली. तिनें आपल्या डाव्या बाजूस कां पाहिलें ह्मणून नरेंद्र आपल्या त्या बाजूस पहातो तों आपल्या डाव्या करांगुलिकेंत जलेखेनें प्रेमपूर्वक घातलेली अंगठी !

एका मागून एक सर्व दिवे मालवून त्या भव्य मंदिरांत चार भयंकर खोजाशिवाय व नरेंद्राशिवाय कोणीही राहिलें नाहीं. सर्वत्र अंधःकार पाडून, ते चार काळपुरुषाप्रमाणें भासणारे खोजे बिचाऱ्या नरेंद्राला बांधूं लागले.

× × × ×

नरेंद्र त्या वेदनेनें अत्यंत व्याकुळ होऊन निचेष्टित पडला. मागें काय चाललें होतें, तें तो मुळींच जाणत नव्हता. मात्र कांहीं वेळानें त्याला भास झाला कीं " अंधारांत कोणी त्याजवळ येऊन त्याच्या हातांतील

अंगठी काढीत असून जवळच कोणी व्यक्ति स्फुंदस्फुंदून रडत आहे. " त्या वेळीं त्याला त्या व्यक्तीची ओळख पटली नाहीं. पण मागाहून पडलेल्या स्वप्नांत ती रडणारी व्यक्ति दुसरी तिसरी कोणी नसून अभागिनी ' जलेखा ' होती, असें समजलें.

× × ×

कांहीं वेळ गेल्यावर नरेंद्रनाथ शुद्धीवर आला. आणि पहातो तों सूर्योदय झाला असून आपण त्या कोवळ्या उन्हामध्यें एका प्रशस्त चौकांत (बाजारांत) लहानशा पर्णकुटिकेसमोर पडलों आहोंत. प्रभातकालीन सूर्यकिरणें सर्वत्र प्रकाशमय करीत असून जिकडे तिकडे आनंदही आनंद चालला आहे. हें पाहून नरेंद्र मोठ्या विस्मयांत पडला ! हें कोणतें शहर असावें ! बंगालची राजधानी राजमहाल तर नव्हे ? असेल कदाचित ! पण मी येथें आलों कसा ! सुलतान सुजानें तर मला काशीहून येथें आणलें नाहीं ? आणि काल रात्रौ येथेंच ह्या भूमीवर निजलों असतां प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें राजमंदीर वगैरेचें स्वप्न तर पडलें नसेल ! वाचक ! नरेंद्र अजून हें जाणत नाहीं कीं तें स्वप्न नसून इंद्रजालाचें तंत्र आहे.

प्रकरण तेरावें.

गजपतिसिंह.

Hail majesty most excellent ! while nobles
strive to please ye
Will you eccept a compliment
A simple poet gives eye ?

'Burns'

नरेंद्राच्या आश्चर्याला पारावार नाहीं ! तो हल्लीं जेथें पडला होता, तें स्थल त्यानें पूर्वी कधींही पाहिलें नव्हतें. तरी पण एखाद्या मोठ्या धर्मशाळेप्रमाणें तें त्याला दिसलें. मध्यमागीं प्रशस्त आंगण व त्याच्या सभोंवति सुंदर दोनमजली इमारत असून तींत मधून मधून बऱ्याच खोल्या दृष्टीस पडत होत्या. प्रत्येक खोलींत उतारू उतरले असून व्यापार धंद्यासंबंधीं त्यांचें बोलणें चाललें होतें कित्येक पारशी, मुसलमान, हिंदु वगैरे जातींचे व्यापारी ह्या भव्य धर्मशाळेंत पहिल्यानेंच उतरले असून त्यांनीं रात्रौ लावून घेतलेला धर्मशाळेचा थोरला दिंडी दरवाजा नुकताच सूर्योदय झाल्यामुळें उघडला होता. व त्यामुळें लोकही धर्मशाळेच्या आंत बाहेर जाऊं येऊं लागले होते.

अशावेळीं ह्या धर्मशाळेंतील दुसऱ्या मजल्यावर इराण देशचा एक म्हातारा मुसलमान व्यापारी थंडीनें कुडकुडत बसला होता. नरेंद्र त्याजकडे जाऊन विनयानें म्हणाला—"शेखजी, आपण जे येथें उतरला आहांत, त्या जागेचें नांव मला सांगाल का? मी नुकताच येथें आलों असल्यामुळें माझ्या समजुतींत कांहींच येत नाहीं!" म्हातारा व्यापारी म्हणाला, "बेटा मैंभी सौदागरीके लिये कलही आया हूं, इस शहरकी कुछ ज्यादा कैफियत नहीं जानता" नरेंद्र पुन्हां म्हणाला—तरी पण म्हातारे बाबा, तुम्हाला मजपेक्षां जास्त माहिती असेल! ह्या शहराचें नांव काय आहे, तें तर सांगा. म्हातारा व्यापारी म्हणाला, "बेटा, मैं दरहकिकत यहांका कुछ हाल नहीं जानता, लेकिन सुनता हूं इसका नाम बेगम साहेबकी सराय है. पादशहाकी बडी लडकीनें नये मुसाफिरोंके वास्ते इसे बसाया है. मैंने समरकंद और बुखारा देखा है, शीराज और इस्पहानभी नजरोंसे गुजार चुका हूं. लेकिन ऐसा बढिया शहर कभी नहीं देखा."

नरेंद्र—काय ह्मटलें म्हातारे बाबा, ह्या शहराचें नांव बेगमसाहेबाची सराय? वा!

हें नरेंद्राचें भाषण म्हाताऱ्या व्यापाऱ्यास चमत्कारिक वाटून त्यानें त्यांजकडे कांहीं वेळपर्यंत सूक्ष्मदृष्टीनें न्याहाळून पाहिलें व आपल्या एका चाकरास हाक मारून

ह्मटलें " अरे ! यह बेभकल बिलकुल पागल नजर आता है, इसको मना करो. न जाने पागलपनेमें क्या कर बैठे !"

नरेंद्रानें ह्मातार्‍याचा रोख जाणून तेथून हळूच धर्मशाळेच्या दुसर्‍या बाजूस पाऊल वळविलें. तिकडे एक ह्मातारी बायको डोकीवर फळांची पाटी घेऊन र्‍याषा र्‍यांच्या घोळक्यांत जातांना त्याच्या दृष्टीस पडली. तिला तरी, ही धर्मशाळा कोणाची व ह्या शहराचें नांव काय हें विचारावें ह्मणून नरेंद्र तिच्याजवळ गेला व म्हणाला—" बया ही धर्मशाळा कोणाची बरें ?" नरेंद्राच्या प्रश्नावरून ह्मातारीनें त्याजकडे कांहीं वेळ विस्मयापन्न दृष्टीनें पाहून ह्मटलें—" अरे मेल्या, माझ्या बयाकडे तरी कांहीं पहा. थट्टाच करावयाची, तर तिकडे दुसरीकडे जा. तुझ्या ह्या गोर्‍या गोमट्या चेहर्‍यावर पुष्कळशा नव्या तरण्या पोरी भाळतील !" ह्मातारीच्या ह्या उत्तरानें नरेंद्र अगदीं स्तब्ध होऊन उभा राहिला.

थोडावेळ निघून गेल्यावर नरेंद्र पहातो तों एक रजपूत स्वार समोर उभा असून आपल्या मोतद्दारास " लवकर आटोप !" ह्मणून हुकुम फर्मावित असलेला त्याचा दृष्टीस पडला. याजवळ तरी कांहीं शोध लागेल ह्मणून नरेंद्र नम्रतेनें त्याला ह्मणाला—" महाराज मी नुकताच इथें आलों असल्यामुळें ही धर्मशाळा वगैरे कोणीं बांधिली हें मला कांहींच माहित नाहीं. आपण येथें

बरेंच दिवसांपासून असाल असें मला वाटतें. तरी आपण तेवढें सांगण्याची मेहेरबानी कराल असें मला वाटतें.

स्वार आपल्या गडबडींत असल्यामुळें त्यानें नरेंद्राचें फक्त अखेरचेंच वाक्य ऐकून म्हटलें–" ह्या प्रवासांत दुसऱ्यांला साह्य करण्यापुरते पैसे आम्ही बाळगीत नसतो. मोठ्या दुखाची गोष्ट आहे कीं तूं असा तरणाबांड असून भीक मागवयाला तुला लाज वाटत नाहीं ! तुझ्याच वयाचे असताना युद्धव्यवसायांत आम्हीं शिरलों आहोंत. शौर्य असल्यास तूंही ये आणि महाराज यशवंतसिंहाच्या सैन्यांत आपलें शौर्य दाखीव. युद्ध व्यवसायासारखा दुसरा व्यवसाय नाहीं. महाराज यशवंतसिंह आह्मा लोकांला फार चाहतात आणि आम्हींही त्यांच्याकरितां घरादाराची–फार तर कायप्राणाचीही–परवा करीत नाहीं. जेथें रहातो, तेंच आमचें घर. काल आपल्या जन्मभूमींत होतों. आज ह्या हिंदुस्थानच्या राजधानींत (दिल्लींत) आहोंत व उद्यां नर्मदेच्या तिरावर उतरलेल्या यशवंतसिंहाच्या सैन्यास मिळून ओरंगजेब व मुराद ह्या दोघांचीं शिरें कापून आणूं ! धैर्य असल्यास ये अथवा भीति वाटत असल्यास निघून जा. रजपूतवीर भित्र्या लोकांशीं बोलत देखील नाहींत."

नरेंद्र स्वाभाविक तेजस्वी असल्यामुळें त्याला ह्या रजपूत विराची गर्वोक्ति सहन झाली नाहीं. राग-

नें लाल होऊन तो म्हणाला—बच्याजी, जगांत केवळ आपणासच युद्धव्यवसायी समजूं नये. मींहीं त्याचा अनुभव घेतला आहे. लढण्याच्या कामांत मी भिडून मरणारा आहें कीं भिऊन पळणारा आहें, हें आमचे सुभेदार मात्र जाणतात. रजपूत वीरा ! असें समजूंनकोस कीं मी तुजजवळ भीक मागत आहें !

रजपूत स्वार नरेंद्राच्या ह्या भाषणानें चकित होऊन त्याजकडे निरखून पाहून ह्मणाला—' सद्गृहस्थ, मीं तुह्माला पूर्वी पाहिलें आहेंसें वाटतें. तुम्ही बंगाल मधून आला आहांतना ? मला वाटतें, तुम्ही मला विसरून सुद्धां गेलांत !

नरेंद्र कांहीं वेळपावेंतो त्या स्वाराकडे पाहून म्हणाला; नाहीं नाहीं, गजपतिसिंह ! मी तुम्हाला विसरलों नाहीं. काशीच्या युद्धप्रसंगीं तुम्हीं केलेलें माझें रक्षण अझून मी स्मरतों आहें ! नुकत्याच दिलेल्या माझ्या दांडग्या उत्तराबद्दल आपण मला क्षमा करालच !

ह्याप्रमाणें उभयतांचा पूर्वपरिचय पटल्यावर बराच वेळपर्यंत त्यांचें क्षेमकुशल चाललें होतें. तें संपल्यावर गजपतिसिंह ह्मणाला – मी महाराज जयसिंहाकडून कांहीं जरूरीचे कागद पत्र घेऊन आमचे धनी यशवंतसिंह महाराज यांचेकडेस चाललों आहे. त्याची स्वारी औरंगजेबाशीं युद्ध करावयासाठीं उज्जयनीला गेली आहे. तरी

युद्ध व्हावयाचे अगोदर मला तेथें पोंचलें पाहिजे. नरद्रें ! तुमची इच्छा असली, तर मजबरोबर चला. मी महाराजास सांगून तुम्हाला घोडेस्वाराच्या पलटणींत भरती करवीन.

नरेंद्रानें आपणास ह्या जगांत कोणी गणगोत नाहींसें जाणून व जवळ पैसाही नाहीं असें पाहून गजपतिसिंहाच्या बोलण्यास रुकार दिला, व नम्रतेनें म्हणाला–

गजपतिसिंह, मला एक विनंति करावयाची आहे. ती आपण मान्य कराल अशी आशा आहे. हंसूनये. मी ह्या देशांत आलों त्यावेळीं फार आजारी असल्यामुळें मला येथें कोणीं आणिलें हें मी मुळींच जाणत नाहीं. त्याचप्रमाणें ह्या शहरांत मी पूर्वी कधीं आलों नसल्यामुळें, ह्याचें नांव काय तेंही मला माहित नाहीं ! तेव्हां तें कृपा करून सांगाल असें मला वाटतें

गजपतिसिंह—तुम्ही ह्या शहराचें नांव विचारीत आहांत, हें ऐकून लोक तुम्हाला जरूर हंसतील. एवढेंच नव्हे, पण वेडा देखील ह्मणतील ! अशी विस्तिर्ण व राजवाड्याप्रमाणें सुंदर धर्मशाळा दिल्ली शहराशिवाय कोठें तरी असण्याचा संभव आहे ?

अत्यंत प्राचीन दिल्ली शहराचें नांव ऐकून नरेंद्राला फार विस्मय वाटला व तो ह्मणाला—मी तर बंगाल्यांतला रहाणारा ! मला येथें आणिलें आहे कोणीं ? आणि तें पण कधीं ? स्वप्नांत पाहिलेल्या अप्सरांनीं तर मला

बंगाल्यांतून किंवा प्रयागाहून येथें उचलून आणिलें नाहीं-ना ! काय असेल तें असो ! असें ह्मणून नरेंद्र विस्मयानंदानें निस्तब्ध होऊन क्षणेक उभा राहिला व मग गजपतिसिंहाबरोबर तो दिल्ली शहर पहावयास निघाला. शहराची अपूर्व रचना, मोठमोठ्या मशिदी, अमीर उमरावांच्या दांडग्या हवेल्या, बादशाही हमामखाने, वगैरे पाहून नरेंद्र आनंदाश्चर्यानें निमग्न होत व रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या सरदार मानकऱ्यासंबधानें नानाप्रकारचे प्रश्न विचारीत गजपतिसिंहाबरोबर किल्यासमोरील मैदानांत पोंचला.

प्रकरण चवदावें.

बाल फकीर.

Beware of the day,
When the low lands shall melt thee in
qattles array,

'Campbell.'

दिल्ली शहराची शोभा पहात व त्यासंबंधीं गोष्टी करीत गजपतिसिंह व नरेंद्रनाथ किल्यासमोरील अफाट मैदानांत येऊन पोंचले, हें मागील भागांत सांगितलेंच आहे. ह्या मैदानांत लोकांची मारे गर्दी उसळलेली होती. मोठमोठे श्रीमान लोक कोणी पालख्यां-

तून, कोणी हत्तीवरून व कोणी घोड्यांवरून इकडून तिकडे जात आहेत, व्यवसायी व व्यापारी लोक आपापल्या धंद्याच्या घडामोडींत निमग्न आहेत, कोणी नुसता त्यांचा तमाशाच पहात आहेत, कोणी गाणें ह्मणून व कोणी नाचून पैसा मिळवीत आहे, कोणी जादूचा खेळ करीत आहेत, कोणी ज्योतिषी बनून जमलेल्या मंडळीचे हात पहात त्यांना शुभाशुभ फल सांगत आहेत व मंडळींतून कोणी वस्त्र, कोणी पैसा, वगैरे त्यांस देत आहेत. अशा प्रकारें एकच धामधूम मैदानांत चालली होती. नरेंद्रानें ह्या मंडळींतच एक अपूर्व ज्योतिषी पाहिला. त्याचें वय फार झालें तर चवदा वर्षांचें असेल. तोंडवळा अगदीं कोमळ व गोरा असून उन्हाच्या तापानें लाल झाला होता. खांद्यावरून व गंडस्थळावरून रुळत असलेल्या आपादलंबिनी जटा जरी अंमळ त्याच्या डोळ्यांवरून आल्या होत्या, तरी त्याच्या त्या तेजःपुंज डोळ्यांतून लखलखणारें तेज त्यांत कांहीं लपलें नव्हतें ! त्याचे सर्व अवयव सुकुमार व तेजस्वी असून त्यानें आपल्या मस्तकावरून पायांपर्यंत सर्व शरीर काळ्या वस्त्रानें वेष्टून घेतलें होतें. असा हा तार्तर देशीय यवनबालक जमलेल्या मंडळींतून कोणाजवळूनही पैसा न घेतां फुकटच त्यांचे हात पाहून फलाफल सांगत होता. ह्या तार्तर देशीय बालज्योतिषाचें रूप पाहूनच पुष्कळसे लोक त्या सभोंवती जमले. नरेंद्रनाथ

व गजपतिसिंहही त्यांतच होते. गजपतिसिंहानें प्रथम आपला हात दाखवून विचारलें-" ज्योतिषी बुवा, दिल्ली शहर सोडून आम्हीं आज रात्रीं कोणी कडे जाऊं बरें?"

यवनबालकानें गजपतिसिंहाकडे वळून त्याचा पेहराव व चेहरा नीट पाहून म्हटलें-" महाराज जसवंतसिंग नर्मदा तीर गये हैं, तुम भी वहां जावोगे. "

" महाराज यशवंतसिंह औरंगजेबाशीं लढायला गेले आहेत, हें सर्व आबाल वृद्धांना माहित झालें आहे. आणि मी क्षत्रिय स्वार आहें, हें माझा पोषाक पाहून कोणी ही सांगू शकेल ! यांत कांहीं तुम्ही मोठेंसें गुह्य नाहीं सांगितलें ! " अट्टाहास पूर्वक गजपतिसिंह म्हणाला.

" रजपूत, हम औरभी बता सकते है ! औरंगजेबके हाथसे सब राजपूत काटे जायंगे. महाराजसें कह देना एक उमदा घोडा चुनलें, नहीं तो भागनेका भी मौका न मिलेगा. सातहजार राजपूतोंमेंसे सतत्तर भी बचने न पावेंगे ! क्षत्रियकुंवर इस लढाईमें तुम जरूर ही मारे जावोगे. " यवनबालक रागानें डोळे लाल करून जटा सांवरीत, डोकें हालवीत म्हणाला.

गजपतिसिंह एवढा साहसी योद्धा, पण यवनबालकाची आकृति, गंभीर स्वर व तेजःपुंज दृष्टि पाहून त्याच्या भापणाऱ्या सत्यतेबद्दल त्याला संशय उरला नाहीं.

मूर्तिमंत मृत्यु दृष्टीसमोर उभा राहून आपल्याला बोलावीत आहे, असें त्याला वाटलें. भीतीनें रक्त गोठल्यासारखें झालें पण कांहीं वेळानें हा भाव पालटून गजपतिसिंह म्हणाला—कांहीं चिंता नाहीं. ईश्वराच्या मनांत जर असेंच असेल, तर महाराज यशवंतसिंहाच्या रक्षणासाठीं हा माझा देह मी मोठ्या आनंदानें रणदेवीस अर्पण करून नगांत अखिल कीर्ति मिळवीन. क्षत्रियांच्या रक्ताचा पात रणांतच होत असतो.

सर्वजण क्षणेक स्तब्ध झाले. नंतर नरेंद्रनाथ यवनबालकास आपला हात दाखवून विनोदानें म्हणाला, " अहो, त्रिकालज्ञ जोतिषी बुवा ! माझें नांव काय हें तुम्ही सांगू शकाल ? "

"नरेंद्रनाथ" बालक ह्मणाला. व तें ऐकून सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें.

पुन्हां नरेंद्रानें विचारिलें—" बरें, पण, मी काल रात्रीं काय चमत्कार पाहिला, हें सांगाल ? "

यवनबालक निश्चितपणें नरेंद्राकडे पाहून हळुहळु ह्मणाला—" आप एक खुषनुमा मकानमें एक अच्छे पलंगपर आराम करते थे. वहां आपने एक औरतको देखाथा. लेकिन यह कौन थी, इसका मुझे पूरा यकिन् नहीं है. क्यों कि मैं लडका हूं नजूम[1] मैं अभी पूरा नहीं सीखा हूं

1 ज्योतिष विद्या.

लेकिन यह औरत कोई बदनंसीबेवर मालूम पडती है. "

" छे छे, अशा सुंदर तरुणास त्या मंचकावर पाहूनही ती बिचारी ' बदनसीबेवरच ' (अभागिनी) राहिली ! " जवळ उभी असलेली मंडळी हंसत हंसत विनोदानें ह्मणाली.

पण नरेंद्र मुळींच हंसला नाहीं. बालज्योतिषाचें बोलणें ऐकून त्याला मोठाच विस्मय वाटला. थोडावेळ निघून गेल्यावर बालज्योतिषानें नरेंद्राला एकिकडेस बोलावून हळुहळु बोलण्यास आरंभ केला. तो ह्मणाला—

" जनाबमन, मैंने आपकी हालत देखकर नजूमसे हाल बतलाया है. और जो यह संदूक मेरे पास देखते हैं, वही मेरी जायदाद है. मैने पीरके दरगाहमें यह मन्नत मानी है कि मैं तमाम उम्र दीवाना फकिर रहूंगा. इसी सबबसे हमको देहलीमें बहोत तकलिफ है. और मेरी जिंदगीकाभी शक है. चूंकि आप लडाईपर जाते हैं, अगर मुझको हमराह ले चलेंगे, तो आपका मैं बहोत शुक्रिया अदा करूंगा. और आपकेवास्ते सायत सईद बतलाता रहूंगा. और आपका बदख्वाह न होउंगा. तमाम उम्र आपकी भलाई करूंगा. आपके बुराईके बारेमें कमी न सोचूंगा. हत्तूल मकदूर आपकी तरकीका ख्वाहा रहूंगा."

बालज्योतिषी बोलत असतां त्याच्या डोळ्यांवाटे

---

१ अभागिनी.

अश्रूचे लोट चालले होते. एवढेंच नव्हे, तर त्यानें अखेर-चे शब्दही खरोखर करुणाजनक स्वरानेंच उच्चारिले होते.ह्यामुळें नेंद्राला त्याची दया आली. गजपतिसिंह जो हावेळपावेतों बालज्योतिषी बुवाच्या तेज परिपूर्ण बोलानें भयचकित झाला होता, त्याचीही स्थिति नरें-द्रासारखी झाली. नरेंद्राला वाटलें बालज्योतिषी खरोखरच तो ह्मणतो तसा मस्त फकीर असावा. एऱ्हवी इतक्यांत-ल्या इतक्यांत त्याच्या स्थितींत इतका बदल झाला नसता. पूर्वींचे पुष्कळ राजे सर्वसुखाचा परित्याग करून फकिर वेषानें देशोदेशीं हिंडत असल्याचें त्यानें पुष्कळ पारशी पुस्तकांत वाचलें होतें, ह्मणून त्याला वाटे हा यवन बालक-ही तसाच कोणी असेल ! अखेरीस बालज्योतिषाच्या विनंतीस मान देऊन त्यासह नरेंद्र व गजपतिसिंह त्याच दिवशीं संध्याकाळचे वेळीं दिल्ली शहर सोडून नर्मदा तिरा-वर यशवंतसिंहाकडेस जाण्यास निघाले.

प्रकरण पंधरावें.

यशवंतसिंहाचा तळ.

But hark the trump! tomorrow than
In glory's fires shalt dry thy tears

'Campbell.'

इसवी सन १६५८ तील वसंत ऋतूंत तरंग वाहिनी क्षिप्रा नदी व तिच्या तटावरअसलेली प्राचीन पुण्यपुरि उज्जयिनी ह्यांची कांहीं चमत्कारिक शोभा दिसत होती. क्षिप्रेच्या एके बाजूस राजा यशवंतसिंह व त्यांचे योद्धे कासिमखां वगैरेचें असंख्य सैन्य आणि दुसऱ्या बाजूस असलेल्या उंच पहाडावर औरंगजेब व मुराद यांचें मोगलसैन्य पसरलें असून मधून स्वैर गति धारण करणारी क्षिप्रा तिला खोळंबा करणाऱ्या पर्वतास न जुमानून पाषाणाच्या शय्येवरुन झपाट्यानें चालली होती. हिच्या दोन्ही डंगरी खोळंबा करणाऱ्या अगांतुक पर्वताच्या क्रोधास न जुमानितां जणुका-

य त्याचा उपहासच करित आहेत कीं काय असें वाटे. उद्यां भयंकर युद्ध होणार तरी पण आज सर्वत्र शांतता दिसत होती. पहारा देणाऱ्या शिपायांचा कर्कश स्वर मात्र दूरवर ऐकू येत होता. व यांतच क्षिप्रा नदीचा कलकल नाद आणि रानांतील कोल्हेकुई ही मिळून जवळच्या डोंगरांतून त्या सर्वांचा प्रतिध्वनि होत होता. अशा मध्यान्ह रात्रीं नरेंद्र एका तंबूंत निद्रिस्त असून उदईक होणाऱ्या लढाई संबंधाच्या चिंतेमुळें नाना प्रकारचीं स्वप्नें त्याला पडून त्याचें हृदय जागृत होत आहे, तोंच त्याला त्याच्या बाल्पणच्या लीलेचें एक स्वप्न पडलें. क्षिप्रा नदीचा कलकल नाद भागीरथीचा शब्द वाटून त्या भागीरथी तिरावर कुंजवन वेष्टित एक रम्य मंदिरही दिसलें ! भागीरथीच्या रम्य वाळवंटावर दोन मुलें खेळत असून एक मनोहर बालिका जवळ उभी आहे ! ! पण वाचक, नरेंद्राला दिसलेली ही प्रेमपुतळी कोण बरें असावी? ज्या भागीरथी तिरावर प्रथम भागांत सांगितल्याप्रमाणें नरेंद्र क्रिडा करीत होता, त्या कालास अनुसरून नरेंद्राला हें स्वप्न पडलें होतें. पण दैवाच्या विचित्र फेऱ्यामुळें नरेंद्र आज कोठें ? आणि ती प्रेमाकांक्षिणी हेमलता कोणीकडे ?

समुद्राच्या पाण्याची एक लहर गेल्यावर जशी दुसरी यावी, त्याप्रमाणेंच नरेंद्राचें एक स्वप्न सरून दुसऱ्यास

आरंभ झाला. तो पूर्वीच्या स्वप्नांत पाहिलेला भागीरथीचा जलकल्लोळ नाहीं किंवा ती प्रेमपुतळी हेमलताही नाहीं ! ह्या वेळीं त्याला एक फारच सुंदर आणि भव्य मंदिर दिसलें. ह्या मंदिरांतील भिंती व स्तंभ ह्यावर जिकडे तिकडे सोन्यारुप्याचे नक्षी काम केलें होतें. व तेथें बसून एक अप्सरेसारखी सुंदर स्त्री विरहाकुल होऊन दुःखित स्वरानें विरहगीत गात होती. ही कोण ? ह्मणून नरेंद्र तिजकडे पहातो तों जलेखा आपला विस्तिर्ण केशकलाप सोडून आर्द्र झालेल्या दृष्टीनें चोहोंकडे पहात तें गाणें ह्मणत आहे, असें त्याला दिसलें. तिच्या डोळ्यावाटे अश्रुप्रवाह चाल-लेला पाहून आपण हें स्वप्न पहात आहों कीं खरोखरच तिला पहात आहों ह्याचा नरेंद्राला संशय वाटून तो आ-पल्या बिछान्यावर उठून बसला व पहातो तों जलेखा नाहीं ! आणि तें सुंदर मंदिरही नाहीं ! ! पण तें हृदय विदारण करणारें विरहगीत अजूनही ऐकूं येत होतें. तें ऐकून नरेंद्राचे डोळे अश्रुनें भरून आले व तें कोण गात आहे, हें शोधावयास तो तेथून उठून बाहेर आला. पण तेथें कोण असणार ? दोन प्रहर रात्र उलटून गेली, अ-सून सर्वत्र शांतता होती. मंद मंद वारा वहात होता. चंद्रांचा स्वच्छ प्रकाश पडला असून त्यायोगानें नदी, पर्व-त व त्याच्या आसमंतात् भागीं पसरलेल्या लश्कराचे तंबू स्पष्ट दिसत होते. अशावेळीं पूर्व भागांत सांगितलेला तातर दे-

शीय यवनबालक (बालज्योतिषी) एका तंबूच्या दारा-जवळ बसून उंच स्वरानें सप्तस्वरयुक्त गात आहे असें त्याचया दृष्टीस पडलें. मध्यरात्रीचा समय म्हणजे गाण्यास आधींच योग्य; तशांत ह्या यवन बालकाचा कंठ मधूर, व शुद्ध अलापयुक्त करुणरसास उचित असा राग, सर्व साहित्यानें युक्त असें हें गाणें ऐकून नरेंद्र केवळ वेडा झाला ! तो त्या यवन बालकाजवळ जाऊन त्याचा हात धरून आपल्या पदरानें त्याचे अश्रु पुशीत विचारूं लागला– " मुला, खराच कां तू प्रेमासाठीं वेडा झाला आहेस ? असें जर नसतें तर ह्या मध्यान्ह रात्रीं एवढा वेळपर्यंत जागरण करून हें दुःखगीत गात तूं बसला नसतास !

" माफ कीजीये; मैं दीवाना, मुझे अकल नहीं है. जब जो मनमें आता, तब वही गाता हूं ! " नरेंद्राकडे बराच वेळ पाहून रोमांचित् होतसाता, भालप्रदेश घर्मबिंदुनीं आर्द्र झाला असतां, क्षणेक तें सर्व दाबून करूण स्वरानें हळुहळु यवनबालक म्हणाला.

नरेंद्र त्याचें शांतवन करीत त्याच्या अल्प वयांतील विरक्ततेचें व फकिरीचें कारण विचारूं लागला पण यवनबालकानें " मैं पागल, मैं दीवाना " ह्या शिवाय त्याचें कांहीं उत्तर दिलें नाहीं.

रात्र संपून पहाट झाली आणि नरेंद्र लढाऊ वे-

थानें आपला मित्र गजपतिसिंह ह्यास भेटावयास त्याच्या तंबूंत गेला तेथें गजपतिसिंह आपलें युद्धोपयोगीं सामान स्वतःच नीट नेटकें व स्वच्छ करीत होता. तें पाहून नरेंद्रास फार विस्मय वाटून तो चोहोंकडे पाहूं लागला, तो त्याला त्याच्या बिछान्यावरून समजलें कीं गजपतिसिंह गेल्या रात्रीं मुळींच निजला नसून सर्व रात्र त्यानें आपल्या तरवारी, भाले, बरच्या, वगैरे शस्त्रें स्वच्छ करण्यांत घालविली आहे ! नरेंद्र इतके दिवसापासून त्याच्या समागमांत होता, पण आजच्याप्रमाणें गजपतिसिंहाचें मुख पांडूरवर्ण कधींही पाहिलें नव्हतें. वेड्या यवन बालकाला हात दाखविल्यापासून व त्याचें भविष्य ऐकिल्यापासून गजपतिसिंह उज्जयिनीच्या लढाईंत आपण खास मरणार हें समजून चुकला होता. आणि म्हणूनच तो गेल्या रात्रीं मृत्यूशीं भांडावयासाठीं त्याची वाट पहात शय्येस पाठ न लावतां आतुरतेनें बसला होता. वाचक, गजपतिसिंह खरा आणि साहसी रजपूत होता. तरी पण आपल्या मृत्यूला एक दिवसाचाच अवकाश आहे, हें ऐकून त्या साहसी रजपूताच्या कपाळावर चिंतेच्या रेखा अंकित झाल्या होत्या. !

रणोत्साही योद्धे जय मिळविण्याच्या आशेनें स्वतःच्या जिवाला तृणवत् मानून युद्धांतच आनंद मानतात. त्यांच्या मनांत मृत्यूची चिंता मुळींच रहात नाहीं.

सर्व मरतील, आपण ही मरूं; यांत विशेष कांहीं नाहीं, असें त्यांना वाटत असतें. पण वाचक ! 'उद्यां आपण खास मरणार' हा वज्रलेख जर कां त्यांच्या मनांत प्रतिबिंबित झाला, तर मग तो रणोत्साह आणि आनंद एकदांच मावळला म्हणून समजा !

पूर्वीं ज्योतिष शास्त्राच्या फलाफलावर लोकांचा जसा विश्वास होता, किंबहुना त्याहूनही थोडा जास्तच गजपतिसिंहाचा त्यावर होता. "आज युद्धांत आपण खास मरणार" असा त्याचा दृढ ग्रह झाला होता. आणि त्याकरितांच तो आघल्या दिवशींच्या रात्रीपासून निद्रेचा त्याग करून मरणाची वाट पहात बसला होता. 'शस्त्रास्त्राची तयारी' हें केवळ काल कंठण्याचें निमित्य होतें.

"नरेंद्रनाथ, हीं शस्त्रें साफ झालीं आहेत कीं नाहीं हें पहा बरें." नरेंद्र येतांच गजपतिसिंह उठून त्याचा करस्पर्श करीत किंचित् हास्ययुक्त मुद्रेनें ह्मणाला. पण गजपतिसिंहाच्या निस्तेज मुखावर ही हास्याची छटा नरेंद्राला मोठी भयंकर दिसली व तो म्हणाला—"गजपातिसिंह, काय आपण आजच्या लढाईत जाणार? त्या वेड्या पोरानें सांगितलेलें भविष्य आठवतेंना ?"

"पण नरेंद्रनाथ, मरण्याच्या भीतीनें क्षत्रियकुमार लढाईत मागें पाय घेत नाहींत." रागानें लाल डोळे करीत गजपतिसिंह ह्मणाला.

नरेंद्र हें ऐकून स्तब्ध झाला. तो कांहींच बोलत नाहीं, हें पाहून कांहीं वेळानें गजपतिसिंह म्हणाला– " नरेंद्रनाथ, युद्धास जाण्याची तयारी करण्याचें आणखी-ही एक कारण आहे. तें कोणतें म्हणशील, तर " आज माझ्या मानवी लीलेचा अंतीम दिवस आहे. " नरेंद्र स्तब्ध ! म्हणून पुन्हां गजपतिसिंह बोलूं लागला.— नरेंद्रा, काशीच्या लढाईंत ज्या दिवशीं तुझ्या ह्या कोमल बांध्याकडे पाहून स्वाभाविक दयेनें मीं तुझें रक्षण केलें होतें, त्या दिवसापासून काय म्हणून नकळे, तुजवर मी आपल्या लहान भावाप्रमाणें प्रीति करितों. आणि ती प्रीति दिवसें दिवस वाढतेच आहे. तेव्हां नरेंद्रा, या आपल्या भावाला आज शेवटचा निरोप दे. "

हें ऐकून नरेंद्राचे डोळे अश्रूंनीं भरून आले.

गजपतिसिंहानें पुन्हां बोलण्यास सुरुवात केली.— " नरेंद्रनाथ, एकदां एका युद्धांत मी महाराज यशवंत-सिंहावर कांहीं उपकार केला होता. महाराज त्यामुळें प्रसन्न होऊन, त्यांनीं मला हा माझ्या गळ्यांत असलेला मोत्यांचा कंठा बक्षिस दिला आणि त्या दिवसापासून मी हा कंठा " विजयमाला " म्हणून प्रत्येक युद्धाचे वेळीं गळ्यांत घालीत असतो. आज मी लढाईंत या देहाचें सार्थक केल्यावर, नरेंद्रा, हा कंठा तूं यशवंतसिंह महाराजास देऊन सांगावेस कीं देशांत माझीं दोन मुलें आहेत.

बिचारीं हतभागी मातृहीन आहेत! राजाला ह्मणावें, त्यांच्यावर कृपादृष्टि ठेवा. आणि माझ्या रघुनाथाला* असें शिक्षण द्या कीं जेणेंकरून तोही पुढें माझ्याप्रमाणेंच मरणास न भितां समरंगणीं लढेल. याहून विशेष कोणतीही आशा किंवा कोणतेंही मंगल मला नाहीं.

नरेंद्र सारें निस्तब्धतेनें ऐकत असून त्याच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह चालूं होता. पण गजपतिसिंहाचे नेत्र शुष्क व तेजःपुंज दिसत होते.

इतक्यांत सैन्यांतील भेरीनाद ऐकूं आला. व मोंगल लोक क्षिप्रेच्या पार व्हावयाचा उद्योग करीत आहेत असें समजलें. तेव्हां गजपतिसिंह रणवस्त्रें परिधान करून शस्त्रास्त्रांसहित बाहेर आला व अश्वारोहण करून तात्काळ क्षिप्रा नदीकडे मोंगलावर हल्ला करावयास निघून गेला. नरेंद्रही सज्ज होऊन युद्धास निघाला.

* मूळ कादंबरीकारानें केलेल्या "जीवनप्रभात" नामक कादंबरींत ह्या रघुनाथाची वीरता दर्शविली आहे.

प्रकरण सोळावें.

मोंगलांचा तळ.

On ye brave
Who rush to glory or to grave.

'Campbell.'

युद्धाच्या पहिल्या रात्रीं वाचकांनीं राजपुतांचा तळ अवलोकन केलाच आहे, आतां एकदां त्याच रात्रीं मोंगल सैन्याचाही तळ पहावा.

औरंगजेब पहिल्यानेंच येऊन क्षिप्रेच्या कांठीं मुरादाची वाट पहात होता. दोन तीन दिवसांतच मुराद आपल्या सैन्यासह येऊन त्यास मिळाला. ह्या दोन तीन दिवसांत ह्मणजे मुराद यावयाचे अगोदर जर यशवंतसिंहानें औरंगजेबावर हल्ला केला असता, तर औरंगजेबाला खचितच हरावें लागलें असतें. कित्येक इतिहासज्ञ ह्मणतात कीं औरंगजेबाजवळ सैन्य कमी आहे, हें यशवंतसिंहाला ठाऊक नव्हतें, ह्मणून त्यानें त्यावर हल्ला केला नाहीं. कित्येक ह्मणतात, नरकेसरी यशवंतसिंहाला औरं-

गजेबाची ही गोष्ट माहित असूनही, थोड्याशा लोकांवर हल्ला करून जय मिळविणें हें भारतीय नीतिविरुद्ध जाणून त्यानें हल्ला केला नाहीं. अहाहा ! धन्य क्षात्रिय वंशभूषण यशवंतसिंहाच्या औदार्याची !

आज औरंगजेब व मुराद ह्या दोघा भावांची भेट झाली आहे. उद्यां युद्ध होणार ह्मणून जयजयकारानें सर्व तळ गजबजून गेला असून ह्यावेळीं हे दोघे बंधू एका सुशोभित तंबूंत भोजनास बसले आहेत. जिकडे तिकडे दिव्यांचा चकचकाट असून चोहोंकडे अप्सरांसही लाजविणाऱ्या वेश्यांचा नाच व गायन चाललें आहे. आणि त्या वेश्या राजपुत्रांचें मन प्रसन्न करण्याचा मनापासून यत्न करीत आहेत. मुराद दिसण्यांत गंभीर, त्याची छाती विशाळ, कपाळ रुंद आणि वीरास योग्य अशी शरीराची मजबूत ठेवण असून तो फार भोळा होता. त्याचप्रमाणें औरंगजेबाचें कपाळ निरुंद, दृष्टि तीव्र, कुटिल वृत्ति व मन सदैव हजारो उलाढालींनीं व्याप्त. तरी पण आज औरंगजेब कितीतरी सरळ व सुंदर भावानें हंसत आहे. आणि कितीतरी सन्मानानें मुरादाबरोबर बोलत आहे ! जणु काय, बंधूच्या दर्शनानें झालेला आनंद पोटांतच मावत नाहीं ! अथवा, बंधूच्या कार्यसाधनापेक्षां जगांत त्याचें कोणतेंही इष्ट किंवा अन्य उद्देशच नाहीं !! यथेच्छ भोजन झाल्यावर चाकरांनीं जणुकाय मुखशुद्धीकरि-

तांच कीं काय कांहीं फळें व अस्सल उंचीं मद्यें आणून ठेविलीं. पुन्हां नाच व गाणें सुरू झालें. आणि त्या गाण्याबरोबर सर्वत्र आनंदमय हास्यध्वनि पसरूं लागला वेश्यांच्या कटाक्ष जालांत कित्येक मानवहरिणें फसूं लागलीं. विशेषत: मुराद फारच मोहित झाला. इतक्यांत औरंगजेबानें एका सुवर्ण पात्रांत स्वत: मद्य ओतून तें मुरादला दिलें आणि ह्मणाला—" आज आपकी खिदमत करके आपको आसूद: कर सकता हूं. आज हमारी मुराद बर जायगी "

" औरंगजेब, तुह्मारे ऐसा फर्माबर्दार बिरादर मैं नहीं पाऊंगा. अब अपने वास्ते शराब ढालो. " औरंगजेबानें दिलेलें मद्य पीत पीत मुराद ह्मणाला.

" माफ कीजिये, आप जानतेही हैं. हमको जिंदगीमें आरामकी तमन्ना नहीं है. आपसे बहादूर जवानको एकवार वालिदके तख्तपर बैठे देखनेकी आरजूके सिवा मुझे और कुछभी दरकार नहीं. खालिक पैगंबर अगर यह आरजू पूरी करे तो आसूद: हालमें फकीरी लेकर मक्का जाउंगा " औरंगजेब बोलला. आणि लगेंच एक ग्लास पुन्हां मदिरेनें भरून मुरादाला दिलें.

" औरंगजेब ! तुम हकिकतमें बडे ईमानदार हो, नहीं तो मेरे लिये इतनी खैर अंदेशीं क्यों करते. " मुराद ह्मणाला.

" और किसके लिये करूंगा ? तैमूरकी तख्त-नशीनीके लायक और है कौन ! सुजा आराम तलब और डरपोक. वह अकबरकी गद्दीको बदनाम कर देगा. मगरूर और बेवकुफ काफिर दारा तख्तकी बे इज्जत कर देगा. उनकी बनिस्बत् बल्कि तैमूरका नामनिशान नेस्त-नाबूद हो जाय, तख्त फिर काफिर हिन्दुओंके हाथ चला जाय, मुझे मंजूर है. मगर उनके लिये लढाई करना मुझे एकदम इनकार है. जिसकी बेहद बहादुरी और जवांमर्दीसे हिंदुस्तान गरगरा गया है, जो मुगलोंके सुतूने तख्त (राज्याचा आधार) और खानदानके सितारे हैं, उन्हींके लिये लडनेको मैं दिलोजांनसे हाजिर हूं. दरहकीकत मुझे यही मालूम होता है कि आपकी पेशानीपर " शाह-न्शाह " लफ्ज़ खुदा हुआ है. आपकी चौडी छाती और लंबी बाहोंसे " बहादूर " के लफ्ज़ निकलते हैं. मेरी जेह किस्मत, के आपसे बहादूरके काममें मैं लगा हूं. " औरंगजेब सुवर्णपात्रांत मद्य ओतून मुरादाला देत असतां ह्मणाला.

औरंगजेब, बेशक तुह्मारी बातोंसे मैं बहुत खुष हुआ. कल लढाई करना है. आज तमाम फौज तैयार है न ? " मुराद ह्मणाला.

" मैं तीन चार दिनसे तैयार हूं, मगर लढाईके कामोंमें अभीतक मैं पूरे तौरसे पक्का नहीं, इससे अकेले

हिम्मत नहीं होती. आपके पास रहनेसे मालूम होता है मैं किसी बुलंद पहाडके नजदिक बेखौफ पडा हूं. और मेरी हिम्मत दूनी हो जाती है." कृत्रिमपणानें औरंगजेब ह्मणाला.

मुराद महा मूर्ख होता. त्याला आत्मस्तुतीची आवड फार असून खुशामती लोकांच्या खुशामतीनें हरभऱ्याच्या झाडावर चढण्याचाही गुण त्याच्यांत होता, ह्यामुळें व विशेषत: ह्यावेळीं चाललेल्या मद्यसेवनानें विशेष गुंगी आल्यामुळें, औरंगजेबाच्या ह्या मायावी खुशामतीनें भुलून जाऊन तो हसंत ह्मणाला—

" अजिज बिरादर! तुमभी वक्त पाकर लडाईमें होशियार हो जाओगे. इस वक्त तुम हमारे उपर भरोसा रक्खो. मैं जहानमें किसीपर भरोसा नहीं करता. सिर्फ अपनी बहादुरीकी इसी तरवारपर मुझे उम्मीद रहती है." असें ह्मणत त्यानें तरवार बाहेर काढिली. दिव्याच्या चकचकाटांत साफ केलेली तलवार आपल्या तेजानें डोळे दिपवूं लागली. ह्मणून पुन्हा तिला तो मेणांत ठेवूं लागला, पण दारूच्या गुंगींत ती जमिनीवर पडली! नाचणाऱ्या वेश्या हा प्रकार पाहून थोड्या हंसल्या. पण औरंगजेबाच्या तीव्र दृष्टिमुळें त्यांचें तें हंसें जागच्या जागींच दबलें. औरंजेबानें पात्रभर मद्य पुन्हां दिलें. मुरादानेंही तें कांकूं न करितां घशांत ओतिलें. मुरादाची

ही अवस्था पाहून औरंगजेब ह्मणाला–" बिरादर मेहर-बान ! तो मैं अब बिदा होता हूं. कल लढाईके मैदानमें मिलूंगा."

" जाओ. औरंगजेब जाओ. मैं तुम्हारे ऊपर बहोत खुष हूं. आ–ओ, ए-क-वार—मिल लो." असें म्हणत मुरादानें मद्याच्या धुंदींत एका वेश्येच्या गळ्यांत हात टाकिला ! ह्या वेळीं सर्व वेश्यावर्ग हांसून उठला. औरंगजेब हळूंच मागें सरकून पाठीमागल्या तंबूंत गेला. व मुराद गळ्यांत हात घातलेल्या वेश्येबरोबरच तेथें पडला.

पाठीमागल्या तंबूंत गेल्यावर औरंगजेबाची वृत्ति पालटली. ह्या वेळपर्यंत मुरादबरोबर जें त्यानें हंसून हंसून भाषण केलें, तें सर्व लोपून जाऊन त्याजागीं एक नवाच भाव उत्पन्न झाला. ह्या वेळपर्यंत कृतिम आनंद व हास्य धारण करणाऱ्या मुखानें गंभीर भाव धारण केला. तो कपाळावर भयंकर आंख्या पाडून अंधारांतच त्या तंबूंत इकडून तिकडे हळुहळु फिरूं लागला. मध्येंच थांबला. एकदां बाहेर डोकावून पाहिलें व पुन्हां फिरूं लागला. आतां पूर्ववत त्याच्या चेहऱ्यावर आनंद व कठोरता याची छाया दिसूं लागली व कपाळावरील आंख्या नाहींशा झाल्या. ह्या प्रमाणें स्थिरचित्त झाल्यावर तो उभा राहिला व एकिकडे पहात अस्पष्ट अशा वाणीनें तो आपल्या मनाशींच बोलूं लागला. तो ह्मणाला:—

"इकबालमंद तख्त हिंद वालिद के कमजोर हाथसे अब खसकता जाता है! कौन लेगा? दारा? खबरदार, तुमको कूवत है, बल है. लेकिन् हमभी कमजोर हाथसे तलवार नहीं पकडे हैं! रास्ता छोडो, नहीं तो इसी तरवारके हाथसे राह बनाऊंगा. तुम मगरूर हो, अपने आगे किसी दूसरेको नहीं समझते, लेकिन तुमसे ज्यादा जोर और जवांमर्दी हंसते दिलमें छिपी रहती है. मुराद! तुम बहादूर और जवामर्द हो. क्या तख्तपर बैठोगे? तब तो सूअर जिस तरह कीचडमें फिसल जाता है, उसी तरह तुम सतरे जमिनपर लुढके पड गये हो! कल लढाई और आज तुम ऐयाशीमें डूबे हो!! बनेले सूअरकोभी बडी ताकद होती है! जितने दिनोंतक होगा, मैं तुमसे काम लुँगा, फिर तुझे निकालकर उसी तरह बाहर करूंगा, जैसे दूधसे मक्खी! कल लढाईमें न जाने क्या बद है. वालिदके हाथसे बादशाही निकाल लेनेको तैयार हुआ हूं. बिरादरके खूनसे मुल्कको रंगनेपर कमर बांधे हुए हूं. बडे भारी और सख्त काममें हाथ डाल चुका हूं. बहुत आगे जा चुका हूं. अब फिरनेकी तदबीरही नहीं है! अब जवांमर्दीके भरोसे और आगे होऊंगा. तलवारके हाथसे कांटेदार राहको साफ करना है. जरूरत होनेपर उज्जैनसे आगरा तक रास्ता आदमीके खूनसे रंग डालूंगा. लेकिन इस तम-

त्राको बिना पूरी किये नहीं छोडूंगा. बुजुर्ग तैमूर ! तुझारे ताजसे इस माथेको सजूंगा. नहीं तो इसी सिप्राके जलमें दिलका खून बहाऊंगा. ”

प्रकरण सतरावें.

उज्जयिनीचें युद्ध.

Another deadly blow,
Another mightly Empire over thrown.
' Wordsworth '

इसवी सन १६९८ तील वैशाख महिन्यांत मोठी भयंकर लढाई झाली. मुराद व औरंगजेब ह्यांची सेना क्षिप्रा नदीच्या पार उतरण्याची तयारी करूं लागली, पण नदीच्या पार जाणें ही कांही सामान्य गोष्ट नव्हती. औरंगजेबानें सर्व व्यवस्था करून उंच ठिकाणावरून प्रथम रजपुतांचा सामना केल्यावर नदी पार होण्याची आपल्या सैन्यास

आज्ञा दिली होती, पण रजपूतांनीं त्यांना मढविलें. भयंकर युद्ध होऊन यशवंतसिहानें आपल्या बाहूबलाचा मोंगलांस चांगलाच परिचय दिला. पण दुर्दैवानें त्याचा सहायक सरदार कासिमखान यानें अंमळ पड घेतली. त्या वेळचे कित्येक इतिहासलेखक म्हणतात कीं औरंगजेबाजवळून लांच खाऊन ह्या बेइमान कासिमखानानें आपल्या तांब्यांतील सर्व बारुद गोळा छपवून ठेविला व ऐन वेळेस यशवंतसिहाला गोत्यांत घालावयास त्यानें पड घेतली. अर्थात् औरंगजेब व मुराद ह्यांच्यासमोर ह्या वेळीं यशवंतसिंहाचें कांहीं चालेना. तरीं तो न घाबरतां आपल्या आमानुषीय वीरत्वानें शत्रूंशीं टक्कर घेत होता. उंच प्रदेशावरून नदी पार होणें सहज नसल्यामुळें मोगलांचे सर्व प्रयत्न निष्फळ होऊन ते अजूनपर्यंत नदीपार झाले नव्हते. पण साहसी मुराद हातीं तरवार घेऊन आपल्या थोड्याशा निवडक लोकांसह यशवंतसिंहाच्या सैन्याचे आघात सहन करीत नदीच्या पलीकडे झालाच. त्याचें हें साहस पाहून सर्व मोंगल सैन्य अत्यंत आवेशानें नदीपार झालें. हें पाहून फितुरी कासिमखानानें आपल्या सैन्यासह पळ काढला. बिचाऱ्या यशवंतसिंहाच्या अडचणीस सीमा राहिली नाहीं. तरी तो क्षत्रियकुलतिलक असाधारण धैर्यवलंबी असल्यामुळें आपल्या जीवाची परवा न करितां—चोहोंकडून शत्रूंनीं वेढून टा-

किल्लें असतांही—एक सारखा लढत होता. पण दैवाची गतिच विचित्र! त्याचें सैन्य हतबल होऊन घायाळ होऊं लागलें व मोंगलांच्या जयजयकारानें दशदिशा दुमदुमूं लागल्या. रजपूत एवढ्या जरी अडचणींत होते, व त्यांचें एकामागून एक लोक पडत होते, तरी ते रणांतून पळाले नाहींत. एका मागून एक आनंदानें लढून मरत होते!

याप्रमाणें बराच वेळपर्यंत युद्ध झाल्यावर रजपूतांचा बराच संहार होत आहे हें पाहून व आतां लढणें व्यर्थ समजून यशवंतसिंहानें केवळ पांचशे लोकांनिशी समरांगणाचा त्याग केला. ह्या लढाईंत सात हजारापेक्षांही जास्त रजपूत लोक रणांगणांतून मागें पाय घेणें ह्यासारखा क्षत्रियास दुसरा कलंक नाहीं, असें समजून आपल्या क्षत्रियरक्ताचा प्रभाव दाखवीत युद्धस्थलीं प्राणदान देत काळग्रास झाले! बिचारा गजपतिसिंहही ह्याच गर्दींत मारला गेला.

प्रकरण अठरावें.

चितूर गड.

Where like a man beloved of God.
Through glooms, where never woodman trod.
How oft presuing fancies holy.
By moonlight way o'er flowering weeds I wound,
Inspired beyond guess of folly,
By each rude shape and wild unconquerable sound.
O ! ye loud waves ! and O ye forests high !
And O ye clouds that far above me soared !
Thou rising sun ! thou blue rejoicing sky !

बाकी राहिलेल्या अल्प सेनेसह यशवंतसिंह राजपुतान्याकडे यावयास निघाला नरेंद्र गजपतिसिंहाच्या मरणानें अत्यंत दुःखित व उदास झाला होता, ह्मणून राजस्थानां- तील नूतन प्रदेश पाहून मनास झाली तर कांहीं करमणूक करावी, ह्या उद्देशानें त्याच्या बरो- बरच होता. कांहीं दिवस प्रवास केल्यावर हें सैन्य राज- पुतान्यांत येऊन पोंचलें.

यशवंतसिंह मारवाडचा राजा असल्यामुळें त्या देशास जावयास मेवाड ओलांडून त्याला जावें लागलें. तो तिकडून जात असतां त्या देशांतील अत्युत्तम आणि विशाळ डोंगरी किल्ले पाहून नरेंद्रास फार आनंद झाला. हे किल्ले ह्मणजे गगनस्पर्श करणाऱ्या उन्नत पर्वत श्रृंगानें आपल्या मस्तकावर धारण केलेले मुकुटच कीं काय, असें वाटत होतें. ह्या अवघड किल्ल्यावर चढावयाला मार्ग नसून केवळ एके बाजूस शिडीप्रमाणें एकादा छोटासा रस्ता असे. व त्या वरूनच लोक येत जात असत. ज्या वेळीं युद्ध होई, त्यावेळीं ह्या किल्लचांत धान्याची समृद्धि करून त्याचें दार बंद केलें, कीं त्यांत मग शत्रूचा प्रवेश कधींही होत नसे. ह्याप्रमाणें त्या देशांतील अनेक किल्ले पहात यशवंतसिंहाची सेना संध्याकाळचे सुमारास चितूरच्या किल्ल्याजवळ पोंचली. आणि संध्याकाळ झाल्यामुळें तेथेंच तिचा तळ पडून सर्व लोक भोजनादि कार्यें उरकून विश्रांति घेऊं लागले. नरेंद्र कांहीं रजपूत लोक बरोबर घेऊन हा जुनाट पण प्रसिद्ध किल्ला पहावयास निघाला. चोहोंकडे जिकडे दृष्टि पोंचवावी तिकडे चितूरच्या प्राचीन वैभवाची कांहीं तरी साक्ष पटून नरेंद्र आश्चर्यानंदांत निमग्न होत असे. ह्याप्रमाणें कांहीं वेळ फिरल्यावर नरेंद्र एका शिळेवर बसला. बरोबरची मंडळीही आसपास बसली. इतक्यांत त्यांच्यासमोर अकस्मात् एक

वृद्ध मनुष्य येऊन उभा राहिला. बसलेल्या रजपुतांपैकीं कित्येकांनीं त्याला ओळखिलें. हा वृद्ध मनुष्य चितूर येथील "चारण" होता. चारण ह्मणजे भाट कवि. हे चारण राजस्थानांतील पूर्वीच्या आर्य वीरमंडळाच्या पराक्रमाचें गौरवगीत गाऊन राजपुरुष व इतर मनुष्यें ह्यांचें मनोरंजन करीत असत. अझून देखील ह्या देशांतील लोक संध्याकाळचे वेळीं एकत्र जमून चारणाचें गाणें ऐकत असतात. हें गाणें ऐकल्यापासून पूर्वजपराक्रमाचें प्रतिबिंब त्यांचे मनावर उमटून त्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून जातात.

ह्या वेळीं हें स्थळ फार भयाण दिसत होतें. ह्याच्या पश्चिम व दक्षिण दिशांकडे अर्वली पर्वताची ओळ नीलवर्ण मेघांची स्पर्धा करीत उंच आणि लांबवर पसरली होती. जवळपास, जिकडे तिकडे दाट जंगल असून त्यांतून लहान लहान नाले वहात होते. आकाशांतून मेघ भयंकर कृष्णरूप धारण करून पर्वत आणि अंध:कार यांला अधिक घोरतर रूप देत होते. नाल्यांतील पाण्याच्या खळखळाटाशिवाय आणि मधून मधून होणाऱ्या मेघगर्जनेशिवाय दुसरें कांहीं ऐकूं येत नव्हतें. त्याचप्रमाणें अंधारामुळेंही समोर असलेल्या चितुर गडाशिवाय आणि अंध:कारानें व्यापलेल्या पर्वतांशिवाय कांहीं दिसत नव्हतें.

वर सांगितल्याप्रमाणें, आलेल्या चारणास त्या

चौघा राजपूतांनीं शिळेवर बसावयास सांगितलें व आपण त्याच्या सभोंवति बसून महाराज प्रतापसिंहाचें यशगान ऐकण्याची इच्छा दर्शविली. नाल्याच्या खळखळाटाला एकिकडे सारणाऱ्या गंभीर व तीव्र वाणीनें मेवाडचा वृद्ध चारण चितूरचा पूर्वगौरव व त्यांत राज्य करणाऱ्या सूर्यवंशावतंस राजाचा यशोनिधि वर्णन करूं लागण्याच्या अगोदर ह्मणाला—" राजपुतांनो ! मी आतां जें गाणें म्हणणार तें लक्ष्य देऊन ऐका. हें माझें रचलेलें समजूं नका. तर मेघाच्या गडगडाटाचा प्रतिध्वनि उत्पन्न करणाऱ्या पर्वतशृंगाचें गाणें आहे असें समजा, किंवा वज्रनाद करीत धो धो वर्षणाऱ्या धबधब्याचें गर्जन गीत आहे, असें समजा. किंवा ज्या पर्वताच्या गुहेंत एखाद्या तरी शूरवीर रजपुताची हड्डी पडली असेल, त्या गुहेंतून निघणारें हें गीत समजा. किंवा जिचें पाणी क्षत्रियाच्या रक्तप्रवाहांनीं कधीं तरी एकवटलें असेल अशा एखाद्या तरंगवाहिनी नदीनें आपल्या कलकल शब्दानें केलेलें गायन समजा. " ह्याप्रमाणें चारणानें आपल्या गाण्याचा पूर्वरंगनिरूपण करून शूर क्षात्रिय–गुण–गायनास आरंभ केला. त्या गाण्याचा भावार्थ आह्मी खालीं देतों.

" प्रतापशाली प्रतापसिंहा ! ह्या जगांत तुजसारखा वीर कोणी तरी होइल ? तुला मनुष्य म्हणावें की देव ? अकबराच्या प्रतापानें सर्व देश कम्पायमान

होत असतां तुला मात्र त्याबद्दल कांहीं वाटूं नये, हें आश्चर्य नव्हे का ? हल्लीं हा विशाळ चितूरगड तुजकडे नाहीं. तुझ्या बापाच्या कारकिर्दींतच तो निष्ठुर अकबरानें हिसकावून घेतला. पण त्या वेळीं जयमल्ल व पत्त यांनीं केवढें असाधारण वीरत्व दाखवून चितूरगडासाठीं प्राण दिला ! नंतर पत्ताची आई व स्त्री ह्या दोन स्त्री रत्नांनीं तरी केवढी जवांमर्दी दाखवून रणीं प्राण ठेवले ! पण दैवा ! तुझी करणी विचित्र ! क्षत्रिय गजगंडस्थळ विदारण करून चितूरगड किल्ल्यासारखें रत्न अकबरानें काढून घेतलेंच ! ह्या लढाईंत साडे चौऱ्याहत्तर मण रत्नें* व माणकें अकबराच्या हातीं लागलीं आणि त्याच दिवसापासून शपथेऐवजीं पत्रावर साडे चौऱ्याहत्तराचा अंक घालणें आरंभ झालें.

"प्रतापसिंह जेव्हां गादीवर बसून महाराणा झाला, तेव्हां त्याजवळ चितूरगडासारखा बलाढ्य किल्ला नव्हता, सेना नव्हती, पैसा नव्हता, कांहीं नव्हतें ! नाहीं म्हणायला तेवढें त्याचें शौर्य त्याच्या अंगांत होतें ! शूर पुरुषाला संभवनीय असें काय आहे ? त्या वेळच्या मोठमोठ्या शूर म्हणविणाऱ्या रजपूत राजांनीं देखील दिल्लीपति मुसलमान बादशाहाचें दास्यत्व कबूल केलें, पण

* ही रत्नें नसून क्षत्रियांचा जानवीं होतीं. म्हणजे त्या युद्धांत क्षत्रिय इतके मेले कीं त्यांची जानवींच ७४॥. मण भरलीं !

शाबास प्रतापसिंहा ! तूं मात्र त्याचा दास झाला नाहींस. अंबर (हल्लीं ज्याला जयपुर म्हणतात) येथील भगवानदास व मारवाडचा मल्लदेव यांनीं आपआपल्या मुली देखील दिल्लीपतीला अर्पण केल्या, पण धर्मरक्षक, महापराक्रमी व दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी न पिणाऱ्या प्रतापसिंहा ! तूं मात्र म्लेंच्छ बादशाहाची मुळींच परवा केली नाहींस. कसा करशील ? मेवाडाधिपति सूर्यकुलावंतस ह्या निष्कलंक कुलाला कलंक लावणारा तूं नव्हेस. हा तुझा स्वाभिमान पाहून दिल्लीश्वराच्या प्रचंड सेनेनें तुझ्या मेवाडावर चाल केली व त्याला साह्य—शिव शिव ! रजपूत नांवाला कलंक लावणाऱ्या—अंबर, बिकानेर, बुंदी वगैरे ठिकाणच्या राजांनीं करून आपल्या दास्यत्वास पुष्टी आणण्यासाठीं तुला दिल्लीश्वराचा दास करण्याचा प्रयत्न केला. अंबरचा मानसिंह एकदां तुला भेटावयाला आला व तुझ्या पंक्तिस बसण्याची त्यानें इच्छा दर्शविली, पण प्रतापा ! तूं किंचितही भीड न धरितां त्याच्या बरोबरीनें बसून भोजन करण्यास इनकार केलास. मानसिंह ह्यामुळें रागावून त्यानें अकबराच्या असंख्य सेनेसह येऊन मेवाडास वेढा दिला. पण प्रतापा ! तूं किंचित तरी घाबरलास काय ? "

" मानसिंहा; तूं बहादुर खरा, पण ती तुझी बहादूरी काय कामाची ? क्षत्रियांच्या जन्मास येऊन यवनाचा

दास झालास आणि आपल्या शौर्याचा उपयोग स्वदेश व स्वधर्म यांचा नाश करण्याकडे केलास ! तूं काबूल पासून बंगालपर्यंत यशाची पताका फडकविलीस, पण ती कोणाकरितां ? हाय हाय ! यवनाचा दास होऊन तूं शूर राजपूतांचें नांव बुडविलेंस ! ”

“ ह्या भयंकर अंधारांत पलिकडे पडत असलेल्या त्या धबधब्याचें प्रचंड तेज तुम्हाला दिसतें का ? दूरवर ऐकूं येत असलेली त्याची सगर्व गर्जना तुम्हाला ऐकूं येते ? नाहीं, ती तुम्हाला नाहींच ऐकूं यावयाची ! हें पहा, जरी मी अंधारांत आहें, तरी तें सर्व मी पाहूं व ऐकूं शकतों. त्याच्या मार्गांत त्याला न जुमानणारें एक प्रचंड शिलाखंड (धोंडा) गर्वानें आडवें आलें आहें. असले शेंकडो जलप्रवाह त्याच्या डोक्यावरून गेले, तरी तें हटावयाचें नाहीं. समजलेत, मी काय म्हणतों तें ! धबधब्याच्या जलप्रवाहाप्रमाणें भयंकर गर्जना करीत मोंगलसैन्य ह्या मेवाडांत आलें होतें. आणि शिलाखंडाप्रमाणें आपल्या बाहुबलाच्या हिंमतीवर प्रतापसिंह त्याला अडवीत होता. ज्या दिवशीं हळदीघाटावर त्याचा व मोगलांचा भयंकर संग्राम झाला, त्या दिवशीं सेनेच्या कलकलाटानें पर्वताच्या सर्व गुहा प्रतिध्वनित होऊं लागल्या. तीन वेळां शूरवीर प्रतापराणा शत्रुसैन्यांत घुसला, पण त्याच्या प्रिय सरदारांनीं तिन्ही वेळां त्याला बाहेर आणिलें. ”

" परमेश्वरा ! हें तूं काय केलेंस ! पण होय. नुसत्या धैर्यानें काय होणार ! मोंगलांची असंख्य सेना कोणीकडे आणि हे बारा हजार रजपूत कोणीकडे ? शेवटीं निरूपाय होऊन आठ हजार लोकांनिशीं प्रतापसिंह परत फिरून हळद्यावाटाच्या भयंकर दरींत अखेरची निद्रा घेत स्वस्थ पडला. * "

" ह्याप्रमाणें वर्षानुवर्ष संग्राम होऊन सेना, धन व राज्य ह्यांचा क्षय होऊं लागला. प्रतिक्षणीं जीवनाकाशांत निराशेचीं ढगें दिसूं लागलीं, परंतु ह्या रजपूत वीरांनीं आपल्या वीरत्वाचा त्याग करून दिल्लीचें दास्यत्व पत्करलें नाहीं. " " भगवन् ! यांच्यावर ही तुझी किती तरी वक्र दृष्टि ! यांला हीं अलोट दुःखें दाखवूनही तूं शांत झाला नाहींस. किंवा त्यांच्या करुणार्द्र दीर्घ रोदनानेंही तुला कांहीं पाझर फुटला नाहीं ! दैवगति ! दुसरें काय !"

याप्रमाणें गात असतां पूर्वजप्रेमलहरीनें तो चारण आपलें देहभान विसरून त्याचा विणा खालीं पडला. जरेनें पांढरे झालेले त्याचे केस वाऱ्याच्या योगानें उडूं लागले व डोळे इंगळाप्रमाणें लाल झाले. कांहीं वेळ पर्यंत ह्या स्थितींत तो राहिल्यावर मेघ गर्जनेंप्रमाणें गंभीर स्वरानें तो ह्मणाला–"राजपुतांनो, हा वेळपर्यंत तुम्हाला ऐकविलेलें प्रतापसिंहाचें प्रतापगीत तुह्मी गा व त्यानें ज्याप्र-

*इ. स १५७६.

माणे पंचवीस वर्षे लढून मोंगलांस जेरीस आणिलें, दऱ्या खोऱ्यांतून त्यांना अडवून धरिलें, गिरिकंदरांमधून सहपरिवार राहून जिवावरचीं संकटें सोशिलीं पण अकबराचें दास्यत्व कबूल केलें नाहीं, त्याप्रमाणें तुम्हीही त्याचा कित्ता गिरवा. बाबांनो, हेंच वीरगीत गा. ह्या देशांतील प्रत्येक पर्वतांतून ह्याच गीताचा प्रतिध्वनि होत राहो. हिमालयाला उल्लंघन करून समस्त जगावर ह्याच वीरगीताचा नाद भ्रमण करो. आणि जर स्वर्गांत साहस व स्वदेशभक्ति यांना मान असेल, तर ह्या गीतांचा कल्लोळ आकाशमार्गानें स्वर्गद्वारापर्यंत पोंचून मानवांची कीर्ति विस्तारित करो. "

ह्याप्रमाणें चारणाचें भाषण ऐकून सर्व रजपूत तटस्थ झाले आणि पहातात तो चारण अदृश्य. तो कोठें गेला, हें कांहींच समजेना किंवा जवळपास त्याचा शब्दही ऐकूं येईना. केवळ आकाशस्थ मेघ मात्र भीषण गर्जना करून जणु काय चारणानें म्हटलेल्या गीताचें पुनरुच्चारणच करीत होते. तें ऐकून बसलेले रजपूतही आपल्या पूर्वगौरवाचें स्मरण करून उमासे टाकीत आपापल्या तंबूकडे वळले; पण नरेंद्र तेथून हलला नाहीं, किंवा त्यानें उसासाही टाकला नाहीं. तो कपाळावर हात ठेऊन मेघांनीं व्याप्त असलेल्या ह्या भयंकर रात्रीं तेथें बसून कशाचा विचार करीत होता, तें न कळे. मेघ हळु हळु एकत्रित हो-

ऊन मुसळधार पाऊस पडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, तरीही नरेंद्र तेथेंच बसला होता. अनंत आकाशांतून विद्युल्लता चमकूं लागली. राहून राहून मेघ कानटाळ्या बसविणाऱ्या आरोळ्या मारून पृथ्वीला भिवबूं लागले, आणि रात्रीचा भयंकर वारा क्षय रोग्याप्रमाणें वारंवार उच्छ्वास घेऊं लागला; तरी पण नरेंद्र तेथून उठला नाहीं. ह्यावेळीं तो आपल्या देशाच्या (बंगालच्या) स्थितीबद्दल विचार करीत होता. त्याला वाटे, आपल्याही देशांत राजे आहेत, पण ते कुणीकडे ? आणि हे वीर रजपूत कुणीकडे ? इतके दिवस मुसलमानांशीं लढून ज्यांनीं आपल्या स्वतंत्रतेचें रक्षण केलें ते शूर क्षत्रिय कोणीकडे आणि ज्यांच्या देशांत मुसलमानांनीं पाय ठेविल्याबरोबर हिंदुराज्याचा नायनाट झाला त्या बंगाल देशचे वाचाळवीर कोणीकडे ? हा राजस्थाना ! तूं धन्य आहेस. तुझ्या पोटीं जन्मास आलेले लोक ह्मणजे जन्मतःच वीर ! मग ते आबाल, वृद्ध अथवा तरूण असोत किंवा स्त्रिया असोत कीं पुरुष असोत. वेळ आली कीं लढाईला कोणीं माघारा घेणारा नाहीं तन मन धनें करून स्वातंत्र्य दुर्गाची (किल्ल्याची) रक्षा करितील. धन्य धन्य ही वीरभूमि ! नाहींतर आमचा बंगालदेश ! ज्यांत वहाणारी वेगवति गंगानदी त्या देशाची कीर्ति गात नाहीं. किंवा ब्रह्मपुत्राही स्वातंत्र्य गीताचा सूर काढत नाहीं. राजा, प्रजा हेच नव्हेत; तर प्रत्येक वस्तु देखील

परवशतारूपीं निद्रेंत घोरत पडले आहेत. हाय हाय ! देवा, ह्या दोहों देशांत हें केवढें महदंतर ! ह्याप्रमाणें नरेंद्राच्या डोक्यांत विचाराचें काहूर उसळलें असतां त्यानें आपल्या मस्तकावर जोरानें हात मारला व त्यामुळें त्याचें मस्तक फुटून त्यांतून भळभळा रक्त वाहूं लागलें.

प्रकरण एकुणत्रिसावें.

जोधपूर.

Upon the mountains dizzy brink she stood,
She spake not, breathed not, moved not
there was thrown.
On her look the shadow of a mood.
Which only clothes the heart—in solitude.
A thought of voiceless death
" Shelly. "

दुसरे दिवशीं नरेंद्रानें शोध केल्यावर त्याला समजलें कीं प्रतापसिंहानें त्या चारणाचा लहानपणापासून प्रतिपाळ केला होता. प्रतापसिंहाचा मुलगा अमरसिंह हा जसा त्याला प्रिय होता; तसा, किंबहुना थोडा जास्तच चार-

णावर त्याचा लोभ होता. बालपणापासूनच चारणाची तेजस्वी मुद्रा व स्वाभिमान पाहून प्रतापसिंह आपल्या मुलाला कधीं कधीं ह्मणत असे कीं "अमरू, मला वाटतें, तुझ्यापेक्षां हा चारणाचा मुलगा बहादूर निघेल." आणि असे उद्गार निघावयाला कारणेंही पण होतीं. त्यानें बालवयांतच प्रतापसिंहाबरोबर शिकारीस जाऊन राना-वनांतले कष्ट सहन करावेत व सहज लीलेनें प्रतापसिं-हाच्या शौर्यादि गुणांवर कविता रचून आपल्या काव्य-शक्तीचा आणि स्वामिभक्तीचा परिचय द्यावा. अकबरा-च्या सेनेशीं पुष्कळदां टक्कर दिल्यावर प्रतापसिंह कालग्रास झाला, तेव्हां चारण सरासरी तीस वर्षांचा होता. त्या गोष्टीस साठ वर्षें होऊन गेलीं होतीं व चारण हा प्रकृत घटनेच्या वेळीं नव्वद वर्षांचा होता. ह्या अशा वृद्धापकाळांतही दैविक शक्तीप्रमाणें तो पर्वतावरून रात्रीं सुद्धां भराभर उड्या मारीत चालत असे. प्रतापसिं-हाच्या मृत्युसमयीं चारणानें त्याच्या मुलास (अमरसिं-हास) त्याच्या जवळ आणून त्याच्या कडून "बापा प्रमाणें मी ही मुसलमानांशीं लढून स्वातंत्र्यानें राहीन" अशी शपथ घेवविली होती. त्याप्रमाणें तो बरेच दिवस अकबराशीं लढात होता. लढाईंत चारण सर्वदां त्याच्या-जवळ राहून प्रतापसिंहाच्या कृतीची आठवण देऊन त्यास उत्साहित करीत असे. परंतु अखेरीस चारणाचा हा

यत्न निष्फळ झाला. अकबर मरून त्याच्या गादीवर शहाजहान बसतांच दैवबलानें अमरसिंह हतबल होऊन दिल्लीपतीचा मांडलिक म्हणवूं लागला. तरी हा मांडलिकपणा नांवाचा होता. मांडलिकराजाच्या नियमाप्रमाणें तो जी कांहीं खंडणी बादशहास पाठवी, ती दुप्पट करून दिल्लीपती पुन्हां अमरसिंहास परत करीत असे. तसेंच, त्याला इतराप्रमाणें दिल्लीसही जावें लागत नसे. त्याचा मुलगा कर्ण व नातू जगतसिंह ह्यांला जहांगिरबादशहा व त्याची पट्टराणी नूरजहान प्रीतीपूर्वक दिल्लीस बोलावीत व मणिमौक्तिकादिकांचे हार वगैरे बक्षिस देऊन विदा करीत. वाचक हो, स्वाभाविकरीत्या अमरसिंहाचें स्वातंत्र्य यद्यपि गेलें नव्हतें, पण स्वाभिमानपूर्ण चारणास हें आवडलें नाहीं. त्यानें अमरसिंहास असें न करण्याबद्दल सांगितलें. पण अमरसिंहानें तें न ऐकल्यामुळें चारण त्याला पुष्कळ कटुक्ति बोलून " तूं क्षत्रिय नव्हेस " ह्मणत निघून गेला.

मागें लिहिल्याप्रमाणें अकबरानें चितूरगडाचा नाश केल्यावर थोड्याच काळांत त्या ऐवजीं उदयपूर नामक एक सुंदर नवी राजधानी निर्माण झाली. पण चारण तींत पाय देखील ठेवीना. तो स्वाभिमानाची साक्ष पटवीत त्या भग्न झालेल्या चितूर गडावरच रहात असे. एक दोन दिवसांनीं त्यानें किल्ल्यावरून खालीं उतरून गांवढेकरी लोकांजवळून जें कांहीं मिळेल तें खावें व पुन्हां

किल्ल्यावर जाऊन ईश्वर चिंतन करीत स्वस्थ बसावें. ह्या प्रमाणें कालक्रमणा करीत असतां, चारण कालेंकरून उन्मत्त झाला व पर्वतशिखर हेंच त्याचें वसतिस्थान झालें. तो वयपरत्वें दृष्टिहीन व अशक्त झाला होता, तरी पण जेव्हां जेव्हां त्याला प्रतापसिंहाच्या पराक्रमाची आठवण होई, तेव्हां तेव्हां तो आनंदानें देहभान विसरून जाऊन त्याच्या अंगांत वीरोल्लास चढत असे. असो; यशवंतसिंहाची रजपूतसेना पुष्कळ दिवसपर्यंत प्रवास करीत एकदाची अरवली पर्वताचे पार झाली. गिरिप्रदेशाचा देखावा सृष्टींतील इतर देखाव्यांपेक्षां खरोखरच फार मनोहर असतो. ह्याची साक्ष ज्यांनीं ज्यांनीं गिर्यारोहण किंवा डोंगरी प्रदेशांत भ्रमण केलें असेल, त्यांचीं मनेंच देतील. खरोखरच, तेथलें सृष्टिसौंदर्य कांहीं विशेष मनोरम असतें. यशवंतसिंहाची सेना हें सृष्टिसौंदर्य अवलोकन करीत दऱ्याखोऱ्यांतून चालली होती. दोहों बाजूस भयंकर पर्वत, आपलें आकाशमंडळ भेदन करणारें मस्तक उंच करून खालीं पहात असून, त्यांतून निघालेल्या असंख्य नद्यांच्या प्रवाहावर सूर्यकिरण पडल्यामुळें ते दुरून रौप्यहारासारखे भासत होते. कोठें कोठें हे जलप्रवाह उंच जागेवरून वेगानें खालीं पडल्यामुळें व पुढें त्यास सोहोंबाजूनें पर्वतांच्या रांगांचा वेढा पडल्यामुळें त्यांच्या गतीस अवरोध होऊन त्यांचीं स्वयंभु सरोवरें बनलीं होतीं. ह्या स-

रोवराचें जल विपुल आणि स्वच्छ असून त्यावर चोहोंकडील पर्वतशृंगांची छाया जणु काय निद्राच घेत होती.

चोहांकडे शांत. सारी सृष्टि निस्तब्ध. मधून मधून वायु मात्र पर्वतावरील वृक्षराजीमधून सन् सन् शब्द करीत वहात आहे. व पर्वत शृंगावर वास करणाऱ्या नारी (नद्या) शृंगावरून शृंगांतरा पर्यंत (वरून खालीं) उड्या मारीत उतरून ललितस्वरानें स्वयंभु सरोवरांस जल अर्पण करीत आहेत, कोठेंकोठें वेगानें वहाणाऱ्या नद्यांनीं अविचारानें वरून खालीं उडी मारल्यामुळें त्यांच्या देहाचे शतशः तुकडे झाले आहेत. तो देखावा पाहून जणु काय जलदेवता मुक्ताफळांची लाखोळी वाहून पर्वतगजाची पूजाच करीत आहेत, असें वाटे. व सरोवरास मिळणाऱ्या नद्या पाहून जणुकाय एखादी पतिव्रता मुक्ताफलाऐवजीं अखंड प्रेमजलाचाच वर्षाव करून पतिचें पादप्रक्षालन करीत आहे, असें वाटे. असो.

अशी वनश्रीची शोभा पहात सायंकाळचे वेळीं पर्वत शिखरास ओलांडून रजपूतसेना जाऊं लागली, त्यावेळीं जी अपूर्व शोभा दिसत होती, तिचें वर्णन करावयास कोण समर्थ आहे ? पर्वतांचीं शिखरें चंद्रप्रकाशामुळें धवलवर्ण दिसत असून मध्यान्ह रात्रीमुळें सर्वत्र शांत होतीं. जणुकाय पर्वतरूपी योगी सकल पार्थिववृत्ति दमन करून अनंत आकाशाकडे दृष्टि लावून ध्यानस्थच

बसला होता. मध्यान्हरात्रींच्यावेळीं पर्वताचा तो गंभीर देखावा पाहून मनुष्यदेहाच्या क्षुल्लकत्वाविषयींहजारो कल्पना मनांत येऊन प्रत्येकाच्या मनांतील अभिमान, आशा, वगैरें चट सारे विकार क्षणेक दूर होत असत. पर्वतरूपी योगीराजाच्या स्कंधावर यज्ञोपवितप्रमाणें शोभणारे जलप्रवाह चंद्रप्रकाशांत कितीतरी रम्य दिसत होते ! ह्या डोंगराळ प्रदेशांतील हजारो दऱ्याखोऱ्यांतून हल्लीं हिंदुस्थानचे मूल निवासी रहात असतात. आर्यलोकांनीं शेतकीच्या उपयोगीं असे सुपिक प्रदेश तलवारीच्या बळानें जिंकल्यामुळें हे मूल निवासी (अनार्य) पर्वतकंदरांतून व रानावनांतून राहूं लागले. पण ते आर्यांच्या स्वाधीन होऊन त्यांचे बंदे झाले नाहींत. तरीपण मोंगल युद्धाचेवेळीं ह्या लोकांनीं धनुष्यबाण घेऊन पुष्कळदां रजपुतांना साह्य केलें आहे. असो.

पर्वत ओलांडून यशवंतसिंह सुखरूपपणें आपल्या मारवाड देशांत येऊन पोंचला. मेवाड व मारवाड ह्या दोन्ही प्रदेशांत प्रवास केल्यावर प्रवाशाला असें वाटतें कीं निसर्ग देवीनें जणुकाय आपल्या हातानेंच ह्या दोहों प्रदेशांत एवढा फरक करून ठेविला आहे ! मेवाडांत जिकडे पहावें तिकडे विशाळपर्वत, महान वृक्षराजी व लता पत्रांचें गौरव आहे, पण तेंच मारवाडांत पहा, कीं तेथें पर्वत नाहींत; वट, अश्वत्थासारखे महावृक्ष नाहींत,

सुपिक जमीनी नाहीत व वेगवान जलप्रवाह किंवा स्वयंभु सरोवरेंही नाहींत ! केवळ वाळुकामयसृष्टि दिसत असून मधून मधून बाभळीसारखे अतिक्षुद्र वृक्ष दृष्टीस पडतात. ह्या रूक्ष प्रदेशांतून सेना जात असतां त्यांची चेष्टा करावी ह्मणून मेवाडच्या एका चारणानें तेथील भूमीच्या रूक्षतेवर एक कवित ह्मटलें. तें ऐकून यशवंतसिंहाच्या सैन्यांतील लोक हंसून गर्वयुक्त वाणीनें त्याला ह्मणाले " ही आमची जन्मभूमि रूक्ष नाहीं, तर वीर प्रसविनी आहे. " तें त्यांचें ह्मणणें अक्षरशः खरें होतें. त्यावेळीं मारवाड देशांतील रजपूत लोक फार कडवे आणि शूर असून त्यांचीं बरोबरी करणारी एकही जात हिंदुस्थानांत नव्हती. ह्याप्रमाणें हें सैन्य कांहीं दिवसपर्यंत प्रवास करीत एकदाचे जोधपुरानजिक येऊन त्यानें तेथें तळ दिला. तेथें नरेंद्राला गजपतिसिंहाच्या निरोपाची आठवण होऊन तो यशवंतसिंहास भेटला. यशवंतसिंह आपल्या तंबूत–झालेल्या अपजयामुळें–खिन्न वदन करून बसला होता. नरेंद्र समोर गेला आणि त्यानें प्रणाम करून " महाराजाचा जयजयकार असो " असें म्हटलें. यशवंतसिंह वर मान करून पहातो तों एक अल्प वयस्क शिपाई समोर उभा असलेला त्याला दिसला. तेव्हां तो त्याला ह्मणाला—" काय पाहिजे ? "

नरेंद्रम्हणाला—महाराज, क्षिप्रा किनाऱ्यावरील

युद्धांत आपला एक अनुचर लढून मरण पावला आहे. पूर्वी महाराजांनीं प्रसन्न होऊन त्याला एक मौक्तिकमाला बक्षिस दिली होती. तो समरांगणांत लढून मरण्याच्या अगोदर त्यानें,–आपण दिलेल्या बक्षिसाचा अपमान करण्या करितां नव्हे, पण निरूपायानें–मला ही माला आपणास परत करावयास सांगितलें आहे. असें म्हणून त्यानें ती माला यशवंतसिंहासमोर ठेविली. ती पाहून यशवंतसिंहाला गजपतिसिंहाची आठवण झाली. तो दीर्घ निश्वास टाकून मनाशीं म्हणाला, हाय, गजपतिसिंह ! मारवाडकुलतिलक ! तुझ्या सारखा साहसी वीर आमच्याकडे एक देखील नव्हता. वत्सा ! तूं माझी एकदां समरांगणांत प्राणरक्षा केल्यामुळें, त्या स्मरणार्थ मीं तुला ही मौक्तिमाला दिली होती. पण गजपति ! ह्या वेळीं आम्हाकरितां तूं आपल्या प्राणाचा बळी देऊन ती माला मला परत पाठविलीस ! वत्सा ! नदीचा प्रवाह एकदां पुढें गेल्यावर, तो मागें फिरत नाहीं. तद्वतच राजेलोक दिलेलीं दानें परत घेत नसतात. नरेंद्रा ! तुझ्या मित्राला आम्ही ही मौक्तिकमाला दिली होती. तो युद्धांत शौर्य दाखवून, पराक्रम गाजवून निजधामास गेला; तेव्हां त्याच्या पराक्रमाचा कित्ता मनांत वागवीत ही माला तूंच आपल्या गळयांत असूंदे. यशवंतसिंहाचें हें भाषण ऐकून नरेंद्रानें त्याचे उपकार मानिले आणि मौक्तिकमालेस प्रेम-

पूर्वक वंदन करून तो म्हणाला—महाराज, माझी आणखी एक विनंती आहे, गजपतिसिंहाचीं दोन लहान मुलें आई-वांचून अनाथ स्थितींत असल्यामुळें गजपतिसिंहानें आपणास त्यावर कृपादृष्टि ठेवण्याबद्दल विनंती केली आहे. आणि असें होऊन प्रिय बालक रघुनाथ स्वदेशाकरितां राजाज्ञेनें त्याच्या सारखाच धारातीर्थी प्राण देण्यास समर्थ झाला, म्हणजे मग स्वर्गांतही गजपति आपणास धन्य मानील.

हा करुणाजनक निरोप ऐकतांच राजा यशवंतसिंह सद्गदीत होऊन म्हणाला—मुला, शांत हो. गजपतिच्या अभावीं मी त्या मुलांचा पिता होईन व खुद्द राणी त्यांची आई होईल. अजूनपर्यंत आमच्या येण्याचा समाचार तिला आम्ही कळविला नाहीं. इतक्यांत आमचा दूत तिकडे जावयास निघेल, तेव्हां तूंही त्याजबरोबर जाऊन राणीला गजपतिची विनंती व त्याच्या मुलाचीस्थिति सांग.

यशवंतसिंहाची आज्ञा घेऊन रजपूत दूताबरोबर नरेंद्र जोधपूरच्या किल्ल्याकडे यावयास निघाला.—जोधपूर शहर बारा कोश लांब, एक कोश रुंद व अत्यंत उंच अशा पर्वताच्या टोंकावर वसलेलें असून तेथील राजमहाल व किल्ला खालील प्रदेशाकडे जणुकाय रागा-नेंच पहात आहे, असें वाटतें.

नरेंद्रानें त्याच पर्वतावर दोन सरोवरें पाहिलीं. बरो-

वर असलेल्या दूतांनीं सांगितलें कीं पूर्वेस असलेल्या सरोवराचें नांव ' राणी तलाव ' व दक्षिणेस असलेल्या सरोवराचें नांव ' गुलाबसागर ' आहे. गुलाबसागराचें पाणी नेण्यासाठीं शहरांतील शेंकडो तरुणी आल्यां असून त्यांच्या सौंदर्य निरीक्षणाकरितां कित्येक तरुण नाजिक असलेल्या बगीचांतून फिरत होते. समोरच उंच असा राजवाडा व त्याच्या सभोंवति विस्तिर्ण तट होता. ह्या तटाच्या दरवाजाजवळ यशवंतसिंहाचे दूत आल्यावर राणीच्या आज्ञेनें देवडीवाल्यांनीं त्याला राजवाड्यांत पोंचविलें.

पांढऱ्या संगमरवरी दगडांच्या सुंदर महालांत महाराणी सिंहासनारूढ झाली असून तिच्या सभोंवती तिच्या परिजनांपैकीं कित्येक हातीं चवऱ्या घेऊन तिजवर ढुलवित होत्या. राणीचें मुख बुरख्यानें किंचित झांकलेलें असूनही तिच्या सौंदर्याची दीप्ति थोडी देखिल कमी झाली नव्हती. वीर नारीप्रमाणें ती सिंहासनावर बसली असून तिच्या कृष्णवर्ण केशपाशांत रत्नांचीं फिरकी फुलें अत्यंत शोभत होतीं.

दूतांनीं लवून मुजरा केल्यावर भीत भीत यशवंतसिंहाकडील मजकूर निवेदन केला. तो ऐकून राणी क्षणेक निस्तब्ध झाली. तिचें भान हरवलें. विद्युत्पतन होण्यापूर्वीं जसें आकाश क्षणेक शांत होऊन मग विद्युल्लता चमकते, तद्वत राणी अंमळ शांत राहिल्यावर तिनें एक-